THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192590
UNIVERSAL LIBRARY

मुद्रक व प्रकाशक:—

रतनलाल डी. शहा एम्. ए.

रत्नाकर छापखाना, सांगली

मुद्रण तपासनीस:—

श्री. मुजुमदार [ कवि—साधुदास ]

श्री. प्र. ह. खाडीलकर

प्रमुख विक्रेते:—

महाराष्ट्र ग्रंथ भांडार

मुखपृष्ठावरील दोन रंगी चित्र.

सुप्रसिद्ध चित्रकार दलाल मुंबई

प्रथमावृत्ति ऑगष्ट १९४१

किंमत २ रुपये

# जीवन

[ कादंबरी ]

लेखिका:—

रजनी गुहागर एम्. ए.

रत्नाकर प्रकाशन संस्था, सांगली.

'प्रिय मैत्रीण :—

कु. मृणाल हिला

या कादंबरींतील सर्व पात्रें व घटणा काल्पनिक आहेत. कोणत्याही नांवाचें अगर स्वभाव चित्राचें एकाद्या विद्यमान किंवा मृत व्यक्तीच्या नांवाशीं किंवा स्वभावाशी साम्य दिसून आल्यास तो केवळ काकतालीय न्याय आहे असें समजावें. बुध्दिपुरस्कर तसें करण्याचा लेखिकेचा मुळींच हेतु नाहीं.

विलिग्डन् कॉलेजच्या आवारांत घडलेलें झेंडा प्रकरण, काल्पनिक सायन्स इन्स्टिट्यूटच्या आवारांत घडलेले गोळाबार प्रकरण व आरंभीं नि शेवटीं आलेली म० गांधी यांचीं भाषणें सारी काल्पनिक आहेत.

विस्तृत व उद्बोधक प्रस्तावना लिहिल्याबद्दल श्री० खाडीलकर यांचे, मुद्रण तपासल्याबद्दल राजकवि साधुदास व श्री. अ. वा. मराठे यांचे व कादंबरीच्या बाबतींत वेळोवेळीं मदत केल्याबद्दल श्री.अनंत अन्तरकर, प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई, सौ. कांता शहा, कवि कुलकर्णी, श्री. गुरव मास्तर व चित्रकार दलाल यांचे जितके आभार मानावेंत तवढे थाडेच आहेत.

# ' जीवना ' ची भूमिका

आज कालच्या महाराष्ट्रांतील कॉलेजांतील तरुण--तरुणींचें जीवन हें या कादंबरीचें वैशिष्ट्य म्हणून सांगता येण्यासारखें असलें तरी तें खरें वैशिष्ट्य नव्हे. ह्या कादंबरीचा नायक ' जीवन ' याच्या अहिंसात्मक राजकारणाच्या मनोभूमिकेवरून आजकालचें कॉलेज जीवन कसें दिसतें हें या कादंबरींत लेखिकेनें सहृदयतेनें चित्रित केलें आहे. कादंबरीचा नायक ' जविन ' आणि त्याच्या आयुष्याचा दु:खांत करणारी आई, बाप, बायको आणि मित्र-मंडळी यांचें चित्रण कसें साधले आहे याचा निर्णय रसिक वाच-कांनीं द्यावयाचा आहे. हा निर्णय देण्यास त्यांना मदत व्हावी म्हणून ' जीवना ' च्या भूमिकेसंबंधानें दोन शब्द लिहितो.

लो. टिळकांच्या राष्ट्रीय चळवळीनें मराठी वाङ्मयांत एक जोम-दार प्रवाह सुरू झाला. ह्या प्रवाहामुळें क्षात्रधर्मावरील मालिन्य दूर होऊन वीरवृत्ती अंकुरित झाली. १९२०–३०सालांतील म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीमुळें मराठी वाङ्मयांत सत्याग्रहाचा विचार-प्रवाह सुरू झाला. गेल्या दहा वर्षांत समाजसत्तावादाच्या विचारसर-णीनें लेखकांचीं मनें भारलेलीं दिसून येतात; पण चालू जगद्व्याळ महायुद्धामुळें ' बळी तो कान पिळी ' कीं ' जिकडे धर्म तिकडे जय ' यापैकीं खरें काय ? असा प्रश्न विचारवंतांच्या पुढें उभा

राहिला आहे. ‘ धर्मो रक्षति रक्षक: ’ असें म. गांधींचें मत आहे तर ‘ बळाच्या मदतीशिवाय नुसत्या धर्माचा जय होत नाहीं, ’ असें इंग्लंड आणि अमेरिका ही राष्ट्रें आपल्या उदाहरणानें जाहीर करीत आहेत. अशा स्थितींत जीवनाची भूमिका काय? याचा निर्णय लावणें चांगल्या विचारवंतांनाही कठिण होऊन बसलें आहे.

धर्म विरुद्ध बळ या सनातन लढ्याला हिंदुस्थानच्या राजकारणांत हिंसा अहिंसेचें स्वरूप प्राप्त झालें आहे. राजकीय प्रश्न सोडवण्यासाठीं अहिंसेचा उपयोग म. गांधी करत आहेत. असा प्रश्न पूर्वीच्या काळीं उत्पन्न झाला नव्हता आणि त्याचें उत्तरहि सुचविलें गेलें नव्हतें. लोकशाही राज्यपद्धतीमुळें राजकारणांत अहिंसा आली आणि ती स्थीर होऊं पहात आहे. ज्याच्या पाठीशी शस्त्रबळ त्यानें आपल्या राष्ट्रांतिल किंवा अन्य राष्ट्रांतिल लोकांचें भवितव्य न ठरवतां लोकांच्या बहुमतानें तें ठरवलें जावें हें तत्व आज जर्मनी, इटली आणि जपान या त्रिकुटाखेरीज सर्व राष्ट्रें मान्य करीत आहेत. या पूर्वीचा इतिहास शस्त्रबळाच्या कमि-अधिकपणामुळें झालेला राजक्रांत्यांचा इतिहास आहे. त्या दृष्टीनें जुना इतिहास आणि दाखले, लोकशाही मान्य केली असतां उत्पन्न होणारे प्रश्न सोडविण्यास, उपयोगी पडत नाहींत. म. गांधी ह्यापेक्षां निराळे कांहीं सांगत नाहींत.

लोकशाहीमध्यें शस्त्राला मान नाहीं; मताला मान आहे. दुसऱ्याचें मत मानायचें म्हणजे जबरदस्तीचा प्रश्नच उपस्थित

होत नाहीं. हे सर्वांना मान्य आहे; पण लोकांचें मत धाब्यावर बसविणारा हिटलरसारखा जबरदस्त शस्त्रास्त्रांच्या जोरावर धिंगाणा घालूं लागला तर त्याचा बंदोबस्त कसा करावयाचा? ह्या प्रश्नाचें उत्तर एकेरी नाहीं. एखाद्यानें अचानकपणें हल्ला केला किंवा दरोडा घातला तर त्यावेळीं काय करावयाचें? याचें उत्तर धीटपणानें जितका प्रतिकार करतां येत असेल तितका प्रतिकार करावा; पण प्राणभयानें लाचारी पत्करु नये असें कोणीहि उत्तर देईल. म. गांधीही असेंच उत्तर देतात- शस्त्राचा उपयोग करावा म्हणणाऱ्यालाही बिनतयारीच्या स्थितीत कसें वागावयाचें याला यापेक्षां निराळें उत्तर देतां येण्यासारखे नाहीं. तथापि समाजांत किंवा राष्ट्रांत जबरदस्त किंवा आततायी उत्पन्न होतात त्यांचा बंदोबस्त कसा करावा याचें उत्तर निराळें आहे. ‘ माझ्या मनगटांत तावद आहे, माझ्या पाठीशी शस्त्रास्त्र बळ आहे म्हणून मी राज्य चालविणार. राज्याचा आणि समाजव्यवस्थेचा आधार संघटीत शस्त्रबल आहे, ’ हा सिद्धांत मान्य केला तर जबरदस्त व आततायींचें पारिपत्य संघटीत शस्त्रबलानें करावें असें म्हणणें क्रमप्राप्त आहे; पण लोकशाही राज्य पद्धतींत जुन्या संघटीत शस्त्रबलाचीं जागा संघटीत मतबलानें घेतली आहे. हें संघटीत मतबल जबरदस्त किंवा आततायी यांचे पारिपत्य करण्यास पुरेसे होईल असें म. गांधींचें म्हणणें आहे. कारण, एकतर सर्व लोकांना आपापला

संचार स्वतंत्रपणें करता येत असल्यामुळें जबरदस्तपणा किंवा आततायीपणा समाजांत फारसा उत्पन्न होत नाहीं आणि एखाद्याच्या मनांत तो उत्पन्न झालाच तरी तो संघटीत लोकमतापुढें नांगी टाकल्यावांचून रहात नाहीं.

'अहिंसाप्रतिष्ठायां वैरत्यागः' असें पातंजलीचें योगसूत्र आहे. मनांत वैराची भावना नसली म्हणजे बळाचा वा शस्त्राचा उपयोग करण्याची जरुरीच पडत नाहीं. शिवाय लोकशाही राज्यपद्धती ही अर्थप्रधान संघटणा आहे. लेनिनच्या ज्या लाल सैन्यानें कोलचॅक आणि डेनिकिल यांच्या सैन्याचा समाचार घेतला तें सैन्य पाठीशी असतांनाहिं रशियन शेतकऱ्यांनीं संघटीतपणानें 'आपल्या पोटाला लागते त्यापेक्षां अधिक धान्य पेरणार नाहीं' असें नुसते न म्हणतां वागवयास सुरवात केल्याबरोबर त्याला त्यांच्यापुढें नमावे लागले. रशियन शेतकरी शस्त्रबळाला जर नमवूं शकला तर तसें करणें अन्य देशांतील लोकांना कां कठीण आहे? छातीवर बंदूक रोखली असतांना नकार देणें आणि असा नकार देण्याची शक्ति लोकांमध्यें संघटीत स्वरुपांत उत्पन्न करणें हे क्षात्रधर्माच्या शिकवणुकीइतकेंच परिणामकारक आहे. लोकांच्या संघटनेचा हा मूलभूत प्रश्न आहे. नवे घर बांधताना किंवा जुने घर दुरुस्त करतांना पायाची आंखणी कशी करावी याचा विचार करणें निराळे आणि अंगावर पडूं लागलेल्या घराला ठेपे कुठें आणि कसें द्यावें हा तात्पुरता विचार

निराळा. हिंसा अहिंसेचा विचार करतांना ह्याची नेहमी गल्लत करण्यांत येत असते.

आपल्या महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाची भूमिका अहिंसा-प्रधान असावी असें लेखिकेला वाटतें. एकदां हा मूलभूत सिद्धांत मान्य केल्यावर तात्कालीन अडचणीचा विचार न करतां आपल्या ठरवून घेतलेल्या धर्माप्रमाणें वागणारे करारी पुरुषच अशा धर्माची स्थापना करुं शकतात. ह्या कादंबरीतील नायक 'जीवन' हाहि असाच करारी बाण्याचा दाखवला आहे.

कादंबरीला सत्याचा जास्तीतजास्त आभास उत्पन्न करण्यासाठीं कांहीं स्थळांचा व नांवांचा लेखिकेनें उपयोग केला आहे. तथापि तो 'खडे मांडून शिकवावा । ओनामा जेवी ॥' ह्या रामदासांच्या उक्तीप्रमाणें विषयप्रतिपादनाच्या सोयीकरीतां केला आहे. यापेक्षां त्या निर्देशाना स्वतंत्र असें महत्व नाहीं. अहिंसात्मक राजकारण महाराष्ट्रालाहि बुद्धीग्राह्य वाटतें ही गोष्ट या कादंबरीच्या रुपानें लेखिकेनें मांडली याबद्दल तिला धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

गोकुळाष्टमी
सांगली, ता. १४।८।४१. } प्र. ह. खाडिलकर

ता. क.: प्रस्तुत कादंबरी प्रसिद्ध व्हावयाच्या सुमारासच अहिंसात्मक राजकारणाच्या दृष्टीनें चिरस्मरणीय घटना घडून आली आहे. जगाच्या स्वामित्वासाठीं इंग्लंड, अमेरिका रशियाविरुद्ध जर्मनी

इटली आणि जपान यांचा तीव्र लढा चालू आहे शस्त्र संघटणेच्या जोरावर जर्मनी जग पादाक्रांत करूं पहात आहे आणि त्याला नेस्तनाबूत करण्यासाठीं अमेरिका बद्धपरिकर झाली आहे. कामधेनूच्या प्राप्तिसंबंधानें वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यामध्यें झालेल्या झगड्याची कथा महाभारतांत दिली आहे. विश्वामित्राचे सैनिक कामधेनूला जबरदस्तीने घेऊन जाऊ लागले, तेव्हां तिच्या देहांतून सैनिक निर्माण होऊन त्यांनीं विश्वामित्राच्या सैनिकांना हतबल केलें. आपली जबरदस्ती फुकट गेली असें पाहिल्यावर ‘ धिग् क्षत्रिय बलं ब्रह्मतेजो बलं बलम् ’ असें उद्गार विश्वामित्रानें काढले. आज जर्मनीचा नक्षा उतरविण्यासाठीं नाईलाज म्हणून शस्त्रबलाचाच उपयोग करावा लागला असला तरी जगाचा लोकव्यवहार हा ‘ बळी तो कान पिळी ’ या न्यायानें चालता कामा नये आणि तसा तो ह्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर चालणार नाहीं अशी लोकव्यवहाराची घडी बसविण्यांत येईल असें इंग्लंड आणि अमेरिकेचे नेते मि. चार्चिल आणि मि. रुझवेल्ट यांनीं इंग्लंड आणि अमेरिकेचे अधिकृत धोरण जाहीर केलें आहे. लोकराज्याची सनद म्हणून ह्या घोषणेचा जयजयकार इंग्लंड-अमेरिकेची पत्रें करीत आहेत. प्रेसिडेंट विल्सन याचे स्वयंनिर्णयाचे तत्व ह्या घोषणेंत समाविष्ट आहे; पण ह्या घोषणेचें महत्व लोकव्यवहार या पुढें शस्त्रप्रधान राहणार नाहीं मतप्रधान राहील ह्या मान्यतेंत आहे. महात्माजींचे अहिंसात्मक राजकारण यापेक्षां निराळे नाहीं. महायुद्धानंतर जगाची घडी बस-

विण्याकरितां जें तत्व इंग्लंड आणि अमेरिका व्यवहारांत आणावयास तयार आहेत, तेच तत्व त्यांनीं आतांच व्यवहारांत आणावे असें म. गांधींचें ह्मणणें आहे. व्यवहार आड येतो असें त्याला उत्तर देण्यांत येते. आज अहिंसेच्या राजकारणाच्या आड व्यवहार येत आहे तसाच तो महायुद्धानंतरहि कशावरून येणार नाहीं? इंग्लंड अमेरिकेची परंपरागत जबाबदारी लोकराज्याची सनद ह्मणून गाजावजा होत असलेल्या ह्या घोषणेंत चंचूप्रवेश करून बसली आहे. तथापि तत्व मान्य आणि तपशील अमान्य हा झगडा सनातन आहे. दोन तत्वां-मधील कोणते तत्व चांगले ह्या वादापुरता राजकारणाचा पाया हिंसाबल नसावें; मतबल उर्फ अहिंसा हें असावें हा म. गांधींचा सिद्धांत इंग्लंड, अमेरिकेनें तत्वतः मान्य केला ही गोष्ट विचारांचा गोंधळ काढून टाकण्याच्या दृष्टीनें महत्वाची आहे. विचारांचा गोंधळ काढून टाकून अहिंसात्मक राजकारणाचा पुरस्कार करण्या-करितां लिहिण्यात आलेली ही कादंबरी प्रसिद्ध होत असतांनाच त्याला पोषक अशी घडलेली ही घटना प्रसादचिन्ह वाटली ह्मणून तिचा ताजा कलम घालून मुद्दाम उल्लेख केला आहे.

प्र. ह. खा.

रत्नाकर-प्रकाशन

# जीवन

‘ लाला लजपतराय यांनीं स्वातंत्र्यासाठीं राष्ट्रानं आरंभिलेल्या यज्ञांत स्वतःची आहुति दिली. आणि राष्ट्राचं हित साधत असेल, लोकांचं कल्याण होत असेल, दारिद्र्यांत खितपत पडलेले आपले कोट्यावधीं देशबांधव सुखी होत असतील, तर आपल्या एकट्याच्या जीविताची काय पर्वा! असंच त्यांनीं आपल्या कृतीनं जगाला दाखवून दिलं आहे.

प्रत्येकास थोडा फार त्याग हा करावाच लागतो. ज्याला—ज्याला म्हणून आपल्या कुटुंबाची, आपल्या समाजाची, आपल्या राष्ट्राची उन्नति व्हावी असं वाटत असेल, त्याला त्याग हा केलाच पाहिजे !

बंधु—भगिनींनो, आज आपल्यापुढं आपल्या राष्ट्राचा प्रश्न आहे. पूर्वी जगाला स्वातंत्र्याचे धडे देणारा हा भारतवर्ष, आज पारतंत्र्यांत खितपत पडला आहे. लाखों लोक अन्नवस्त्रावाचून तडफडत आहेत; आणि याच वर्गाच्या उन्नतीसाठीं कॉंग्रेस आज नेटानं प्रयत्न करीत आहे; दलित किंवा पीडित वर्गाच्या सुखाची काळजी घेणं, त्यांना लागेल ती मदत करणं आणि वेळप्रसंगी स्वतःच्या सुखाची, धनाची, फार काय प्राणांची पण आहुति देऊन, त्यांना सुखी करण्यांतच आपलं, आपल्या बांधवा-विषयींच्या कर्तव्याचं सार साठविलेलं आहे. लोकांच्या कल्याणाकरितां अहर्निश झटणं, हाच यज्ञ होय. हा यज्ञ, म्हणजे त्याग करण्याची प्रवृत्ति; हीच आपणास माझ्या योग्यतेस नेऊं शकते.

पण परोपकार करतांना कुणी स्वार्थ पाहूं नये. यज्ञ करतांना आपल्या स्वतःचा त्यापासून कांहीं फायदा होतो का, तें आपण पाहूं नये.

यज्ञाची कल्पना मोठी व्यापक आहे. जो पाऊस पडतो तो देखील यज्ञच होय. जी भूमि आपणांस धान्य देते, ती देखील यज्ञच करीत असते. कॉंग्रेस ही खऱ्याखुऱ्या यज्ञाच्या तत्वावर उभारलेली असून, ती पीडित, भुकेकंगाल व त्रस्त अशा जनतेकारितां सतत कार्य करीत असते.

बोला, कॉंग्रेसनं आरंभिलेल्या या यज्ञांत भाग घेण्याची तुमच्यापैकीं किती जणांची तयारी आहे? आज आम्हांस म्हाताऱ्यांबरोबरच अशा उसळत्या रक्ताचे तरुण हवे आहेत कीं, जे कॉंग्रेसचा डंका सर्व जगभर पिटवितील, सत्य व अहिंसेची महती सर्वांना पटवून देतील. स्वतः खादी परिधान करतीलच, पण त्याबरोबरच दुसऱ्यांना पण वापरण्यास सांगतील, विनवितील, तेव्हांच आपला समाज उर्जितावस्थेस पोहोंचेल आणि आपला राष्ट्र पारतंत्र्याची बेडी तडातड तोडून टाकण्यास समर्थ होईल.'

टाळयांच्या प्रचंड कडकडाटांत महात्माजींनीं आपलें भाषण संपविलें आणि दोन्ही हातांची ओंजळ करून, तिथें जमलेल्या, अलोट जनसमुदायास स्मित मुद्रेनें अभिवादन करून ते खालीं बसले.

'महात्मा गांधी की जय,' 'लाला लजपतराय की जय' अशा आरोळया ठोकीत लोक सभागृहांतून बाहेर पडूं लागले. ज्यांच्या त्यांच्या कानीं महात्माजींच्या प्रभावी भाषणाचा ध्वनि सारखा उमटत होता.

जीवन तेवढा त्या गोष्टीला कसा अपवाद असूं शकणार! 'ज्याला म्हणून आपल्या कुटुंबाची, आपल्या समाजाची, आपल्या राष्ट्राची, उन्नति व्हावी असं वाटत असेल, त्याला त्याग हा केलाच पाहिजे!' हें महात्माजींचें वाक्य त्याच्या कानांत सारखें घुमत होतें. त्या वाक्यांनें त्याच्या अंतरंगाचा ठाव घेतला होता.

आज त्यानें पहिल्यादांच महात्माजींचें भाषण ऐकलें होतें. तें यापूर्वी ऐकण्याचा योगच मुळीं आला नव्हता त्याला. त्याचें आजपर्यंतचें

सारें शिक्षण सांगलीस झालेलें; आणि तेंही त्याच्या वडिलांच्या—आबाच्या करड्या देखरेखीखालीं. पिंजऱ्यांतल्या पोपटाचें जिणें कंठावें लागत होतें त्याला. आबा घालतील त्या शाळेंत जायाचें, ते देतील ते कपडे घालायचें, ते सांगतील त्या मुलांशीं खेळायचें, हिंडायचें............

आबा हे तेथील पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट असल्यानें—आणि म्हणूनच राजनिष्ठ असल्यानें, त्यांना आपला मुलगाही पण आपल्याच प्रमाणें राजनिष्ठ व्हावा, असें वाटत होतें; कॉंग्रेसनें मा—बाप सरकाराविरुद्ध बंड पुकारल्यानें त्यांचा तिच्यावर भयंकर रोष होता. आणि जीवनाची विचारसरणी आपल्याप्रमाणेंच बनावी, म्हणून ते तो लहान असल्यापासूनच त्याला इंग्रजांच्या शौर्याचें, ब्रिटिश सरकारांच्या मुत्सद्देगिरीचें, त्यांचें हिंदुस्थानांत राज्य सुरू झाल्यापासून हिंदुस्थानच्या झालेल्या फायद्याचें ( ! ) रसभरीत वर्णन करून सांगत; आणि म्हणूनच ते त्याला ज्ञानप्रकाश अगर टाईम्स खेरीज इतर वर्तमानपत्रें वाचूं देत नसत. पुस्तकेंहि पण ते देतील तींच त्यानें वाचावीं, हा त्यांचा आग्रह असे; आणि आपल्या नांवाला, दर्जाला, साजेलसें वर्तन ठेवण्याबद्दल ते त्याला नेहमीं बजावत.

आणि म्हणूनच जीवन जात असलेल्या शाळेंत एकही मुलगा, फार काय एकही मास्तर सूट वापरत नसतां, ते त्याला सूट घालणेंस लावीत. अंतिम उद्देश हाच कीं, पुढें तो साहेबी वळणावर जावा आणि त्याबरोबर शाळेंतील मुलांवर व मास्तरांवर त्याचा पगडा बसावा. तो एक बड्या अधिकाऱ्याचा मुलगा असल्याची गोष्ट सदोदित त्यांच्या नजरेपुढें उभी राहावी.

प्रथम प्रथम आबांच्या सांगण्याप्रमाणें वागण्यास जीवनला बरें वाटे. तो शाळेंतील मुलांबरोबर अतिशय फटकून वागे. मास्तरांबरोबरचें त्याचें वर्तन देखील उद्धटपणाचेंच असे.

पण पुढें जसजसा तो मोठा होऊं लागला, शाळेंतल्या शाळेंत कां होईना, बाहेर राष्ट्रांत स्वातंत्र्याप्रित्यर्थ चाललेल्या चळवळी विषयींची हकीकत त्याच्या वाचनांत येऊं लागली, मोठमोठाले पुढारी कॉंग्रेसनें आरंभिलेल्या लढ्यांत भाग घेत असल्याचें त्याला कळूं लागलें, नेहरू पितापुत्रांसारखे श्रीमान् लोक, विपुल ऐश्वर्यावर लाथ मारून देशासाठीं कंगाल बनल्याच्या गोष्टी त्याच्या कानावर येऊं लागल्या, तेव्हां त्याला त्याची चूक कळून चुकली. त्याच्या डोळ्यांवर आलेली श्रीमंतीची झांपड नाहींशी झाली.

आतां तो विद्यार्थ्यांशीं मिळून मिसळून वागू लागला. त्यांच्याशीं पुष्कळ विषयांवर खल करूं लागला. घरीं मिळत नसताही आणि आबांनीं बंदी केली असतांही, तो चोरून शाळेंत व लायब्ररींत यंग इंडिया, नवा-काळ, केसरी, नवजीवन इत्यादि राष्ट्रीय वृत्तीचीं व राष्ट्रीय बाजूनें लिहिणारीं वर्तमानपत्रें वाचूं लागला. महात्माजींचें आत्मचरित्र, नामदार गोखल्यांचीं भाषणें, शि. म. परांजपे यांचे काळमधील लेख, इत्यादि पुस्तकेंही पण त्यानें वाचलीं. आणि त्याची मनोभूमिका अगदीं निराळ्या रीतीनें तयार होऊं लागली.

आजपर्यंत आपण जें करीत आलों, तें बरोबर नसल्याचें त्याचें मन त्याला सांगूं लागलें, त्याच्या वडिलांच्या सांगण्याप्रमाणें वागल्यानें कदाचित् त्याचा आर्थिक फायदा झाला असता; त्याच्या वडिलाप्रमाणेंच तो एखाद्या अधिकाराच्या जागेवर गेला असता; पण त्यामुळें त्याला अध्यात्मिक उच्चतेला पोहोंचता आलें नसतें. राष्ट्राचा एक घटक या नात्यानें त्याच्यावर असलेली जबाबदारी तो पार झुगारून देत असल्याचें त्याला वाटूं लागलें आणि त्याच्या मनाला सारखी चुटपुट लागून राहिली.

राष्ट्रासाठीं आपण कांहीं तरी करावें असें त्याला वाटे; पण तसें करण्यास त्याचें मन धजत नसे. त्याला त्याच्या वडिलांची मोठी भीति वाटत होती, त्यांच्या इच्छेविरुद्ध जाणें म्हणजे......

चार महिन्यांपूर्वीचा एक प्रसंग आठवला त्याला.......

पहिल्या वर्षाच्या षण्मासिक परिक्षेचा निकाल लागला होता आणि जीवन तीनही तुकडींत पहिला आला होता.

आबांना अतिशय आनंद झाला होता. त्यांनीं त्याची पाठ थोपटली होती आणि प्रेमानें त्याला जवळ घेऊन ते म्हणाले होते, 'बेटा. असाच नेहमीं पहिला नंबर पटकावीत जा आणि एकदांचा आय. सी. एस. हो! तुला एका मोठ्या सरकारी हुद्या·या जागेवर असल्याचं पाहिलं, म्हणजे माझ्या साऱ्या प्रयत्नांचं चीज होईल....'

'मला नाहीं करायची आबा सरकारी नोकरी' आबांच्या गोड वागणुकीनें निर्भय बनलेला जीवन एकदम बोलून गेला होता. 'त्यांपेक्षां मी राष्ट्रोद्धाराचं कार्य हातीं घेईन. सुभाषबाबूंनी नाहीं का आय्. सी. एस् होऊन देखील देशासाठीं स्वतःस वाहून घेतलं! तसंच मी माझ्या उच्च शिक्षणाचा उपयोग हजारों अशिक्षित देशबांधवांच्या उन्नतीसाठी, त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठीं करीन. महात्मा गांधीनीं देखील······'

'गप्प् बैस मूर्खा!' संतापलेले आबा ओरडले होते; 'माझ्यापुढं असलं भाषण करायला लाज नाही वाटत? म्हणे गांधी आणि महात्मा! कुठं वाचलंस तूं त्यांच्या नावामागं महात्मा हें विशेषण लावलेलं! टाइम्स कांही लावत नाहीं. दुसरीं वर्तमानपत्रं खात्रीनं वाचत असला पाहिजेस तूं. तसं नसतं तर, तूं अशा रीतिनं मुळींच बोलला नसतास. तरी मी तुला वेळोवेळीं बजावीत आलों आहे कीं·········'

' बरं राहूं दे ते ' इतका वेळ काहींही न बोलतां गप्प बसलेल्या करुणाबाई—जीवनच्या आई-ईं प्रकरण तेथेंच आटोपतें न घेतल्यास तें भलतीकडे वहावत जाईल आणि मग त्याला पायबंद घालणें कठीण जाईल, ही गोष्ट जाणून मध्येंच म्हणाल्या होत्या. ' किती झालं तरी जीवन अजून पोर आहे, त्याच थोडसं चुकलं म्हणून......'

' पण······'

' राहूंदे म्हणतें ना मी ! ' करुणाबाई किंचित् स्वर चढवून पण अत्यंत काकुळतीनें म्हणाल्या होत्या आणि आबा शांत होतांच विषयांतर करण्याच्या उद्देशानें त्यांनी जीवनला विचारलें होतें, कायरे जीवन, तुझ्यांत नी दुसरा नम्बर आलेल्या मुलांत किती मार्कांच अंतर पडलं ? '

' बावीस मार्कंच. '

' अस्सं ! ' करुणाबाई डोळ्यांच्या कोपऱ्यातून आबाकडे पहात म्हणाल्या होत्या. 'आहेच मुळीं माझा बाळ हुशार ! आंत चल प्रिन्सिपाल-कडून आलेलं अभिनंदनपत्र दाखविते तुला मी. '

जीवन कांहींही न बोलतां करुणाबाईच्या मागोमाग त्यांच्या झोंपण्याच्या खोलींत आला होता आणि दोघेंही डाव्याबाजूच्या भिंतीलगत असलेल्या कॉटवर शेजारी शेजारी बसतांच, त्याच्याकडे निश्चल नजरेनें पहात करुणाबाई म्हणाल्या होत्या, ' बेटा जीवन, आज तू माझ्या डोळ्यांचं पारणं फेडलंस ! '

' ते कसं आई ? मी परिक्षेंत पहिला आलों म्हणून ? '

' तूं पहिला आल्यामुळं मला आनंद झाला खरा ! पण मला जो हर्ष झाला आहे, तो तूं त्यांना मगा दिलेल्या खणखणींत उत्तरामुळं. '

' म्हणजे आई......? '

'बरोबर आहे तुझा तर्क. जीवन, तुझ्या त्या उत्तरानं त्यांच्या पायाची तिडीक मस्तकास जाऊन भिडली, पण त्याच तुझ्या उत्तरानं माझं हृदय आनंदातिशयानं भरून निघालं. मी निराश होऊन, सोडून देण्याचा बेताला आलेलं आशा–बीज अंकुरलं. अन् ते जर कां त्यावेळीं तिथं नसते तर आनंदानं बेहोष झालेली मी, तुला घेऊन अभिष्टासारखी सर्व घरभर नाचलें देखील असतें.'

'पण तें कां?'

'तें कां?' करुणाबाई आपल्या भिवया वरचढवीत म्हणाल्या होत्या. 'जीवन, तिकडच्या सागण्याप्रमाणें प्रत्येक गोष्ट करणारा तूं, त्यांच्या वळणावर जाशील, आपला जीवन–हेतू सरकारी नोकरी करून पैसा मिळविण्यांत आहे, अशी स्वतःची ठाम समजूत करून घेशील; त्याबरहुकूम तूं पुढं वागशील, असं मला वाटे; नी म्हणूनच माझं मन नेहमीं उदास असे. कित्येकदां मी तासन् तास रडतही पण असे. अन् तूं माझा मुलगा नसून, त्यांचा मुलगा असल्याची गोष्ट मी माझ्या मनावर बिंबाविण्याचा प्रयत्न करीत असे.

पण आज मला कळलं की, तूं माझाच मुलगा आहेस, मला हवा असलेला स्वाभिमान तुझ्यांत आहे. देशप्रेमही पण आहे नी तुला तुझ्या कर्तव्याची जाणीवही आहे. अन् मी प्रयत्न केल्यास अजूनही तुझी मनोभूमिका मी हवी तशी बनवूं शकेन......'

'अशा भिन्न मनोवृत्तीच्या माणसाशी तू लग्न कसं केलस आई! नी केलंस ते केलंस, पण आबा दाखवित असलेला मार्ग चुकीचा असल्याचं माझ्या निदर्शनास आणून देऊन, योग्य तो मार्ग यापूर्वीच मला का तू दाखविला नाहींस!'

'अजून पोर आहेस तूं जीवन ! आजच्या तरुणांच्या गोष्टी दृष्टीसमोर ठेऊन, तूं बोलतो आहेस. अन् इथं तर चुकतं तुम्हां हल्लींच्या मुलांचं. माझं लग्न झालं, त्यावेळच्या नि आजच्या स्त्रियांची गोष्ट अगदीच निराळी आहे. हल्लींची वधू स्त्री असते, आमच्यावेळीं ती मुलगी असे; नुकतंच परकर सोडून देऊन लुगड नेसलेली पोर असे. तिला तिच्या आवडी निवडीची, बऱ्यावाईटाची, जाणीव होण्यापूर्वीच तिच्या पालकांनीं स्वतःच्या आवडीनिवडी बरहुकूम निवडलेल्या वराशीं लग्न करून, तिला संसाराचा गाडा हाकावा लागत असे.

पती पत्नी हे संसार--शकट हाकणारे दोन बैल असं आजचे तरुण मानतात. हीच उपमा जर का आमच्या पीढीला लावायची झाल्यास पत्नीला बैल तर पतीला गाडीवान कल्पावं लागेल. अन् तूं जाणतोसच की, गाडीला जुंपलेल्या बैलाच्या इच्छेप्रमाणं कांहीं गाडीवान गाडी हांकीत नसतो. माझ्या गाडीवानाच्या इच्छेप्रमाणं मी आजपर्यंत माझ्या संसाराचा गाडा ओढीत आलें आहें. कित्येकदां माझा स्वाभिमान उचल खाई, माझा मूळ स्वभाव जागृत होई, पण त्यामुळं ओढवणाऱ्या संकटावर दृष्टि ठेऊन, मी तो आंतल्या आत दाबून टाकून, ते नेहमीं विनोदानं म्हणतात तसं एक मुकं मेंढरुं असल्याचं मी फिरफिरून माझ्या मनावर बिम्बविण्याचा प्रयत्न करीत असे.

तूं माझ्या पोटचा गोळा असून, तुझ्यावर माझा हक्क नसावा, सत्ता नसावी, तुला लहानाच थोर करण्यासाठीं, तुझं पालन पोषण करण्यासाठीं ठेवलेल्या एखाद्या बिनपगारी दाईहून माझी किंमत अधिक नसावी, ही गोष्ट माझ्या हृदयाचा दाह करीत होती.

पण आज मात्र तो दाह थोडा का होईना, शांत झाला. तुला तुझ्या

कर्तव्याची जाणिव झाल्याचं, मी न शिकवितां जाणीव झाल्याचं पाहून मला अत्यानंद झाला. '

' पण तूं आपलें विचार आजपर्यंत माझ्याजवळ कां बोलून दाखविले नाहींस, हा प्रश्न तसाच राहिला आई ! '

' तो मी टाळण्याचा प्रयत्न करते आहे असं समजूं नकोस तूं जीवन. थोडासा दूर दृष्टीनं विचार कर. तूं लहान असतां, तुझं बरं वाईट कळण्याइतकी तुझी बुद्धि प्रगल्भ झाली नसतां, मी जर कां तिकडच्या विरुद्ध तुला कांहीं सांगू लागलें असतें, तर तूं तुझ्या बाल बुद्धिला पोंच न राहून, ते त्यांच्याजवळ बोलून गेला असतांस नि अकारण घरांत दुही माजली असती. दुही कसली म्हणा ! मलाच नमतं घ्यावं लागलं असतं. चुकलें म्हणून त्यांची क्षमा मागावी लागली असती ! अन् गोगल गाय बनून, मूग गिळून स्वस्थ बसावं लागलं असतं, तरीही त्यांचं मजविषयीं कलुषित झालेलं मन निवळलं नसतं. उलट त्यांची सारखी करडी नजर राहिली असती माझ्यावर.

पण आज, तूं त्यांच्या तोंडावर आपले प्रांजल विचार बेधडकपणें बोलून दाखविण्याचं धैर्य दाखवितांच, तुला तुझं बरं वाईट कळण्याचं ज्ञान उत्पन्न झाल्याची तूं मला जाणीव करून दिलीस. म्हणूनच मी इतके दिवस माझ्या मनांत सांठवून ठेवलेले विचार आज तुजपुढें मांडले, अन् वेळ पण किती छान जमून आली आहे, तुझ्या वाढदिवसा दिवशीं...... '

' अन् महात्माजींच्या पण......'

' खरं ! ' करुणाबाईच्या चेहऱ्यावर आश्चर्याबरोबर आनंदाचीही छटा उमटली होती.

' इतकंच नव्हे, तर आज गांधी जयंतीनिमित्त गांधी मैदानावर मोठी सभा भरणार असून, मोठमोठ्या पुढाऱ्यांचीं महात्माजींच्या गुण-वर्णनपर भाषणं होणार आहेत. '

' मग तूं राहणार आहेस कां सभेला हजर? '

' हो! पण आबाना कळलं तर?...... '

' ते थोडंच तूं कुठं गेला आहेस म्हणून चौकशी करणार आहेत?'

' ठीक. मग मी जातोंच सभेला. '

वरील प्रसंगाची आठवण करीत जीवन सभामंडपांत उभा असतां, लोकांच्या झुंडीच्या झुंडी व्यासपीठाकडे लोटत असल्याचें त्यानें पाहिलें. सहज कुतूहलतेनें तो तिकडे जाऊन पाहतो, तों महात्माजी लोकांनीं पुढें केलेल्या वह्यावर स्वाक्षरी देत होते.

जीवनालाही पण त्यांची स्वाक्षरी घेण्याची इच्छा झाली. त्यानें आपली रोजनिशी उघडून महात्माजींच्या पुढें केली.

तेव्हां त्यांच्या शेजारीं बसलेल्या आणि नखशिखांत खादी वेष परिधान केलेल्या गृहस्थानें पैशाकारितां हात पुढें केला.

' पैसे कशासाठीं? ' जीवननें विचारले.

' महत्माजी पैसे घेतल्यावांचून स्वाक्षरी देत नाहींत. ' तो गृहस्थ उत्तरला.

' हा पैसा कोणत्या कार्यासाठीं खर्चिला जातो ? '

' राष्ट्रकार्यासाठीं. कॉंग्रेसनं आरंभिलेल्या स्वातंत्र्य यज्ञासाठीं. '

' स्वातंत्र्य यज्ञासाठीं ? ' जीवन आनंदानं म्हणाला, ' मग घ्या तर हे पांच रुपये. '

जीवननें खिशांतून झटकन् पांच रुपयाची नोट बाहेर काढली आणि ती त्या गृहस्थाच्या हातावर ठेवली.

हा सर्व प्रकार घडत असतां, महात्माजी बारकाईनें नखशिखांत परदेशी गरम सूट परिधान केलेल्या जीवनकडे पाहात होते.

जीवनने आपली रोजनिशी उघडून त्यांच्यापुढें धरतांच ते म्हणाले, ' कशाकरितां हवी तुम्हांला माझी स्वाक्षरी ? '

जीवनला तो प्रश्न अनपेक्षित वाटला आणि त्याला काय उत्तर द्यावें हें न सुचल्यामुळें तो म्हणाला, ' मला नाहीं कळला तुमच्या प्रश्नाचा आशय.........'

' माझ्या प्रश्नाचा आशय हाच कीं, हे सर्वजण माझी स्वाक्षरी घेताहेत म्हणूनच कां तुम्हीही घेताहात ? '

' मुळींच नाही. '

' मग कशासाठीं ? '

' मला ती मनापासून घ्याविशी वाटतें म्हणून '

' पण ती कां ? ' महात्माजींनीं आपली तीक्ष्ण नजर जीवनच्या चेहऱ्यावर भिडविली होती.

' तुमच्याबद्दल माझ्या मनांत अतिशय आदर वसत असून, तुमच्या लिखाणाचा मी सुक्ष्मतेनं अभ्यास करीत आहे.......'

' मग माझ्या सांगण्याप्रमाणं वागण्याची तुमची तयारी असेल ? '

' शक्य असल्यास...... '

' शक्य असल्याशिवाय कां मी तुम्हांला कोणती गोष्ट करण्यास सांगणार आहे ? ' महात्माजींच्या चेहऱ्यावर स्मित झळकलें.

' मग सांगा तर ' खजील झालेला जीवन म्हणाला,

' नुसतं सांगलच नाहीं तर स्वाक्षरी बरोबर तुमच्या रोजनिशींत लिहून देतो. पण तुम्ही त्याप्रमाणं वागलं पाहिजे हं ! '

जीवननें होकारार्थी मान हालवितांच, महात्माजींच्या चेहऱ्यावर समाधानाचें हास्य झळकलें. स्निग्ध नजरेनें त्याच्याकडे पाहून ते लिहूं लागले--' प्रत्येकानं, आपल्या राष्ट्रासाठीं, समाजासाठीं, फार काय आपल्या प्रिय व्यक्तीसाठीं थोडा फार त्याग हा केलाच पाहिजे. वेळ प्रसंगीं प्राणाहुति पण देण्यास तयार झालं पाहिजे, आणि याची सुरवात त्यानं शुद्ध खादी वापरण्यापासून केली पाहिजे '

लिहून होतांच रोजनिशी जीवनला देत महात्माजी म्हणाले ' मग काय, वापरणार ना खादी ? '

जीवननें होकारार्थी मान हालवतांच ' शाबास ! ' म्हणून महात्माजींनीं प्रेमानें त्याच्या पाठीवर थाप मारली, आणि त्याला आशिर्वाद दिला.

जीवनच्या अंगांत नवें चैतन्य खेळूं लागलें. त्याला एकाएकीं नवी दृष्टि लाभली. त्याच्या नसनसांतून अननुभूत अशा आनन्द-लहरी उसळूं लागल्या. बुद्धाला बोधी उत्पन्न झाल्यावेळीं जितका आनंद झाला नसेल, तितका त्यावेळीं आनंद त्याला झाला.

तो तडक खादीवस्त्र भांडारकडे वळला. त्यानें एक धोतरजोडी, नेहरू-शर्ट, व गांधी टोपी खरेदी केली; आणि ती तेथेंच अंगावर चढवून तो आनंदानें घराकडे निघाला.

पक्षी मंजुळ गीत गात होतें. वारा त्याना साथ करीत होता, आणि तन्मयतेनें ऐकणारी सृष्टी मान डोलवीत होती.

जीवनला वाटलें, जिकडे तिकडे आनंदी आनंद आहे !

# २

बेफिकीरपणें रस्ता चालणारा जविन बंगल्याच्या फाटकापुढें येतांच थबकला. त्याला त्याच्या वडिलांची आठवण झाली. त्यांची ती करारी व उग्र मुद्रा, कॉंग्रेसचें आणि विशेषत: गांधींचें नांव काढतांच वक्र होणाऱ्या त्यांच्या भुवया आणि क्रुद्ध बनणारे त्यांचे डोळे त्याच्या मनःचक्षूपुढें उभे राहिले, आणि त्याचा सारा आनद ओसरून, त्याची जागा खेदमिश्रित भीतीनें घेतली.

पण क्षणभर बावरलेलें आपलें मन लगेच सावरून तो स्वत:शींच पुटपुटला, ' एकदां निर्धार केला तो केला. तो कालत्रयींही ढळणार नाहीं. '

त्याच्या मनाचा ठाम निश्चय झाल्यासारखा दिसला मनगटावरील घड्याळाकडे पहातच त्यानें फाटक उघडले, आणि पाठमोरा होऊन, तो तें बंद करीत असतां, कुणीतरी फाटक उघडल्याचा आवाज ऐकून, बाहेर आलेल्या करुणाबाईंनीं त्याला पाहिलें.पण त्यांनीं कांहीं त्याला ओळखलें नाहीं. आज लजपतराय दिन असल्यानें तत्संबंधीं कांहीं कामासाठीं कुणीतरी कॉंग्रेस कार्यकर्ता आबांच्याकडे आला असेल,या समजूतीनें त्यांनीं तेथूनच विचारलें, ' कोण पाहिजे आपणांस? '

आणि जेव्हां कां जीवननें मागें वळून त्यांच्याकडे पाहिले, तेव्हां त्या दचकून मागें सरल्या. आणि महदाश्चर्यानें उद्गारल्या, ' कोण तूं...! जीवन......'

' होय आई ! '

जीवन आंत आला आणि तडक जिना चढून वर गेला. विस्मयचकित झालेल्या करुणाबाई त्याच्या मागोमाग वर येऊन म्हणाल्या, ' काय केलंस तूं हें ? '

' त्यांत इतकं आश्चर्यचकित होण्याजोगं काय आढळलं तुला आई ? आजपर्यंत मी मनांतल्या मनांत करीत असलेले निश्चय, आज प्रत्यक्षांत उतरविले इतकंच काय तें. '

' पण जीवन, तूं मागचा पुढचा विचार केला आहेस कां ? '

सर्वांग थरथर कापणाऱ्या करुणाबाईंना आपला तोल सांभाळणें कठीण झाल्यानें त्या कोपऱ्यातल्या कॉटवर जाऊन बसल्या. जीवनही पण चटकन् पुढें होऊन त्यांच्या शेजारी बसत म्हणाला, ' तुला कशाची भीति वाटते आई ? मी केलेली गोष्ट तुला आवडली ना ? '

' ती मला आवडून काय उपयोग ! त्यांना आवडली पाहिजे ना ! महात्माजींचं नांव काढतांच, ज्यांच्या पायाची तिडीक मस्तकास जाऊन भिडते, त्यांचा प्रत्यक्ष मुलगा तूं त्यांची शिकवण स्वतःत उतरविल्याचं पाहताच, त्याना काय वाटेल ! ते तुझ्यावर किती संतापतील याची कांहीं आहे कां तुला कल्पना ? '

' पण आई, तूंच नाहीं कां मला वेळोवेळीं उत्तेजन देत गेलीस ? ' गोंधळलेल्या मनःस्थितीतच जीवननें विचारलें.

' मी तुला तसा धडा देत आलें खरी, पण तो तूं इतक्या लवकर कृतींत उतरवाशील असं मात्र मला केव्हांही वाटलं नव्हत. त्यामुळं त्यांची तुझ्यावर अवकृपा होईल, तूं त्यांच्या मर्जीतून उतरशील.

जीवन, जोंपर्यंत तुझं शिक्षण पुरं झालं नाहीं, जोंपर्यंत स्वतःच्या पायावर उभं राहण्याची ताकद तुझ्या अंगात आली नाहीं, तोंपर्यंत तुला

तिकडच्या इच्छेविरुध्द जाऊन इच्छिलेलं कार्य नेटानं करतां यायचं नाहीं. तुला या कपड्यांत पाहून त्यांचा तुझ्यावर रोष होईल. वेळप्रसंगीं ते तुला घराबाहेर काढण्यास देखील मागं पुढं पाहणार नाहीत; अन् अशा स्थितींत, अर्धवट शिक्षण संपादन केलेला तूं जर कां घराबाहेर पडलास, तर तुझ्या पोटापाण्याचा प्रश्न तुझ्यापुढं दत्त म्हणून उभा राहील. मग देशकार्य तर बाजूलाच राहो.'

'मग मी काय करावसं वाटतं तुला ?' प्रश्न विचारीत असतां जीवनचें अन्तःकरण पिळवटून निघाल्या सारखें झालें होतें.

'तू आधीं शिक्षण घ्यावंस. अन् तें घेत घेत राजकारणाचा अभ्यास करावास. शिक्षण पुरं झाल्यानंतर काय करायचं, कोणत्या मार्गानं जायचं, इच्छिलेलं बेत कसे तडीस न्यायचे याची पद्धतशीर आंखणी करावीस, पण प्रत्यक्ष असं कांही करूं नये. तुझं शिक्षण पुरं झाल्यावर, स्वतःच्या पायावर उभं राहण्याची ताकद तुझ्या अंगांत आल्यावर, तूं विचाराबर-हुकूम आपला आचार बनविण्यास हरकत नाहीं, त्यावेळीं तूं त्यांच्या रोषाची जरी पर्वा केली नाहींस, तरी त्यामुळं तुझं फारसं नुकसान होणार नाहीं.'

'ती वेळ आतां टळून गेली आहे आई.खादी वापरण्यांची प्रतिज्ञा आजच मी महात्माजीपुढं करून चुकलों आहे !'

'काय महात्माजीपुढं ?'

'होय. त्यांच्या भाषणानंतर स्वाक्षरी घेण्यासाठीं मी त्यांज्याकडं गेलों असतां, त्यांनीं मला खादी वापरण्यास सांगितलं. अन मी तें कबूल करतांच, त्यांनीं आपली स्वाक्षरी दिली. ही पहा ती.' म्हणून जीवननें झटकन् खिशांतून आपली रोजनिशी बाहेर काढली आणि ती उघडून करुणाबाईच्या पुढें धरीत तो म्हणाला, 'तूंच सांग आई, आतां मी जर कां हे खादीचे कपडे फेंकून देऊन, तो पूर्वीचा पस्तेकी सूट

चढविला तर, ते बरं दिसेल कां ! सांग आई, थोड्यावेळापूर्वी निर्धार केलेल्या मनुष्यानं, तासाभराचा काळ लोटतां न लोटतो तोंच, तो झुगारून दिल्यास, त्याच्या हातून पुढं कांहीं कार्य घडेल कां ? अशा मनुष्याच्या शब्दावर कोण विश्वास ठेवील कां ? '

करुणाबाई कांहीं बोलल्या नाहींत. जमिनीकडे दृष्टि भिडवून त्या विचारमग्न झाल्या होत्या.

त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन, जीवन म्हणाला, ' तुला माझा राग आला आई ? '

' वेड्या, तुझ्यावर मी कधी तरी रागावणं शक्य आहे कारे? ' आपल्या विचार तंद्रीतून जागया झालेल्या करुणाबाई, निश्चल नजरेनें जीवनकडे पहात म्हणाल्या, ' मी जी एकाएकीं स्तब्ध झालें, तें माझं मन गोंधळल्यामुळं, काय करावं हें न सुचल्यामुळं. तूं महात्माजींपुढं केलेला निर्धार कळण्यापूर्वी, तूं आतांच खादी वापरूं नयेस, असं मला वाटत होतं. पण आतां तूं खादी वापरण्याचं महात्माजींना अभिवचन दिल्यावर, विदेशी वस्त्र परिधान करणं म्हणजे, माणुसकीला न जागण्यासारखं आहे असं मला वाटतं...... '

' खरं ! अगदी खरं ! ' जीवनचा चेहरा फुलला.

' पण त्याबरोबर त्यांचा तुझ्यावर जो रोष होईल, त्याचं काय करायचं हा माझ्यापुढें प्रश्न होता, नि म्हणूनच मी चिंताग्रस्त झालें. '

' माझ्या आईचा जर कां माझ्यावर अखंड वरदहस्त असेल, तर सारं जग जरी माझ्यावर उलटलं, तरी त्याची मी कदर बाळगणार नाहीं.'

' तरी तुला तुझ्या वडिलांची कदर ही बाळगलीच पाहिजे. '

तोंच मोटरीचा हॉर्न वाजला. आबा आल्याची वर्दीच होती ती.

' लवकर येणं झालं आज ! ' म्हणत करुणाबाई ताडकन् उठून उभ्या राहिल्या, आणि भीतीनें सर्वांग थरथर कांपत त्या म्हणाल्या, ' गेलंच पाहिजे आतां मला खालीं. अन् बरं का जीवन, मी हांक मारल्यानंतरच तूं खाली ये. नि मी विचारीन तेवढ्याच प्रश्नाचीं उत्तरं दे. अन् ते काहीही बोलले तरी तोंडांतून शब्द म्हणून बाहेर काढूं नकोस... '

' पण...... '

' माझ्या गळ्याची शपथ आहे तुला. ' घाई घाईनेंच जिन्याकडे वळत करुणाबाई म्हणाल्या, ' मी सांगितलेलं विसरूं नकोस हं ! '

जीवन कांहींही न बोलतां सुन्न मनानें कॉटवर पडून राहिला.

* * *

जिना उतरून खालीं येतांच, करुणाबाईनी डोळ्यांत तरंगणारे अश्रू पुसले आणि आपल्या तोंडापुढें ज्ञानप्रकाश धरून, त्या दाराजवळच्या कोचावर बसल्या.

त्यांनीं तोंडापुढें ज्ञानप्रकाश धरला होता खरा; पण त्यांची नजर होती बाहेरून रागारागानें आंत प्रवेश करणाऱ्या आबांच्याकडे.

करुणाबाईंना पाहतांच, आबा क्रोधातिशयानें ओरडले, ' कुठं आहे तो कारटा ? '

' कां ? '

' कां ? ' आबा आश्चर्यानें उद्‌गारले, ' जी गोष्ट आतां सर्वांना कळून चुकली आहे, ज्या गोष्टीचा बभ्रा सर्व गांवभर झाला आहे, ती गोष्ट तुला कळूं नये ? आश्चर्य आहे ! '

' पण ' ती गोष्ट ' ' ती गोष्ट ' म्हटल्यानं काय बोध होणार मला? '

' अन् बोध झाला नाहीं म्हणूनच तूं इतक्या शांतपणानं गोष्टी करते आहेस. कारट्यानं माझ्या तोंडाला डांबर फासलं. मी आजपर्यंत दिलेलं

बहुमोल शिक्षण मातीशीं मिळवलं. कोर्टात जेव्हां का चपराश्यापासून तों सीनियर वकिलापर्यंत सारेजण माझ्याकडे पाहून फिदफिदां हंसत व कुजबुजत, तेव्हां मी शरमेनं मान खालीं घालीत असें. मला अधिक वेळ तिथं न बसवल्यानं मी मध्येंच उठून आलों... '

' पण एवढं वैतागायला काय झालं ? ' करुणाबाईनीं सोंगाची बतावणी मात्र खूप केली होती.

' वैतागायला काय झालं ! ' आबा अधिकच वैतागून म्हणाले, ' अग, कारटा आज गांधीच्या सभेला हजर राहिला, इतकंच नव्हे तर त्याच्या बुवाबाजीला भाळून त्यानं खादी वापरण्याची शपथ घेतली. '

' अस्सं ! '

' आतां तूंच सांग, मी संतापतों आहे तें बरोबर करतों आहे कीं नाहीं तें ! कारट्याचा मला इतका राग आला आहे कीं...........'

' कीं, ' वरच राहूं देत गोष्टी. ' करुणाबाई मध्येंच म्हणाल्या, ' मला ही गोष्ट केव्हांच कळली आहे, तरीही मी जी शांत आहें, ती कां मला ही गोष्ट आवडली म्हणून ! '

' मुळींच नाहीं. ' आबा ठांसून उत्तरले.

' झालं तर मग. मला जेव्हां का जिवननं आपण होऊनच ही गोष्ट सांगितली, तेव्हां तुमच्याप्रमाणंच मी त्याच्यावर भयंकर संतापलें, त्याची खूप निर्भत्सना केली, पण जेव्हां का त्याचा अनिष्ट परिणाम होत असल्याचं मला दिसलं, तेव्हां मी गप्प झालें. '

' अनिष्ट परिणाम ! '

' हो ! हीं मुलं किती भावनाप्रधान असतात, याची तुम्हाला कल्पना नाही. त्यांना एखादी गोष्ट मनापासून करावीशी वाटली कीं,

तीं मागचा पुढचा विचार न करतां ती करण्यास तयार होतात. अशा वेळीं जर का कुणी भाक दडपणानं त्यांना त्या गोष्टीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, तर खात्रीनं त्यांच्या हाताला अपयश आलंच म्हणून समजावं. प्रकरण अधिक चिघळण्याचाच संभव अधिक. तेंच जर कां कांहीं काळ जाऊं दिला, नि त्यांचं डोकं शांत झाल्यावर, चढलेला पारा उतरल्यावर, त्याना चार समजुतीच्या गोष्टी सांगून, त्यांची चूक त्यांच्या निदर्शनास आणून दिली कीं, त्याना पटते. कृतकृत्याबद्दल त्याना पश्चात्ताप वाटूं लागतो. अन् जितक्या धिशाडघाईनं ते ती अंगिकारतात तितक्याच घाईनं ते ती सोडून देतात. '

' मग मी काय करावस वाटतं तुला? ' करुणाबाईंच्या भाषणानें आबांचा चढलेला पारा उतरला खरा! पण त्यांचा जीवनविषयींचा संताप अस्तर्नातील निखाऱ्याप्रमाणें आंतल्या आंत धुमसत होताच.

करुणाबाई उठल्या आणि आबा बसलेल्या कोचाच्या दांड्याला रेलून उभ्या रहात म्हणाल्या, ' जीवन तुम्हाला भेटताच, मध्यंतरी कांहींच न घडल्यासारखं त्याच्याशीं वागा. त्याला शान्तपणें चार उपदेशाच्या गोष्टी सांगा. मी ज्याप्रमाणं माझ्या हृदयांत पेटलेल्या क्रोधाग्नीची छाया माझ्या चेहऱ्यावर मुळीच उमटूं न देण्याची खबरदारी घेतली आहे, तशीच तुम्हीं घ्या, नि त्याला समजावण्याचा प्रयत्न करा. तुमचं म्हणणं त्याला आतां पटणार नाहीं; पण कांहीं दिवसांनी आपोआप पटेल. अन् असा एक दिवस उजाडेल कीं, ज्या दिवशीं तो तुमच्याजवळ येईल नि कृतकृत्याबद्दल आपणास पश्चात्ताप वाटत असल्याचं सांगून, तुमची मनापासून क्षमा मागेल......'

' असं तुला वाटतं ! '

'वाटतं इतकंच नव्हे तर, मला त्याची खात्री आहे!' आपला फांसा बरोबर पडत असल्याचें पाहून, उल्हसित झालेल्या करुणाबाई ठासून उत्तरल्या, 'अन् मीही पण त्याचा मार्ग चुकला असल्याची गोष्ट वेळो-वेळीं त्याच्या मनावर बिम्बविण्याचा प्रयत्न करीनच.'

'ठीक'

आबांनी सूट उतरला, आणि धोतर नेसून, ते कोचावर बसले आणि टाईम्स चाळूं लागले.

'कॉफी आणूं का?' करुणाबाईनीं विचारलें.

आबांनी हुंकार देतांच, त्या आंत गेल्या, आणि थोड्या वेळानें एका ट्रेमधून कॉफीचे तीन कप घेऊन आल्या आणि आबांच्यापुढें टीपॉय ओढून त्यावर ट्रे ठेऊन, त्यांनीं हांक मारली 'जीवन......'

आबांनी टाईम्स खालीं ठेवला.

'काय आई?' जीवनने वरूनच विचारलें.

'कॉफी घ्यायची आहे ना?'

'हो!'

'मग ये तर खालीं. कपांत ओतली देखील आहे.'

जीवन सावकाश जिना उतरून खालीं आला, आणि आबांच्या शेजारच्या कोचावर बसला.

त्याच्या नखशिखांत खादीवेषावरून दृष्टि फिरवित असतां, आबांच्या कपाळावर लगेच आंठ्या पडल्या.

जीवनला ही गोष्ट कळली, पण मुद्दामच तिकडे दुर्लक्ष करून, त्यानं कॉफीचा कप उचलला, आणि कांहीं तरी विचारायचं म्हणून विचारलें, 'आज कोर्टांतून लौकर परतलांत तुम्ही आबा!'

' हो ! काम संपलं. आलों झालं. ' उसळणारा राग आंतल्या आंत दाबण्याचा प्रयत्न करीत आबा म्हणाले. तरीही त्याची छाया त्यांच्या चेहऱ्यावर पडल्यावांचून राहिली नाहीं.

जीवनला वाटलें यावेळीं अधिक न बोललेलंच बरें. नाहींतर आंतल्या आंत धुमसणाऱ्या ज्वालेचा स्फोट व्हायचा !

तो मुकाट्यानें कॉफी पिऊं लागला.

पण आबांनीच त्याला विचारलें, ' काय सांगितलं गांधींनीं आज ?'

जीवन थोडासा चपापलाच. आबांच्या प्रश्नाचा रोख कुणीकडे आहे हें चटकन् त्याच्या ध्यानीं आल्यानें, तो म्हणाला ' त्यांनीं स्वदेशीचं महत्व पटवून दिलं. '

' म्हणजे खादी वापरल्यानं स्वराज्य मिळत, असा जो त्यांनी शोध लावला आहे, तोच ठांसून सांगितला असल त्यांनीं. त्याबद्दल नोबल प्राईझ द्यायला हवं बेस्याला. '

जीवन यावर चांगलंच उत्तर देणार होता, पण करुणाबाईंनीं डोळ्यांच्या अभिनयानें गप्प राहण्यास सुचविल्यानें, तो मूग गिळून स्वस्थ बसला.

जीवनला आपण निरुत्तर केलें असें कल्पून आबा म्हणाले, ' खादी वापरल्यानं जर कां स्वराज्य मिळालं असतं, तर आज जी कित्येक राष्ट्रं पारतंत्र्यांत खितपत पडलीं आहेत ती पडलीच नसतीं. '

' खादी वापरल्यानं स्वराज्य मिळतं किंवा नाहीं हें जरी मला ठाऊक नसलं तरी, त्यानं देशाची बेकारी थोड्या अधिक प्रमाणांत नाहीशी होते एवढं मात्र खरं ' जीवनला शेवटीं बोलल्यावांचून राहवलं नाहींच.

' अरे पण ती बेकारी नाहींशी करायला याहून कितीतरी चांगले

मार्ग आहेत कीं. राजमार्गानें जाण्याचें सोडून देऊन, या आडमार्गांचा अवलंब करणं शुद्ध रानटीपणाचं आहे.'

'असेल! पण त्यानं इच्छित स्थळीं जातां येतं ना? झालं तर मग. माझ्या सारख्यांना आपला उद्योग संभाळून, अन्नपाण्यावांचून तडफडणाऱ्या आपल्या देशबांधवांना, साधी खादी वापरल्यानं थोडी फार मदत करतां येते हा काय थोडा फायदा झाला? कांहींच न करण्यापेक्षां हे काहीं वाईट नव्हे.'

'पण यामुळं तुझं स्वतःचं नुकसान होईल, याची काय वाट?'

'माझं नुकसान! नी तें कसं?'

'तें कसं?' आबा नीट उठून बसत म्हणाले, 'जीवन, वेड्या! तूं अशा या सोंगांत कॉलेजला जाऊं लागलास, मोठमोठ्या लोकांच्या गांठी भेटी घेऊं लागलास, तर प्रतिष्ठित समाजांत असलेलं तुझं वजन कमी होईल, समाजांत हल्ली तुला मिळत असलेला मान मरातब नाहीसा होऊन लोक तुला क्षुल्लक लेखूं लागतील, मग तूं नांवलौकिक कमाविण्याची, प्रतिष्ठितेला चढण्याची गोष्ट बाजूलाच राहो.'

'अहं! मला नाहीं असं वाटत' आबांचा युक्तिवाद न पटल्यानें जीवन म्हणाला' कपड्यावरून मोठेपणा ठरविण्याचे दिवस गेले आतां. तसं नसतं तर साध्या लुंगींत असणाऱ्या महात्मा गांधींच्या शब्दाला आज इतकं महत्व प्राप्त झालं नसतं. किंवा पूर्वायुष्यांत कपड्यांपायीं हजारों रुपयांचीं खैरात केलेले नेहरू पितापुत्र आज जाडी भरडी खादी परिधान कां करूं लागले असते? त्यामुळें त्यांची योग्यता तर कमी झाली नाहींच उलट ती इतकी वाढली आहे कीं, हिंदुस्थानभरच नव्हे तर सर्व जगभर त्यांचं नांव दुमदुमत आहे. त्यांचा......!'

'जीवन, कॉफी निवून चालली. झटदिशीं ती घेऊन टाक पाहूं.' म्हणून करुणाबाईंनीं जीवनच्या भलतीकडे वहात चाललेल्या भाषणाला वळी आळा घातल्यानें तो मानावर आला. त्यानें आपलें भाषण अर्धवट सोडलें. अधिक न बोलण्याचा त्याच्या आईनें दिलेला कानमंत्र बोलण्याच्या भरांत विसरल्याबद्दल त्याला वाईट वाटलें. आणि एकदम गप्प होऊन त्यानें कॉफीचा कप तोंडाला लावला.

# ३

जीवन प्लॅटफॉर्मवर यायला आणि गाडी सुटायला एकच गांठ पडली. तसाच तो एका उघड्या असलेल्या डब्याच्या दांड्याला धरून कसाबसा वर चढला आणि एकदाचा डब्यांत शिरला.

त्याला हायसं वाटलें. मुखावर तरळणारे विरळ घर्मबिंदु त्यानें पुसले आणि डब्याचें दार बंद करून घेऊन त्यानें सहज आंत वळून पाहिलें तों काय आश्चर्य! सबंध डबा रिकामा होता. नाहीं म्हणायला डावी-कडच्या कोपऱ्यांतल्या बांकावर तोंडापुढें कसलेसें पुस्तक धरून एक स्त्री बसली होती.

लगेच त्याला त्याची चूक कळून चुकली. घाईनें तो बायकांच्या डब्यांत चढला होता. पण याहूनही त्याला जर का कशाचें आश्चर्य वाटलें असेल तर तें त्या स्त्रीचें. त्याच्या अस्तित्वाची जाणीव नसल्या-प्रमाणेंच तिनें पुस्तकांत खुपसलेली आपली मान वर काढून रागानें त्याच्याकडे पाहिलें नव्हतें कीं, ' अय्या! तुम्हीं कसे या बायकांच्या डब्यांत?' असे नाकपुडी उडवीत फणकाऱ्यानें म्हटलें नव्हतें. ' अशीच बिचारी आणखी थोडा वेळ पुस्तकांत तोंड खुपसून बसूं दे. ' अशी जीवननें मनांतल्या तनांत आशा व्यक्त केली आणि तो तसाच दाराशीं रेलून उभा राहून बाहेर पाहूं लागला.

पण ती स्त्री कोण हे जाणण्याची इच्छा कांहीं केल्या त्याला आवरता येईना. त्याला वाटलें ' इतकी वाचनाची शोकीन ही बाई कोण आहे हे पहावं तर खरं ',

पावलांचा मुळींच आवाज न करतां तो थोडासा पुढें झाला आणि हळूच मान वळवून त्यानें चोरट्या नजरेनें त्या स्त्रीकडे पाहिले. तों... तो विस्मयानें मागे सरला. ती स्त्री म्हणजे दुसरी तिसरी कुणी नसून त्याची प्रिय मैत्रीण उपमा होती.

'बरीच वाचणारी झाली आहेस कीं ग !' म्हणून तिच्याजवळ जाण्याचा विचार त्याच्या मनांत आला आणि त्या हेतूनें तो तिच्यापुढें जाऊन उभा राहिलाही. तरीही जेव्हां का वाचण्यांत गर्क झालेल्या उपमेला त्याची दाद ना फिकीर दिसली, तेव्हां मात्र त्याला तिची थोडीशी गंमत करावीशी वाटली. तो हळूच ती बसलेल्या बांकावर पण तिच्याकडे पाठ करून बसला आणि मोठ्यांदा खाकरला.

आतां मात्र त्याच्या अपेक्षेप्रमाणें वाचन--तंद्रींतून जाग्या झालेल्या उपमेनें चमकून मागें वळून पाहिलें, आणि नखशिखांत खादी वस्त्र परिधान केलेल्या गृहस्थाला आपल्या शेजारीं बसल्याचें पाहतांच, हातांतील पुस्तक जोरानें बांकावर आपटून ती म्हणाली,' काय आडदांड असतात तरी हे लोक! कपडे तर दिसतात सभ्यगृहस्थाचे,अन् वागणं तर दिसतंय् अगदीं मवाल्याचं.' तरीही तो कांहीं न बोलतां गप्प बसल्याचें पाहून, ती संतापली आणि थोडासा स्वर चढवून म्हणाली, ' अहो देशभक्त,हा डबा बायकांचा आहे म्हटलं !'

'काय म्हटलंत !' म्हणून जीवननें मागें वळून पाहतांच, महदाश्चर्यानें उपमा उद्गारली. ' अगबाई तुम्ही... !'

'कां ? एवढ्यांतच ओळख विसरलीस वाटतं ?'

'मी तुमची ओळख विसरणं शक्य आहे का !' उपमा असें बोलून गेली खरी.पण लगेच बोलूं नये तें बोलून गेल्यामुळें कीं काय ती एकदम

गोरीमोरी झाली; तिचा चेहरा गंभीर बनला, पण आपल्या वृत्तींतील हा फरक जीवनच्या लक्षांत येऊं नये म्हणून, विषयांतर करण्याच्या हेतूनें ती म्हणाली, ' खरंच जीवन, तुम्हीं एकदम इतके कसेहो बदललांत ? '

' तुला हा फरक एकदम दिसतो उपमा. पण कितीतरी दिवसांपासून याची तयारी चालली होती माझी. काल माझा ठाम निश्चय झाला. अन् लगेच मी तो कृतीत उतरविला इतकंच काय तें. '

' अस्सं ! '

उपमा एकाएकीं गप्प झाल्याचें पाहून जीवन म्हणाला, ' पण तूं इतकी शान्त का ? मी खादी वापरू लागल्याचं पाहून, तुला आश्चर्य तर वाटलं नाहीं ना ! '

' कां वाटूं नये ? मागं कित्येकदां आपला या विषयावर वाद-विवाद झाल्याचं आठवतं का तुम्हांला ? मी स्वदेशीच्या बाजूनं बोलूं लागतांच, तुम्हीं नेहमीं विरुद्ध बाजू घेऊन भांडत होतां, तेच तुम्ही आतां खादी वापरू लागल्याचं पाहून मला कां आश्चर्य वाटूं नये ? '

' तुला तसं वाटणं साहजिक आहे, ' जीवन मन्द हास्य करीत म्हणाला, ' फार काय, त्यावेळीं मलाच जर का कुणी पुढं माझ्यांत हा फरक घडून येणार असल्याचं सांगितलं असतं, तर मी खात्रीनं उपहासानं हंसलों असतों, पण गेल्या सहा महिन्यांत माझ्या वृत्तींत असा कांहीं फरक पडत गेला कीं... '

' पण हा फरक तरी कायम टिकणारा आहे का ? ' उपमा खब-चटपणें म्हणाली.

' माझं गंभीर बोलणं असं थट्टेवारी नेऊं नकोस तूं उपमा ' जीवन गंभीर चेहरा करून म्हणाला, ' मी आजन्म खादी वापरण्याची प्रतिज्ञा कालच महात्माजींपुढं केली आहे. हें पहा ! '

त्यानें झटकन् आपली रोजनिशी उघडून उपमेपुढें धरली. महात्माजींच्या संदेशावरून नजर फिरवीत, पण मधून मधून डोळ्यांच्या कोपऱ्यांतून जीवनकडे पहात उपमा म्हणाली, ' अस्सं ! अगदीं बोलल्याप्रमाणें चालणार तर ! '

' हो ! ' जीवन ठांसून म्हणाला, ' पण उपमा, तुझ्यांत मात्र बोलण्यांत नि चालण्यांत तफावत दिसते खरी. '

' ती कशी काय ? '

' तूं मला नेहमीं खादीचं महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत होतीस, पण तुझ्या अंगावर मात्र कधींच खादी दिसली नाहीं.... '

' हो ! अस आहे खरं ' उपमा एक दीर्घ निःश्वास सोडून म्हणाली.

' पण तें कां ? '

' मी एक दुबळी स्त्री पडलें म्हणून. '

' एखादा प्रश्न उडवून लावायचा झाला तर तुम्हां बायकांना हा चांगला तोडगा आहे. '

' कांहीं तरीच .........'

' मग सारं कांहीं स्पष्टपणें सांग तर ! '

उपमा गप्प झाली. थोडीशी गंभीरही पण बनली, तेव्हां जीवन म्हणाला, 'मला सांगण्यासारखं नसल्यास माझा कांहीं आग्रह नाहीं. '

उपमेनें वर मान करून, त्याच्याकडे पाहिलें. ' मी आजपर्यंत कोणती गोष्ट तुमच्यापासून चोरून ठेविली आहे का ? मग काय बरं असं वेड्यासारखं बोलणं ? ' असेंच जणूं काय तिला त्यायोगें दर्शवायचें होतें.

मनाचा हिय्या करून, ती म्हणाली,' जीवन, माझ्या कपड्याची तर गोष्ट बाजूलाच राहो, पण इकडची काडी तिकडं हालवायची झाली तर मला माझ्या घरच्या मंडळींची परवानगी घ्यावी लागते.......... '

' पण हा प्रकार पूर्वी नव्हता. '

' त्यावेळी माझी आई जिवंत होती, आज तिची जागा माईनं घेतली आहे. '

' कळलं ! '

जीवन एकाएकी गंभीर झाला

' अन् म्हणूनच माझी खादी वापरण्याची इच्छा असतांही, मला ती आंतल्या आंत दाबून ठेवावी लागत आहे. तसं करतांना माझ्या मनाला यातना होतात, पण त्याचा मला आतां सराव करायलाच हवा. माईच्या तंत्रानं चालणारे बाबा, मला कुणाच्या गळ्यांत बांधतील हें कुणी सांगावं ? कदाचित्......'

' मग तूं तुला मनपसंत असा पति कां निवडत नाहीस ? '

उपमेने चमकून जीवनकडे पाहिले. आपली तीक्ष्ण नजर त्याच्या चेहऱ्यावर भिडवून, ती त्याच्या अन्तरंगाचा ठाव घेत होती. पण त्याच्या निर्विकार चेहऱ्यावरून कांही बोध न झाल्यानें, आपले टपोरे डोळे विस्फारून ती म्हणाली, ' अज्ञान जगाविषयींच आपलं अज्ञान प्रकट करतां आहांत तुम्ही जीवन ! समाजांत स्त्रियांना......'

' पण तें कोणत्या काळच्या ? ' जीवन मध्येंच म्हणाला. ' तूं म्हणतेस तशा प्रकारची स्थिती पूर्वी असेल, पण आज ? अन् त्यांत तूं कांहीं परकरी पोर नाहींस. परकरांत असतानांच ज्या मुलींची लग्नं होत असत, त्यांना लागू पडणारा नियम, तुला, कॉलेजांत जाणाऱ्या एका प्रौढ कुमारिकेला लागू करणं...... छे ! ही कल्पनाच मला कशीशी वाटते उपमा. तुझे वडील तुझ्या माईच्या तंत्रानं वागत असतील, पण ते तुझं लग्न तुझ्या इच्छेविरुद्ध एखाद्याशीं लावून देतील, हें शक्यच नाहीं मुळीं. अन् एखादे वेळेस ते तसं करूं लागले, तर तूं त्यांचा प्रतिकार करायला नको का ? '

‘ पण तें कशाच्या आधाराबर ? ’ फिरून आपली तीक्ष्ण नजर जीवनच्या मुखावर भिडवीत उपमा म्हणाली. ‘ मला मनपसन्त नसलेल्या वराशीं मी लग्न करण्याचं नाकारतांच, बाबांनीं जर का मला घराबाहेर पडण्यास सांगितलं, तर मी कुणाचा आश्रय घ्यायचा ? ’

जीवन चमकला. उपमेचा तो प्रश्न सहेतुक वाटल्यानें तो गोंधळला. त्याची वृत्ति बावरली. त्याचा उमललेला अधरोष्ठ थरारला. काय उत्तर द्यावें या घोर विवंचनेंत तो असतांनाच, गाडी विश्रामबाग स्टेशनवर येऊन उभी राहिली.

त्याला हायसें वाटलें. तो झटकन् दार उघडून खालीं उतरला, आणि झपाझप पावलें टाकीत रस्ता चालूं लागला.

त्याचे पाय रस्ता चालत होते, पण त्याचें मन ? प्लॅटफॉर्मवर इतर मुलींबरोबर बोलत, उभी राहिलेल्या, उपमेजवळ रेंगाळत होतें.

त्याच्या डोळ्यांपुढें तिची ती करुणार्द्र मूर्ति उभी राहिली होती आणि त्याच्या कानात तिचा तो प्रश्न घुमत होता, ‘ बाबांनीं जर का मला घराबाहेर पडण्यास सांगितलं, तर मी कुणाचा आश्रय घ्यायचा ! ’

आपल्याच तंद्रींत रस्ता चालत असतांना, त्याला आजूबाजूला जमलेला विद्यार्थ्यांचा घोळका दिसला नाहीं, की त्यांच्यांत चाललेली त्याजविषयींची कुजबूजहि ऐकूं गेली नाहीं.

तो वर्गात प्रवेश करतांच, विद्यार्थी–विद्यार्थिनींनीं टाळ्यांच्या कडकडाटांत त्याचें स्वागत केलें. प्रोफेसरांनीं पण त्याच्याकडे पाहून स्मित हास्य केलें.

तो लाजला पण खजील झाला नाहीं. त्याला वाटलें, एखादी अनपेक्षित गोष्ट घडली कीं, लोकांत अशा प्रकारचें कुतूहल उत्पन्न होणें साह-

जिक आहे, पण त्यांतील नाविन्य नाहींसें होतांच ते तिकडे ढुंकून देखील पाहणार नाहीत. जगाचाच न्याय आहे हा !

त्या दिवशीं त्याचें कांहीं अभ्यासाकडे लक्ष लागलें नाहीं. विद्यार्थ्याच्या प्रश्नाचा भडिमार, आणि प्रत्येकाला द्यावें लागत असलेलें ठराविक सांच्याचें उत्तर, यांमुळें कंटाळून, तो त्याना चुकविण्यासाठी मधली सुट्टी होतांच लायब्ररींत जाऊन बसला.

त्यामुळें त्याला विद्यार्थ्यांचा त्रास चुकवितां आला खरा ! पण पलीकडे लेडीज रूममध्यें चाललेला विद्यार्थिनींमधील संवाद कांहीं ऐकण्याचा टाळतां आला नाही.

परिचयाच्या चार मुली एकत्र जमल्या की, त्यांच्या तोंडाची सरबत्ती सुरू झालीच म्हणून समजावें. त्यावेळी त्याना आजूबाजूचा, फार काय त्यांच्या स्वतःचा देखील विसर पडतो. त्यांत जर का त्या कॉलेजच्या मुली असल्या, आणि त्यांतल्यात्यांत जर का त्या आपल्या हक्काच्या जागीं, मुलींकरितां म्हणून राखून ठेवलेल्या स्वतंत्र खोलींत असल्या, आणि शिवाय जर का त्यांचा खल त्यांच्या आवडीच्या विषयावर चाललेला असला म्हणजे, त्या जो गोंधळ माजवितात तो कांहीं पुसूं नये.

आणि आजचा प्रसंग तशांतलाच होता. वरील सर्व गोष्टी एकदम जमून आल्या होत्या. त्या मुली होत्या कॉलेजच्या मुली होत्या, आपल्या खोलींत होत्या, आणि आवडीच्या विषयावर खल करीत होत्या. तो विषय म्हणजे जीवन.

समोरच्या खिडकींतून पहात जीवन त्यांचें संभाषण ऐकूं लागला.

'जीवन खादी वापरूं लागले, हें बरं झालं बाई विमल.' गुलाब आपल्या लुगड्याचा पदर साफ करीत म्हणाली, 'कारण ते अधिक सुंदर दिसूं लागले आहेत.'

'पण त्यामुळं एक गोष्ट वाईट झाली बाई.' विमलनें म्हटलें. 'ते पूर्वी जे अल्लड नी खेळाडू दिसत, ते आतां बरेच पोक्त नी गंभीर दिसतात, नाहीं का ग किशोरी?'

'अग पण, दे. भ. व्हायचं म्हटल्यावर पोक्त हें दिसायलाच हवं!'

तोंच समोरच्या आरशांत पाहून तोंडाला पावडर लावणाऱ्या प्रभेनें म्हटलें, 'बरं पण, त्यांच्यांत हा फरक एकाएकीं घडून आला कसा?'

'माझाही तोंच प्रश्न आहे,' कोपऱ्यांत कॅरम खेळणारी मालती म्हणाली, 'कालपर्यंत स्वारी अगदीं सुटबुट घालत असायची.त्याचं नेहरू-शर्ट नि गांधी-टोपीत रूपांतर व्हावं हें आश्चर्य आहे!'

'अग कसलं आश्चर्य आलं आहे त्यांत?' कोपऱ्यांत क्रॉनिकल वाचणाऱ्या उपमेकडे पाहून विमल हांसत हांसत म्हणाली, 'असाच एखादा गुरू भेटला असेल नी दिला असेल त्यानं कानमंत्र.'

'त्यानं का तिनं?' प्रभेनें खवचटपणानें म्हटलें, आणि एकदम हंशा पिकला तेथें.

क्रॉनिकल तोंडापुढें धरून उपमा सारखी दांत ओंठ खात होती. आपला आणि जीवनचा संबंध जोडून, कपोलकल्पित गोष्टी रचणाऱ्या त्या मुलींना काय करावें आणि काय नाहीं असें होऊन गेलें होतें तिला.

हास्याचा भर ओसरतो न ओसरतो तोंच गुलाब म्हणाली, 'पण हा गुरु मोठा दांभिक दिसतोय बाई. स्वतःच्या इच्छेप्रमाणं आपल्या शिष्याला वागायला लावतो, पण स्वतः कांहीं तसं वागत नाहीं.'

'अग पण ही शिष्य-परीक्षा असेल.' तोंडाला पावडर. लावून झाल्यानें पफ् आपल्या हँडबॅगमध्यें ठेवीत प्रभा म्हणाली. आणि आपण मोठा विनोद केला असें कल्पून मोठ्यांदा हंसूं लागली.

उपमेला वाटलें, चटकन् पुढें व्हावें, आणि तिच्या कानफडांत चांगलीशी ठेवून द्यावी, म्हणजे तिचा फाजिलपणा आपोआप थांबेल, आणि बाकीच्या मुली पण गप्प बसतील. पण तिनें आपलें मन मोठ्या कष्टानें आवरलें, आणि ती पूर्ववत् क्रॉनिकल वाचण्याचा बहाणा करूं लागली.

'शिष्य-परीक्षा? ' विमल आश्चर्यानें म्हणाली, 'हा परीक्षेचा प्रकार अगदींच नवीन दिसतोय् बाई मला! मला वधू-परीक्षा माहित आहे, अलीकडं रूढ होत चाललेली, वर-परीक्षाही माहित आहे, पण ही शिष्य-परीक्षा कांहीं आपल्या ऐकिवांत नाहीं बाई ! '

' तुला शिष्य-परीक्षा माहीत नाहीं ! ' बाळसूदपणाचा आव आणून प्रभा म्हणाली, ' शिष्य-परीक्षा माहीत नाहीं तुला ! काय म्हणावं तरी काय तुझ्या या अज्ञानाला ! अग, ती एक आधुनिक वर—परीक्षेचा भाग आहे. '

हंशाच हंशा पिकला तेथें. तरीही उपमा शांत होती. कांहीं न बोलतां स्वस्थ बसणेंच बरें असें वाटलें तिला.

आपल्या इतक्या टोंचून बोलण्यानें देखील उपमेचें मौनव्रत ढळत नाहींसें पाहून, प्रभा समोर बसलेल्या विमलकडे पाहून, डोळा मिचकावीत हळूच उठली, आणि उपमेजवळ जाऊन म्हणाली, ' काय ग उपमा, तूं कां आज मुकी ! का तुझा महात्मागांधीप्रमाणं आज मौनादिवस आहे !'

' हो, आहे बरं ! ' भयंकर संतापलेली उपमा हातांतील अंक जोरानें खालीं आपटून म्हणाली, ' असली खवचट बोलणीं बोलायला तुम्हाला लाज कशी वाटत नाहीं ! '

' आम्हांला काय म्हणून लाज वाटावी बाई ! ' प्रभा अज्ञानाचें सोंग आणून म्हणाली 'आम्हीं लाजाव अशा कोणत्या विषयावर बोलणं निघालं नव्हतं. '

' नव्हतं ना ? मग करा तर आतां सुरूं. '

रागानें फणफणत उपमा उठली, आणि झपाझप पावलें टाकीत लीबाहेर पडली, आणि लायब्ररीकडे वळली.

तेव्हां प्रभा म्हणाली, ' शेवटीं मिरची झोंबली नाकाला. काय पण ठसुदपणाचा आव आणीत होती. तिला वाटतं कीं, आपण जें कांहीं तों तें दुसऱ्याला कळतच नाहीं ! '

त्याला विमलनें पुष्टि जोडली, ' बाकीची वेळ पुरत नाहीं म्हणून काय, कॉलेजला येतांना देखील बायकांच्या डब्यांत बसावं लागतं...'

तोंच घंटा झाल्यानें ऐन रंगांत आलेलें भाषण अर्धवट सोडून ंत जाण्यासाठीं मुली खोलीबाहेर पडल्या.

उपमा आज वर्गात जाण्याच्या मनःस्थितींत नव्हतीच मुळीं. पण ं जावें म्हटल्यास गाडीला अद्यापि अर्धा तास अवकाश होता. लाय- ंत निवांतपणें बसण्याचें ठरवून, ती तिकडे वळली. तोंच जीवन लाय- ंतूनच बाहेर येत असल्याचें तिला दिसलें, आणि तिचे पाय जागच्या ंीच थबकले.

उपमेला लायब्ररीकडे येत असल्याचें पाहून, जीवनला वाटलें कीं, ा तास नसावा. परीक्षा अगदीं नजीक येऊन ठेपल्यानें, एखादा तास ंतांच, तो वाया न घालवितां ती लायब्ररींत वाचत बसत असल्याचें जाणत होता; म्हणून त्यानें तिला विचारलें, ' तास नाहीं वाटतं ? '

' हो ! ' उपमेनें धडधडीत खोटें सांगितलें.

' परीक्षेंत पहिला नम्बर पटकवायचा बेत दिसतोय्. '

' स्कॉलर्सना नेहमीं आपल्या सारखंच सारं जग दिसत. जीवन, ंःच्या दृष्टीनं जगाकडे पाहायच सोडून देऊन, थोडसं जगाच्या दृष्टीनं ंायका शिका. '

आणि ती तडक आंत निघून गेली.

उपमेच्या त्या अनपेक्षित उत्तरानें जीवन अतिशय बुचकळ्यांत पडला. आपलें चेष्टेचें बोलणें ती इतकें मनावर घेते काय; आणि एकदम चिडून निघून जाते काय; याचें त्याला राहून राहून आश्चर्य वाटत होतें.

जीवनची आणि उपमेची आज इतक्या दिवसाची दाट मैत्री होती, पण ती कधीं त्याच्यावर चिडल्याचें, रागावल्याचें त्याला आठवत नव्हतें. तो तिला कित्येकदां चिडविण्याचा प्रयत्न करी, पण ती तें सारे हांसण्यावारी नेई. गत इतिहास असा असतांही, आज तिनें त्याच्यावर इतकें चिडावें असें कांहीं तो तिला बोलला नसतांही, ती त्याच्यावर चिडल्याचें पाहून, तो बुचकळ्यांत पडला. त्याला तिचें जातेवेळचें वाक्य आठवलें, ‘ स्वतःच्या दृष्टीनं जगाकडे पाहायचं सोडून देऊन थोडस जगाच्या दृष्टीनं पाहायला शिका. ’

त्याला वाटलें, ‘ आपणांस तिन तसं सांगण्याची काय जरुरी ? ’

त्याला लेडीजरूममधील संभाषण आठवलें.

तो विचार करूं लागला, ‘ बहुतेक सर्व मुलींनीं आमच्या पवित्र मैत्रीला गलिच्छ स्वरूप देऊन तिला चिडविल्यानं तिला अतिशय वाईट वाटलं असलं पाहिजे. अशा प्रकारचा अनुभव तिला या पूर्वी पण कित्येकदां आला असला पाहिजे. अशा रीतीनं तिला सारखा मुका मार सहन करावा लागत असतां, मी मात्र आमच्याबद्दल लोक काय बोलतात, हें जाणण्याचा प्रयत्न न करतां, पूर्ववत् तिच्याशीं सलगीनं वागूं लागल्याचं पाहून, ती चिडली असली पाहिजे.

खरंच ! काय खोटं होतं तिचं म्हणणं ? मी आजपर्यंत तिच्याकडे स्वतःच्याच दृष्टीनं पाहात नव्हतो कां ? लोक आमच्याविषयीं काय बोलतात, इकडे कधीं मी लक्ष दिलं आहे कां !

मधाचं लेडीजरूममधलं संभाषण माझ्या कानीं पडलं म्हणून बरं ! नाहींतर मला ही गोष्ट जगाच्या अंतापर्यंत कळली असती, किंवा नाहीं कोणास ठाऊक ! अन् तसं झालं असतं, तर मात्र खात्रीनं मोठा अनर्थ ओढवला असता. मी पुरूष असल्यानं समाज माझं कांहीं इतकंसं वाईट करूं शकणार नाहीं, पण उपमा ? ती एक अनाथ कुमारिका आहे. अशांत जर का तिच्या शीलावर घाणेरडे शिंतोडे उडूं लागले तर...अतिशय वाईट प्रसंग ओढवेल बिचारीवर. सबंध आयुष्यभर तिला रडत बसावं लागेल

अन् या सर्वांचं कारण कोण, तर मी !

बस् ठरलं ! माझ्या मनाला कितीही यातना होवोत ! प्रेमळ बाल-मैत्रिणीपासून दुरावताना मला कितीही वाईट वाटो ! फार काय माझ्या हृदयाच्या चिंधड्या चिंधड्या झाल्या तरी मला त्याची पर्वा नाहीं, पण त्यामुळं उपमेचं कल्याण होवो म्हणजे झालं.

' काल मी महात्माजींच्यापुढं त्यागाची शपथ घ्यावी, नि आजच असा प्रसंग माझ्यावर ओढवावा, किती विचित्र योगायोग हा !......'

* X *

गार्डनें शिळ दिली. आणि जीवन प्लॅटफॉर्मवर आला. त्याला पाहतांच गाडींत असलेल्या उपमेचा चेहरा एकदम फुलला. खूप रडल्यानें आरक्त बनलेल्या तिच्या डोळ्यांत आनंदाची छटा उमटली.

घाईघाईनें दार उघडून अधीरतेनें तिनें हांक मारली ' जीवन, अहो जीवन...' जीवननें ती हाक ऐकली. त्यानें तिला पाहिलेंहि. आणि म्हणूनच तो जागच्याजागीं थांबला.

उपमेनें फिरून म्हटलें ' पाहिलंत का ? इथं आहे मी...'

तरीही जीवननें कांहीं हालचाल केली नाहीं.

गाडी प्लॅटफॉर्मवरून हालली.

त्याची इच्छा असती तर सहज त्याला गाडींत चढतां आले असतें, उपमा बसलेल्या डब्यांत चढतां आलें असतें, पण तो मुद्दामच चढला नाहीं,

# ४

उपमेला त्याचें आश्चर्य तर वाटलेंच, पण वाईटही वाटलें.

विचारांतीं तिचें असें ठाम मत बनलें कीं, लायब्ररीसमोरील आपल्या तुसड वर्तनाचाच त्याला राग आला असावा, आणि त्यामुळेंच तो आपल्यावर इतका चिडला असावा.

त्याला टाकून बोलल्याबद्दल तिला स्वतःचाच राग आला. तिला वाटलें, कॉलेजच्या मुलीवरचा आपला राग आपण त्याच्यावर काय म्हणून काढावा !

पण लगेच तिचें दुसरें मन तिला म्हणालें, मुलींवरचा राग आपण त्याच्यावर काढायचा नाहीं तर कुणावर ? मुलीच्या फाजील चर्चेचा विषय तोच नव्हता का ? त्याच्यान् तिच्याविषयी त्या भलतेसलतें बोलू लागल्या मुळेंच ती चिडली नव्हती कां?

मुळीच न चिडतां त्या मुलींचें सभापण शांत चित्तानें तिनें ऐकून घेतलें असतें,फार काय त्यापासून तिला दुःख होण्याऐवजीं आनंदच झाला असता. तिच्या हृदयपटलावर हर्षाच्या ऊर्मी थै थै नाचू लागल्या असत्या. तिच्या गुलाबी गालावर आणखी दोन गुलाब फुलले असते. पण हें सारें केव्हा ? तिला त्याच्या प्रेमाची खात्री असती तर !

तिचें त्याच्यावर निरतिशय प्रेम होतें, आणि त्याचेंही तिच्यावर असावें असें तिला वाटत होतें, पण तिला त्याची खात्री वाटत नव्हती. फिरून फिरून तिला वाटे, ' मी स्वतःवरून तर त्याची परीक्षा करीत

नाहीं ! माझ्या प्रेमी मनाला त्यांच्या मजबरोबरच्या निर्हेतुक वागण्याच्या बुडाशीं प्रेम दडी धरून बसल्याचा खोटा भास तर होत नाहींना ! '

जीवनचें आपल्याबरोबरचें वर्तन ती आतां बारकाईनें अवलोकन करूं लागली. तो तिच्याशीं बोलत असतां, हांसत असतां, त्याच्या डोळ्यांत उमटणाऱ्या विविध छटांकडे चौकस दृष्टीनं ती पाहूं लागली, पण त्यांत तिला हवी असलेली छटा मुळींच आढळली नाहीं.

शेवटचा उपाय म्हणून तिनें आपलें प्रेम त्याच्या निदर्शनास आणून देण्याचें ठरविलें.

पूर्वी ती त्याला पत्र लिहितेवेळीं साध्या ' जीवन ' पासून सुरुवात करीत असे, ती आतां त्याच्या मागे ' प्रिय ' हें विशेषण लावूं लागली. पूर्वी ती पत्राचा शेवट ' आपली उपमा ' म्हणून करीत असे, ती आता ' तुमची उपमा ' असें करूं लागली.

एक ना दोन ! पण सारंच मुसळ केरांत !

आपल्या वर्तनावरून आपलें तिच्यावर प्रेम असल्याचें तिला दाखविण्याचें तर बाजूलाच राहो,पण तिचें आपल्यावर प्रेम असल्याचें आपल्या निदर्शनास आल्याचें देखील जीवन दाखवित नव्हता.

आणि म्हणूनच ती भयंकर उद्विग्न बनली. त्यात लेडीजरूममधील मुलींच्या अचकट विचकट बोलण्याची भर पडली. ती चिडली, संतापलीही. तशांत तो तिची चेष्टा करूं लागतांच, तिच्या रागाचा पारा भयंकर चढला, आणि ती त्याला टोंचून बोलून, लायब्ररींत निघून गेली, आणि दुःखभार असह्य झाल्यानें डेस्कवर डोकें टेकून मनसोक्त अश्रू ढाळूं लागली.

बराचवेळ अश्रू ढाळल्यानन्तर तिला बरें वाटलें. चढलेला पारा उतरला, आणि तिला आपली चूक कळून आली, म्हणूनच प्लॅटफॉर्मवर

जीवनला पाहतांच, आनंदित होऊन तिनें आपल्याकडे येण्यासाठी त्याला फिरफिरून हांका मारल्या.

पण तो न आल्याने, मुद्दाम न आल्यानें, तिला अतिशय वाईट वाटलें. तो आपल्यावर रागावला आहे,आणि म्हणूनच आपण फिरफिरून बोलावत असतांही तो आला नाहीं, ही एकच गोष्ट तिला बेचैन करण्यास पुरशी होती.

तिनें ती सारी रात्र जागून, तसेच रडून काढली. सकाळीं जीवनला भेटून, ' काल आपण चिडलों का? ' पासून संभाषणास सुरवात करून, ' आपला विवाह केव्हां? ' वर आपलें भाषण कसें आणून भिडवायचें, याची मनाशीं नीट आंखणी केल्यावर तिला थोडेसें समाधान वाटलें.

आणि रात्रीं मनाशी ठरविल्याप्रमाणें सकाळी आठ वाजताच ती जीवनच्या बंगल्यावर गेली.

फाटकांतून आत येतांच व्हराडयात उभ्या असलेल्या गडयाला तिनें विचारलें ' जीवन आहेत कां रे ? '

' आहेत बाईसाहेब ! '

' मग त्याना मी आलें आहे, म्हणून सांग. '

' कोण आलं आहे म्हणून सांगूं ? '

' उपमा. '

' बरं ' म्हणून गडी वर निघून जातांच, उपमा व्हरांड्यांत टाकलेल्या वेताच्या खुर्चीवर बसली, आणि अधीरतेनें जीवनची मार्गप्रतीक्षा करूं लागली.

आणि दिवाणखान्यांत बसलेल्या करुणाबाई तिच्याकडे बारकाईनें पाहूं लागल्या.

वरून जीवन ऐवजीं गडी येतांच उपमेनें अधीरतेनें विचारलें, 'काय सांगितलं त्यांनीं ?'

प्रश्न विचारीत असतां तिची छाती सारखी धडधडत होती, तिचा स्वर कांपरा झाला होता, तिची दृष्टि कातर बनली होती.

करुणाबाईचें तिच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष होतेंच.

'आपण अतिशय अभ्यासांत गढून गेलों आहोंत.' गडी सांगू लागला, 'परीक्षा दोन चार दिवसावर येऊन ठेपल्यामुळं, आणि आपणास पहिला नम्बर पटकावयाचा असल्यामुळं, ही अमूल्य वेळ...'

'कळलं !' म्हणून उपमा उठली, आणि अश्रूंच्या रूपानें बाहेर पडणारें आपलें दुःख त्या गड्यास दिसू नये, म्हणून ती चटकन् बाहेर पडली.

करुणाबाई तडक जिना चढून वर गेल्या, तेव्हां गॅलरींत उभा असलेला जीवन बंगल्यापुढून जाणाऱ्या उपमेकडे निश्चल नजरेनें पाहात होता.

उपमा दृष्टिआड होतांच जीवननें एक दीर्घ निःश्वास सोडला, आणि आंत जाण्यासांठीं तो मागें वळतांच. त्याला तेथें उभ्या असलेल्या करुणाबाई दिसल्या.

त्याचा चेहरा एकदम गोरा मोरा झाला.

'जीवन,कोणरे ही उपमा?' निश्चल नजरेनें त्याच्याकडे पहात करुणाबाईनीं विचारलें, पण कांहीं उत्तर न देतां, तो खालीं मान घालून उभा राहिल्याचें पाहून, त्यांनीं फिरून विचारलें, 'सांग ना कोण ती ?'

'माझी बाल–मैत्रीण.'

'तुझ्या वर्गांत आहे कां ती ?'

' हो ! '

' आपल्या जातीची दिसत नाहीं ती. '

जीवननें चमकून करुणाबाईंच्याकडे पहातांच, त्या स्मित हास्य करीत म्हणाल्या, ' कांहीं काम होतं वाटतं तिचं तुझ्याकडे ? '

' असेल कदाचित्. '

' मग कां तूं तिला भेटला नाहींस ? अभ्यासाची सबब उगीचच का पुढं केलीस ? '

' तिला टाळण्यासाठीं. '

' तिला टाळण्यासाठीं ! तिला तूं आपली बाल–मैत्रीण म्हणवितोस, अन् ती तुला भेटण्यासाठीं मुद्दाम इथं आली असतां, तिच्याशीं अशा-प्रकारचं बेपर्वाईचं वर्तन ठेवतोस ? हेंच का तुझं मित्र–प्रेम ? '

' त्याच प्रेमामुळं मी तसं केलं आई. '

जीवन तेथून झटकला, आणि आपल्या खोलींत प्रवेश करतांच त्यानें दार आंतून बन्द करून घेतलें, आणि कॉटवर अंग टाकून तो विषण्ण मनानें पडून राहिला.

आणि त्या दिवशीं महत्वाचे तास असतांही तो कॉलेजला गेला नाहीं. अभ्यासाची सबब होतीच कीं पुढें करायला !

करुणाबाईंचें आज हें दुसरें आश्चर्य होतें.

अर्थात् त्यांना तें खरें वाटलें नाहीं. कारण आजपर्यंत असा एकही दिवस त्यांना आठवत नव्हता कीं, जेव्हां जीवननें अभ्यासासाठीं कॉलेजला बुट्टी दिली होती. आणि परीक्षा एकदोन दिवसांवर येऊन ठेपल्यानें त्याला खरोखरच अभ्यास करायचा होता म्हणावें,तर तसेंही नव्हतें. कारण त्याची परीक्षेची तयारी इतकी चांगली झाली होती कीं, तो परीक्षेत

अगदीं वरचा नम्बर पटकावणार असें भाकित सर्वांनीं केव्हांच केलें होतें. खुद्द जीवनला देखील त्याची खात्री वाटत होती; आणि तसें त्यानें आपल्या आईजवळ दोन चार दिवसांपूर्वी बोलूनही दाखविलें होतें. असें असतांही आज कॉलेजला न जाण्याचें कारण आपला अभ्यास असल्याचें जेव्हां का त्यानें करुणाबाईंना सांगितलें,तेव्हां त्यांनीं त्यापासून जो निष्कर्ष काढावयाचा तो काढला.

तरीही त्या कांहींही न बोलतां गप्प होत्या.

* * *

तीन साडेतीनचा समय असेल. जीवन वर आपल्या खोलींत वाचीत बसला होता, करुणाबाई दिवाणखान्यांत रुमाल विणीत होत्या.

तोंच कुणीतरी फाटक उघडून आंत आल्याचा आवाज झाल्यानें, रुमाल खालीं ठेवून, त्या उठल्या, आणि बाहेर आल्या.

तों एक गृहस्थ त्यांच्याजवळ येऊन म्हणाला, 'जीवनसाहेब आहेत कां?'

'आहे, पण झोपला आहे तो,' करुणाबाईंनीं धडधडीत खोटें सांगितलें. 'पण काय काम होतं त्याच्याकडे?'

'त्यांना देण्यासाठीं एक पत्र दिलंय्.'

'कुणी? उपमेनं कां?'

त्या गृहस्थानें होकारार्थी मान हालविली.

'द्या तर इकडे. जीवन उठतांच देईन मी तें त्याला.'

'पण......'

तो गृहस्थ घुटमळूं लागल्याचें पाहून, करुणाबाई म्हणाल्या, 'जीवनच्याच हातीं द्यायला सांगितलंय् कां?'

'हो!'

'अहो, मी त्याची आई आहे,' करुणाबाई हांसत म्हणाल्या, 'मी कांहीं तें पत्र मधल्यामध्येंच गडप करणार नाहीं.'

'तसं नव्हे!' खजील झालेला तो गृहस्थ खिशातून पत्र बाहेर काढून, करुणाबाईंच्या हातीं देत म्हणाला, 'त्यांच्याच हातीं देण्यास बाईंनीं निक्षून सांगितल्यानं......'

'मग सांगताच कशाला तिला तुम्ही हे पत्र माझ्या हातीं दिलं म्हणून!'

तो गृहस्थ हांसला, आणि निघून गेला.

करुणाबाईंनीं पत्र फोडलें, आणि शेजारच्या कोचावर बसून, त्या तें वाचू लागल्या.

प्रिय जीवन,

तुम्ही माझ्यावर खूप रागावल्यासारखे दिसतां. जीवन, वैतागाच्या भरांत माझ्या तोंडून अधिक उणा शब्द निघून गेला म्हणून, आपल्या माणसावर कां कुणी इतकं रागावत असतं? वर हा अबोला!......

जीवन, नकाहो नका असा रुसवा धरूं!

तुम्हीं माझ्यावर रागावल्यावर, मला न भेटण्याचं ठरविल्यावर. आधींच पिडलेली मी काय करूं? खूप रडण्यापलीकडे मला काय करता येणार आहे!

कालची सबंध रात्र मी रडून काढली. तुम्हांला भेटण्याची, भेटून सर्व गोष्टींचा खुलासा करण्याची, मनाला अतिशय ओढ लागल्यानं, माझा डोळ्याला डोळा म्हणून लागला नाहीं.

आज सकाळीं मी तुमच्याकडे आले, तो तुम्हीं मला न भेटताच धुडकावून लावलंत. माझ्याच शब्दांत माझी बोळवण केल्याचं पाहून,

तुम्हांला आनन्द झाला असेल, पण त्यामुळं माझ्या हृदयाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. मेलेल्याला मारण्यांत काय अर्थ आहे !

आज तुम्हीं कॉलेजला देखील आलां नाहींत. चातकपक्षाप्रमाणं वाट पहात होतें मी तुमची. तुम्हीं जरी मला घरीं भेटलां नाहींत तरी कॉलेजांत भेटाल, अन् तुम्हीं मजवर कितीही संतापला असला, तरी मी तुमची पदर पसरून क्षमा मागताच, तुम्ही पूर्ववत् मजबरोबर गोडी गुलाबीन वागूं लागाल, म्हणून माझे खात मी कितीतरी वेळ लायब्ररींत बसून होतें. तोंडापुढें पुस्तक धरून, वाचण्याचा बहाणा करीत होतें खरी, पण एक ओळ वाचली असल तर शपथ. डोळ्यांपुढें तुमची मूर्ती उभी राहिली होती, अन् डोक्यात पण तुमच्याविषयींचे विचार चालले होते.

शेवटी आला नाहीत तुम्हीं. किती निराशा केलीत हो माझी? माझ्या भावनांची तु हांला काहींच कां किमत वाटत नाहीं ? इतके कसेहो निष्ठुर झालांत तुम्हीं !

सारी लाज, मर्यादा बाजूला सारून, मी तुह्मांला विनवितें कीं, तुम्हांला मी माझ्या हृदयाच्या कोंदणात कायमचं कोरून बसवलं आहे, तें केव्हांही अन् कोणीही काढूं शकणार नाही.

जीवन, माझ्या प्रेमा, तुम्हांला न मागतां दिलेल्या माझ्या हृदयाच्या देणगीचा स्वीकार करा, एवढीच तुम्हाला माझी कळकळीची विनंती आहे. हृदयाचं दान एकदांच करतां येतं. नाहीं कां ?

अधिक लिहिण्याच्या मनःस्थितींत मी नसल्यानं एवढच सांगतें कीं, पंचप्राण डोळ्यांत सांठवून मी तुमच्या वाटेकडें दृष्टि भिडवून बसलें आहे.

जीवन, खरं ना अवघड! माझ्यावरचा सारा राग माझ्यापुढें बोलून दाखवायला कां होईना, मला खूप शिव्या द्यायला कां होईना, या अन् मला भेटा.

याहून अधिक तें मी काय लिहिणार!

तुमची उपमा.

करुणाबाईंचा चेहरा गंभीर बनला. पत्र वाचून होतांच त्यांनीं तें बंद केलें, आणि आपल्या ट्रंकेंत ठेऊन दिलें, आणि कॉटवर पडल्या पडल्या त्या विचार करूं लागल्या.

---

# ५

टाईम्सचा अंक चाळतां चाळतां आबा एकाएकीं गंभीर बनले. त्यांच्या डोळ्यांत खेद–मिश्रित निराशेची छटा उमटली.

आणि त्याच्या चेहऱ्यावर आपली तीक्ष्ण नजर भिडविलेल्या करुणा-बाईंच्या नजरेस ही गोष्ट येतांच, त्या उठल्या आणि आबांच्याजवळ जाऊन म्हणाल्या, ' आज विशेष कांहीं आहे कां टाईम्सांत ? '

' आय. सी. एस्. चा निकाल आलाय्. '

' असं ! '

' माझ्या सांगण्याप्रमाणें वागला असतां, तर उद्यां जीवनही आय. सी. एस्. झाला असता. आणि... '

' आणि ' वरच आपलें भाषण थांबवून आबांनीं एक दीर्घ निःश्वास सोडला. तेव्हां करुणाबाई म्हणाल्या.

' इतकं निराश व्हायला नको कांहीं. अजूनही होईल तो आय. सी. एस्.'

' हं ! ' म्हणून आबांनीं उपहासात्मक हास्य केलें.

'खरंच, जीवनच्या डोक्यातून हें स्वदेशीचं वेड निघून जाणं अजून कांहीं कठीण नाहीं ......'

' मला बरं वाटावं म्हणून तूं असं बोलते आहेस झालं......'

' नाहीं ह ! अगदीं मनापासून मला तसं वाटतं. '

तेव्हा आबा करुणाबाईंच्याकडे प्रश्नार्थक चेहरा करून पाहूं लागतांच त्या म्हणाल्या, 'एकदां कां त्याचं लग्न झालं.......'

' लग्न ! '

‘ हो लग्न! ’

‘ भलत्या गोष्टींत लक्ष घातलेल्या भावनयुक्त तरुणांचं मन फिरून आपल्या संसाराकडे वळवायला लग्नासारखा जालीम उपाय नाहीं ! ’

पण आबा कांहीं न बोलतां विचारमग्न बनल्याचें पाहून करुणाबाई म्हणाल्या, ‘ त्या सोनटक्क्याच्या गणूचंच पहाना! पूर्वी किती उनाडक्या करीत होता तो. चार चार दिवस घरी परतत नसे स्वारी. तेंच आतां त्याचं लग्न झाल्यावर तो कसा वागतो पहा, सदान्कदां बायको भोंवतीं रेंगाळत असते स्वारी, तसंच जीवन......’

‘ समजलं! ’ आबा समाधानानें म्हणाले. ‘उपाय नामी आहे खरा!’

‘ मला जसा सुचला तसा तुमच्यापुढें मांडला. त्यात कांहीं घेण्या-जोगं असल्यास......’

‘ अग घेण्याजोगं म्हणून काय विचारतेस? ’ खूष झालेले आबा नीट उठून बसत म्हणाले, ‘ ठरलं! जीवनच लग्न या सुट्टींतच करून टाकायचं ! ’

‘ पण त्याची आधीं सम्मति घ्यायला नको कां ? ’

‘ त्याची कशाला घ्यायला पाहिजे सम्मति ? ’ आबा आढ्यतेने म्हणाले.

‘ तसं नको. ’ करुणाबाई कोचाच्या दांड्यावर बसत म्हणाल्या. ‘ आपण समजावून सांगितल्यास तो नाही म्हणायचा नाहीं, फार तर आतांच लग्न नको म्हणेल, तस झाल्यास आपण नुसता त्याचा वाङ्‌निश्चय करून टाकूं, तरी कांहीं फारसं बिघडणार नाहीं. ’

‘ बरं! ’

‘ मग बोलावूं कां मी त्याला खालीं ? ’

‘ नको. कार्टीचं तोंड देखील पाहण्याची माझी इच्छा नाहीं !

बोलत असतां आबांच्या कपाळावर आठ्यांच्या जाळ्या पसरल्या. ' तूंच वर जा नि त्याचं मन वळविण्याचा प्रयत्न कर. '

' बरं ! '

करुणाबाई जिना चढून वर आल्या, पण जीवनच्या खोलीचें दार आंतून बंद असल्यानें, त्यांनीं हाक मारली ' जीवन...'

जीवननें चटकन् दार उघडून विचारलें, ' काय आई ! '

करुणाबाई कांहीही न बोलतां सरळ आंत गेल्या, आणि कोपऱ्यां-तल्या कॉटवर जाऊन बसल्या. जीवनही त्यांच्याजवळ जाऊन बसतांच त्या म्हणाल्या, ' जीवन, तूं हें खादीचं व्रत स्वीकारल्यापासून मला त्यांना किती जपाव लागत आहे. त्यांची तुझ्यावर अवकृपा होऊं नये म्हणून, किती काळजी घ्यावी लागत आहे, याची तुला कल्पना देखील करता यायची नाहीं. '

' अस कसं म्हणतेस तू आई ! '

' असेल ! नाहीं असं मी म्हणत नाहीं. आज ते कोर्टातून घरीं परतले ते जमदग्नीचा अवतार धारण करून ! त्यावेळीं जर कां तूं त्यांना भेटला असतास तर......! नकोच ती कल्पना. तू बाहेर गेल्याचं सांगून त्यांना मी थांपवून धरल, अन् त्याचा राग शांत करेतोंपर्यंत माझ्या नाकीं नळ आले. ते मला नाहीं नाहींत बोलले. तुझ्याकरितां मी ते ऐकून घेतलं. तरीही त्यांचा प्रखर कोप शांत होण्याचं चिन्ह दिसेना......'

' आई......'

' शेवटीं मला एक उपाय सुचला. ' आपल्याच नादांत असलेल्या करुणाबाई पुढें म्हणाल्या ' अन् तो त्यांच्यापुढं मांडतांच त्यांना पटलाही.'

' कोणता तो ? '

' तुझं लग्न करण्याचा......'

जीवन चमकला, त्याच्या तोंडांतून न कळत उद्‌गार बाहेर पडला ' लग्न ! '

' लग्न म्हणतांच तूं इतकं कां बिचकून जावस, हेंच मला कळत नाहीं जीवन ! आता फक्त तुझा वाङ्‌निश्चय करायचा; लग्न नंतर केलं तरी चालेल. '

' म्हणजे काय होईल? '

' जीवन, तुझं हें राष्ट्रकार्याचं वेड, तुझं लग्न होतांच तुझ्या मनांतून निघून जाईल अन् तुझं लक्ष संसाराकडं वळेल असं सांगून, त्यांची समजूत पटविली मी. त्याकरिता मला किती प्रयत्न करावा लागला, हें सारं मी तुला आतां सांगत बसत नाही. आहेच तुला त्यांच्या स्वभावाची कल्पना. मग काय, सांगू का मी त्यांना तुझी वाङ्‌निश्चयाला सम्मति असल्याचं ! '

जीवन विचारांत पडला. सारें शिक्षण पुरें झाल्यावर आपलें लग्न व्हावें असें वाटत होते त्याला. त्यानें आपली ही मनीषा करुणाबाईजवळ एक दोनदां बोलूनही दाखविली होती, आणि त्यांनीं पण आपली इच्छा तशीच असल्याचे त्याला सांगितलें होते. असें असतां त्याच आज त्याला वाङ्‌निश्चय करण्यास सांगत होत्या...

पण त्यांत त्यांचा स्वार्थ का होता ! त्याचें शिक्षण पुरें व्हावें, त्याच्या वडिलांची त्याच्यावर अवकृपा होऊं नये, म्हणूनच ना त्यांचा सारा प्रयत्न चालला होता ?

शिवाय त्याचा आतां फक्त वाङ्‌निश्चय व्हायचा होता. वाङ्‌निश्चय म्हणजे कांहीं लग्न नव्हे.

आपण वाङ्‌निश्चयास तयार असल्याचें त्याने सांगितलें, तसें करण्यांत आणखी एक उद्देश होता त्याचा !

त्याच्या व उपमेच्या मैत्रीबद्दल लोक जे भलते सलते बोलत होते त्यालाही त्याचा वाङ्निश्चय झाल्याचे त्यांना कळून चुकतांच, आळा बसला असता, आणि त्यामुळें उपमा सुखी झाली असती.

जीवनची अनुमती मिळतांच, प्रेमभराने त्याच्या पाठीवरून हात फिरवीत करुणाबाई म्हणाल्या, 'खूप अभ्यास कर, इतर कोणत्याही गोष्टींना मनांत थारा देऊं नकोस, अन् परीक्षेत पहिला नंबर पटकाव.'

'तुझा आशीर्वाद असल्यावर तसं का होणार नाही आई?'

जीवनकडे स्निग्ध दृष्टीनें पहात करुणाबाई जिन्याकडे वळल्या.

त्या जिना उतरून खाली येतांच, खोलींत इकडून तिकडे येरझाऱ्या घालणाऱ्या आबांनीं अधीरतेनें विचारलें, 'काय झालं?'

'मी पूर्वी कल्पना केली होती तेंच.' करुणाबाई हासत हांसत उत्तरल्या.'

* * *

आबा आज थोड्याशा खुशींतच कोर्टाला गेले, पण करुणाबाई मात्र बऱ्याचशा गंभीर तशाच उदास बनल्या.

त्यांनीं दिवाणखान्यातील कोचावर अंग टाकलें आणि समोरच्या भिंतीवर टांगलेल्या जीवनच्या फोटोकडे त्या अनिमिष नेत्रांनीं पाहूं लागल्या.

त्यांचें हृदय भयंकर विदीर्ण बनलें. त्यांनीं आपले डोळे घट्ट मिटून घेतले. तों त्यांच्या मनश्चक्षुसमोर उपमेची करुणार्द्र मूर्ती उभी राहिली.

जीवनला भेटण्यासाठी आल्यावेळीं दिसणारा तिचा तो उदास चेहरा, तिची ती कावरी बावरी नजर, आणि जीवननें तिला भेटण्याचें नाकारतांच, तिच्या डोळ्यांत चटकन् उभे राहिलेले अश्रू......

त्या विचार करू लागल्या, 'जाणून बुजून आज मी तिला दुःख देत आहे. तिचं मन मला कळतं, तिच्या दुःखाची मला जाणीव आहे, पण

मी तर काय करणार ? तिच्या दुःखावर दृष्टि ठेऊनच नाहीं का मी ही गोष्ट केली !

मृगजलाच्या मागं लागलेल्या हरिणीला ती चूक करीत असल्याची जाणीव नसते. ती जाणीव असलेल्यांनींच तिला वेळीं सावध करायचं नसतं कां ?'

तोच दारावर कुणीतरी टिचकी लगावल्यानें करुणाबाई आपल्या विचारतंद्रींतून जाग्या झाल्या. आणि झटकन् उठून त्यांनीं दार उघडलें.

दारांत उपमा उभी होती.

तिचा चेहरा बराचसा म्लान तसाच उदास दिसत होता. करुणाबाईंना पाहतांच तिनें आधीरतेनें विचारलें, 'जीवन घरीं आहेत कां ?'

'हो ! कां ?'

'त्यांना मला भेटायचंय्'

'अगदींच कां जरूरीचं काम आहे ?'

'कां ? आतांशा ते फार अभ्यास करतात वाटत ?'

'हो ! तेंही आहेच.' करुणाबाई मंद हास्य करीत म्हणाल्या, 'परीक्षेंत त्याला अगदीं वरचा नंबर पटकावयाचा आहे कीं नाहीं? अशांतंच त्याच्या वाङ्‌निश्चयाचं घाटत आहे. घाटत आहे कसलं म्हणा, जवळ जवळ ठरलच आहे.' करुणाबाईंनी ठोकून दिले.

'काय वाङ्‌निश्चय !' उपमेच्या छातींत धस्स् झालें. तिला वाटलें सर्व घरच आपल्यावर कोसळून पडतें आहे.

करुणाबाईच्या तीक्ष्ण नजरेतून कांहीं ही गोष्ट झांकून राहूं शकली नाहीं पण तें न दर्शवितां त्या म्हणाल्या, 'हो ! त्यामुळं तो काल नि आज कॉलेजला देखील गेला नाहीं...'

उपमेला तेथें थांबवेना. दुःखभार असह्य झाल्यानें व तो अश्रूंच्या रूपानें बाहेर पडेल असें वाटल्यानें, ती जाऊं लागतांच करुणाबाईंनी मुद्दामच खोचून विचारलें, ' कांहो ! चाललांत ? जीवनला भेटायचं आहे ना तुम्हांला ? मग थांबा कीं, बोलावतेंच त्याला मी वरून...' आणि खरच बोलल्याप्रमाणें करुणाबाई जिन्याकडे वळण्याचा बहाणा करतांच, आलेला हुंदका आतल्या आंत दाबण्याचा प्रयत्न करीत, उपमा म्हणाली, ' नको, एक महत्वाच काम असल्यानं मला आता गेलंच पाहिजे. भेटेन त्यांना मी फिरून केव्हांतरी...'

' बर तस करा, ' करुणाबाई शान्तपणें म्हणाल्या, ' पण तुमचा जीवनला कांहीं निरोप सांगायचा आहे कां ? '

उपमेच्या डोळ्यांतून ज्वाला बाहेर पडूं लागल्या. तिचे सर्वांग थरथर कापूं लागलें आणि तिनें चिडून म्हटलें, ' हो ! आहे एक. वाङ्निश्चय ठरल्याचं ऐकून मला अतिशय आनन्द झाल्याचं सांगा त्यांना. '

' ठीक ! बरं पण कोण आलं हेतं म्हणून सांगू ? ' करुणाबाईंनीं सोंगाची बतावणी मात्र खूप केली होती.

आतां मात्र उपमेच्या मनाचा तोल गेला, आणि भान न राहून ती उत्तरली, ' त्याची कांहीं जरूरी नाहीं. '

आणि लगेच ती फाटकाकडे वळली.

' मग जीवनला तुमचा निरोप सांगायचा कसा?' करुणाबाई ओरडल्या.

' त्याचीही पण जरूरी नाहीं. ' असें म्हणून उपमा फाटकाबाहेर पडली, आणि झपाझप् पावलें टाकीत, रस्ता चालूं लागली.

करुणार्द्र नेत्रांनीं तिच्याकडे पहात करुणाबाई पुटपुटल्या. ' गरीब बिचारी ! '

# ६

कॉटवर पडल्या पडल्या जीवन कितीतरी वेळ कल्पनेच्या फोटोकडे पहात होता.

आणि कल्पना दिसत होतीच मुळीं तितकी सुंदर. तिचे ते नाचरे डोळे आणि हांसरें मुख, हसताना तिच्या गालावर पडलेली खळी, किंचित् एकमेकापासून विलग झालेले ओठ, आणि अर्धवट दिसणारी धवल दंत-पंक्ति......

पण जीवनची नजर जी फिरत होती ती तिच्या फॅशनेबल ब्लाऊझवरून, तिच्या केसाला दिलेल्या नागमोडी वळणावरून, कानांत घातलेल्या लांबलचक डुलावरून आणि हातांत धरलेल्या सिनेमा नटांच्या आल्बमवरून.

त्याला त्याच्या आईचे थोड्यावेळा—पूर्वीचे उद्गार आठवले, 'कल्पना सुंदर आहे म्हणूनच मी तिची निवड केली असं नव्हे. राष्ट्रोद्धाराचं कार्य हाती घेऊं इच्छिणाऱ्या तुला ती योग्य सहचारिणी होईल किंवा नाहीं यावर माझी नजर होतीच!

कल्पनेचे वडील ठाण्याचे प्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते असल्याचे तू जाणतोसच. बापाचे संस्कार मुलीवर झाले असलेच पाहिजेत. अन् तुझ्या-सारख्या राष्ट्रीय बाण्याच्या तरुणाला असलीच सहधर्मचारिणी आवडेल, म्हणून मी तिला पसंत केली. तरीही तुला मुलगी पहायची असल्यास पाहून घे!'

त्याच्या लाडक्या आईनेंच वरील उद्गार काढले होते, म्हणून जीवन काहींही न बोलतां गप्प बसला होता.

कारण नुसत्या मुली पाहून, किंवा परभारें त्यांची चौकशी करून मिळविलेल्या तुटपुंज्या माहितीवर त्याचें कल्पना-चित्र उभारणें, आणि त्यांत आपणांस हवे तें रंग भरीत जाणें, त्याला मुळींच आवडत नसे, एखाद्या मुलीच्या स्वभावाची खरी खुरी कल्पना यायला तिचा थोडातरी परिचय घडला पाहिजे, दोघांचीं मनें, आवडी निवडी एक असल्याची परस्परांना खात्री झाली पाहिजे, तरच त्याचें वैवाहिक जीवन सुखदायक होईल, अशी त्याची ठाम समजून होती. सर्व सामान्य स्त्री-पुरुषांना, लग्नासाठी लग्न करणाऱ्या लोकांना जरी हा नियम सपूर्णपणें लागू पडला नाहीं, तरी त्याच्या सारख्या राष्ट्रकार्य करूं इच्छिणाऱ्या तरुणाला, आपली पत्नी समविचाराची असावी असें वाटत होतें.

पण आजपर्यंत त्याला त्याच्या जातींतील एकाही प्रौढ कुमारिकेचा सहवास लाभला नव्हता, कीं परिचय घडला नव्हता. भिन्न जातींतील मुलीं तरी कुठें त्याच्या विशेष परिचयाच्या होत्या ?

नाहीं म्हणायला एका मुलीचा त्याला परिचय घडला होता, आणि ती म्हणजे उपमा !

दोघानाही एकमेकांचीं मनें कळलीं होतीं, दोघांच्या आवडी निवडी एक होत्या, विचार एक होते. पण जाती भिन्न होत्या.

त्याचें मन द्विधा झालें.

' किती निर्दय आहे परमेश्वर! त्याला जर का आमच लग्न जुळवून आणायच नव्हतं, तर कशाला आम्हाला एकत्र आणलन् त्यानं ! कशाला दोघांच्या मनोवृत्ति सारख्या बनविल्या, आवडी निवडी सम ठेवल्या ! ' पहिलें मन,

'परमेश्वरानं कुठं तुमच्या लग्नाला आडकाठी केली आहे ? त्याच्या दरबारीं स्त्री व पुरुष हे दोनच भेद आहेत. जातीचं थोतांड तुमचंच आहे, तुम्ही होऊन स्वतःवर बंधनं लादून घेतली आहेत, त्याला तो परमेश्वर काय करणार ! ' दुसरे मत.

'आपल्या सारख्या उसळत्या रक्ताच्या उमद्या तरुणांनींच हीं बंधनं तडातड तोडून टाकायला नकोत का ! ' पहिल्यानें इच्छा प्रकट केली.

'मला हीं बंधनं तोडतां येण्यासारखीं आहेत, पण त्यामुळ होईल काय ठाऊक आहे ! माझ्यावर माझ्या घरच्या सनातन मनोवृत्तीच्या मंडळींची अवकृपा होईल नी याहूनही पारतंत्र्याची बेडी तडातड तोडण्याचं मोठं काम माझ्या हातून पार पडणार नाहीं. ' दुसऱ्या मनानें स्पष्टीकरण केलें.

आणि जीवनला तें पटल्याने त्याने कल्पनेबरोबरच्या वाङ्निश्चयाला अनुमति दिली.

× × ×

घरात वाङ्निश्चयासाठी आलेल्या पाहुण्यांचें आदरातिथ्य ठेवण्याकडे इतकेसे लक्ष नव्हतें जीवनचें, त्याचें सारें लक्ष थोड्या वेळाने लागणाऱ्या परीक्षेच्या निकालाकडे लागून राहिलें होतें. आपल्या निकालाच्या दिवशींच आपला वाङ्निश्चय ठेवल्याबद्दल तो खूप तडफडला होता घरच्या मंडळीवर. पण त्याला ते तरी काय करणार ! त्याच्या सासऱ्यांनींच ठाण्याहून मुहूर्त काढून पाठविला होता, आणि त्यांना उलट पत्र लिहून मुहूर्त बदलण्यास सांगण्याला त्याची आई व वडील तयार नव्हते, उलट ते म्हणत 'काय बिघडलं यात ? आम्ही तर म्हणतो कीं, हा इष्टच योगायोग जमून आला. निकाल काय लागणार, हें आम्हांला पूर्णपणे ठाऊक आहे; पहिला वर्ग हा ठरलेलाच आहे; पण नम्बर कितवा तेवढंच

पहायचं आहे; अन् म्हणूनच पाहुणे मंडळी इथं असतांना परीक्षेचा निकाल लागला, तर दुधात साखर पडल्या सारखं होणार नाही कां ? '

जीवनलाही तसेंच वाटत होतें, पण तें पटत नव्हतें. त्याचे पेपर्स चांगले गेले होते, अपेक्षेप्रमाणें त्याला पहिला वर्ग मिळणार असल्याची त्याला खात्री वाटत होती, पण त्याला धीर निघत नव्हता.

म्हणून निकाल लागण्यास थोडा अवकाश असतांनाच त्यानें सर्वांची नजर चुकवून आबा आज कोर्टात जाणार नसल्यामुळें, मोकळी असलेली मोटर घेतली आणि कॉलेज गांठलें.

कॉलेजच्या पोर्चमध्यें बरेचसे विद्यार्थी जमले होते आणि त्यांची चांवपळ सारखी चालू होती.

जीवनला वाटलें कीं. निकाल ऐकण्यासाठीं आलेल्या विद्यार्थ्यांचा तो घोळका असावा, आणि निकाल लागण्यास अद्यापि थोडा अवकाश असल्यानें, ते आपल्या नेहमींच्या सरावाप्रमाणें पोर्चमध्यें गोंधळ घालीत उभे राहिले असावेत.

पण जेव्हां कां तो विद्यार्थ्यांचा तांडा त्याच्या मोटरी भोंवती गोळा झाला, तेव्हां सर्वांग खादी वस्त्र परिधान केलेल्या एका विद्यार्थ्यास त्यानें विचारलें, ' काय हो सारंगपाणी, काय भानगड आहे ही ! '

'अगदीं वेळेवर आलांत बुवा तुम्हीं' सारंगपाणी समाधानानें म्हणाला.

' वेळेवर! म्हणजे कांहीं बेत आंखलाय् वाटतं तुम्ही ! '

' अहो पण मोटरींतुन उतराल तर कीं नाहीं ? '

जीवन चटकन् मोटरींतून खालीं उतरतांच सारंगपाणी म्हणाला. ' आम्हीं आज कॉलेजवर तिरंगी झेंडा उभारण्याचं ठरविलंय्. दोन चार दिवस तुम्हीं कॉलेजकडे फिरकलाच नाहीं, नाहींतर ही गोष्ट तुम्हांला

केव्हांच कळली असती; अन् तुमच्या बंगल्यावर येऊन तुम्हांला वर्दी द्यायची म्हणजे......'

' बरं! बर! पुढं काय झालं? ' सारंगपाणिच्या घुटमळण्याचें कारण चटकन् जाणल्यानें जीवन मूळ विषयावर येत म्हणाला. पण त्याच वेळीं त्याच्या मनांत सहज विचार येऊन गेला, ' आपल्या वडिलाचा केवढा हा दरारा! '

' विशेष कांहीं नाहीं. ' सारंगपाणी सांगू लागला, ' काल आम्हीं प्रिन्सिपालकडे विद्यार्थ्यांचें डेप्युटेशन घेऊन गेलों होतों. सरकारी शाळा कॉलेजावर देखील आतां झेंड उभारले जात असल्यामुळे, आमच्या कॉलेजवरही झेंडा उभारण्यास आम्हास परवानगी द्यावी, म्हणून आम्ही त्याना खूप सांगून पाहिलं, पण शेवटपर्यंत ते नन्नाचा पाढा गिरवीत होते.

आता सारेजण निकालावर खल करीत बसले आहेत आंत. तोंपर्यंत हें झेंडा उभारण्याचं काम उरकून घ्यायचं ठरविलं आहे आम्ही. अन् तुम्हीं वर झेंडा उभारावा अशी सर्वांची इच्छा आहे. '

' मी तुम्हा सर्वांना सोडून का आहे ' ! जीवन हातांत झेंडा घेत म्हणाला, आणि वर जाण्यासाठीं तो वळणार तोंच एक विद्यार्थी म्हणाला, ' थोडं थांबा! ती पहा गाडी आलीच. '

' काय हो तुटपुंज, कुणी येणार आहे वाटतं ?' जीवननें स्टेशनकडे पहात वरील विद्यार्थ्याला विचारलें.

' हो! मुली येणार आहेत, ' तुटपुंजे हासत हासत उत्तरला, ' हा सामुदायिक कार्यक्रम आहे हटलं! '

लवकरच पांचसहा मुली झपाझप पावले टाकीत तेथें येऊन पोंहोचल्या. त्यांच्या अग्रभागीं उपमेला पाहतांच जीवन विस्मयानें म्हणाला, 'कोण, तू?'

झेंडा हातांत घेऊन, उभ्या असलेल्या जीवनाला पाहून उपमेलाही आश्चर्य वाटल्यानें तिनें उलट प्रश्न केला, ' तुम्ही कसे इथें ? '

' कसा म्हणजे ! तू तसा मी. '

' छे ! मुळींच नाहीं. तुमच्यांत नि माझ्यांत महदन्तर आहे. '

जीवन चमकला, आणि त्यांत उपमेचा चेहरा एकाएकीं गंभीर तसाच क्रुद्ध होतांच तर त्याचें मन भयकर गोंधळलें. तिला त्याचें कारण विचारण्याचें त्याच्या मनात आलें. पण तशा त्या नाजूक गोष्टीचा खुलासा करून घेण्याची ती वेळ आणि तें स्थळ नसल्याचें जाणून, तो गप्प झाला. आणि तेथे जमलल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना कोणत्याही प्रकारचा संशय येऊ नये म्हणून बळेंच हांसून तो म्हणाला, ' पण तें अन्तर कमी करणं आपल्याच हाती आहे की ! '

उपमेनें विकट हास्य केलें; पण झेंडा रोवण्यासाठीं वर गेलेल्या जीवनला कांहीं तें दिसलं नाही.

झेंडा उभारून तो खालीं उतरूं लागणार, तोंच प्रिन्सिपाल आपल्या सहकाऱ्यासह बाहेर आले.

त्याना येत असल्याचें पाहताच विद्यार्थी स्टेशनकडे पळाले. एकटी उपमाच काय ती तेथें उभी राहिली.

खालीं उतरून सथपणें आपल्या मोटारीकडे वळणाऱ्या जीवनला पाहताच प्रिन्सिपाल उद्गारले, ' कोण, जीवन ! '

प्लॅटफॉर्मवर उभे राहिलेले विद्यार्थी कुतूहलानें तिकडे पहात होते.

' होय सर मीच. '

' अन तुम्ही असल्या भानगडींत पडाव ! '

' असल्या म्हणजे कसल्या सर ? '

' आतां केलांत तसल्या. तुम्हींच हा झेंडा वर उभारलांत ना ! '

' आम्ही सर्वांनी मिळून उभारला. मी फक्त वर जाऊन तो रोवला '

' म्हणजे झेंडा उभारण्याची जबाबदारी तुम्हां दोघांवर नसून येथें जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांवर आहे असंच तुमचं म्हणणं ना ? '

' हो ! '

' मग तुमचे हे सोबती मला पाहतांच पळून कां गेले ? '

' म्हणून त्यांची जबाबदारी टळत नाही सर. ' प्रिन्सिपालाच्या प्रश्नाचा रोख जाणून जीवन उत्तरला.

' हा नुसता शब्दच्छल झाला, आम्ही फक्त तुम्हां दोघांनाच झेंडा उभारल्याबद्दल जबाबदार धरणार ! '

' तसं करणं म्हणजे अन्याय करण्यासारखं आहे सर. ' जीवन आवेशानें उत्तरला.

' तसं वाटत असेल, तर काढा तो झेंडा खालीं, मग आम्ही तुम्हांला मुळीच जबाबदार धरणार नाहीं. '

' तें कालत्रयीं शक्य नाहीं सर ! '

' मग तुम्हांला त्याचे फारच वाईट परिणाम भोगावे लागतील. '

' त्याला माझी तयारी आहे '

' मी फिरून एकवार तुम्हांला सांगतो, जीवन, थोडासा दूरदृष्टीनं विचार करा. ' प्रिन्सिपाल जीवनच्या मुखावर आपली नजर रोखून म्हणाले, ' तुमच्या बद्दल मला अतिशय आपलेपणा वाटतो, तुम्ही परीक्षेत पहिले आलांत...... '

जीवनचा चेहरा एकदम फुलला.

' अन् म्हणूनच तुमचा मला अभिमान वाटतो, ' प्रिन्सिपालनीं आपलें भाषण पुढें चालू केलें, ' तुमच्या सारखे हुशार विद्यार्थी आमच्या

कॉलेजांत असावेत, त्यांनी आमच्या कॉलेजची कीर्ति चोहोंकडे पसरवावी असं मला वाटतं, म्हणूनच मी तुम्हाला फिरून एकवार सांगतो की, तुम्ही जर कां हा झेंडा खालीं उतरून ठेवाल, तर मी तुम्हाला झाल्या गोष्टींबद्दल माफी करण्यास तयार आहे.'

'पण ती गोष्ट आतां शक्य नाही सर.'

'मग मला ही गोष्ट तुमच्या वडिलांच्या निदर्शनास आणावी लागेल. पाहू काय म्हणतात ते.'

वडिलांचें नांव काढताच जीवनच्या हृदयात चर्रर झालें. त्याच्या नजरपुढें आबांची ती करारी नी क्रुद्ध मुद्रा उभी राहिली; आणि त्याचें काळीज हादरलें; पण ते क्षणभरच; लगेच आत्मसंयमन करून तो म्हणाला, 'जशी आपली मर्जी.'

आतां प्रिन्सिपालनीं उपमेस विचारले, 'तुमचही हेंच उत्तर आहे का?' आणि उपमेनें होकारार्थी मान हालवितांच ते आपल्या सहकाऱ्यासह आत निघून गेले.

आतां जीवन उपमा शिवाय तेथें कोणी नव्हते.

'चल की' जीवन मोटरीकडे वळत उपमेला म्हणाला.

'मला यायचं नाहीं,' उपमेनें त्याच्याकडे न पाहताच उत्तर दिलें.

'यायचं नाहीं? म्हणजे तूं इथंच कां राहाणार आहेस उपमा?'

'मी तुमच्याबरोबर आले नाहीं म्हणून मी इथंच रहाणार आहे असा का अर्थ निघतो?'

'मग काय तूं रेल्वेतून येणार?'

'हो!'

'पण तें कां?'

'माझी मर्जी.'

'असं कां बोलत आहेस तू!' जीवन रडकुंडीस येऊन म्हणाला, 'रेल्वे येण्यास चांगला तासभराचा अवकाश आहे; तोपर्यन्त तू इथंच कां थांबणार! अन् तेही माझी गाडी असता नि मी तुला बोलावीत असतां! मघां देखील तूं अशीच माझ्याशी तुसडपणानं वागलीस. माझी तुला काहीच का पर्वा वाटत नाहीं?'

'काय तुमचा माझा संबंध?'

# ७

जीवनला परतण्यास जसजसा उशीर होऊं लागला, तसतसा करुणाबाईंचा जीव खाली वर होऊं लागला. गड्यानें तो निकाल पाह-ण्यासाठीं कॉलेजला गेल्याचें सांगितल्यापासून, तर त्यांच्या जिवास मुळींच चैन नव्हतें. त्यांना वाटलें, ' निकालाचा काही कुणास नेम सांगता यायचा नाहीं. अपेक्षेप्रमाणें कदाचित् त्याला पहिला वर्ग न मिळाल्यास...'

त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले; पण ते आबांच्या, विशेषत: पाहुण्यांच्या निदर्शनास येऊं नयेत म्हणून, त्यांनीं ते झटकन् पदराच्या टोंकानें पुसले.

आबा जरी वर वर निर्धास्तपणाचा आव आणीत होते, तरी आंतून ते अधीर झाले होतेच. ते पाहुण्यांशीं बोलत होते खरें, पण त्यांचें सारें लक्ष होतें बाहेर रस्त्याकडे.

मोटार फाटकापुढें येऊन उभी राहिली, पण नेहमीप्रमाणें पुंगा न वाजवितांच, जीवन मोटारींतून खालीं उतरला, आणि जड पावलें टाकीत त्यानें बंगल्यांत प्रवेश केला.

त्याच्या त्या कावऱ्या बावऱ्या चेहऱ्याकडे पाहतांच, सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. करुणाबाई तर भीतीनें ओरडण्याच्याच बेतांत होत्या. आबांच्या चेहऱ्यावरहि विषण्णतेची छटा पसरली आणि गोंधळलेली पाहुणे मंडळीं कांहीं न बोलतां एकमेकांकडे टकमक पाहूं लागली.

जीवन आला, तो तडक जिना चढून वर गेला.

करुणाबाईंना कांहीं केल्या धीर निघेना. त्यांनीं आपल्या पतिराजा-कडे अर्थपूर्ण नजरेनें पाहिलें आणि त्यांच्या नजरेनें त्याच्या प्रश्नास होकारार्थी उत्तर देतांच, त्या उठल्या आणि झपाझप् जिना चढून वर आल्या.

जीवनच्या खोलीचें दार सताड उघडे होतें, आणि तो कॉटवर पडून ढसढसा अश्रू टाकीत होता.

परीक्षेत अपेक्षेप्रमाणें पहिला वर्ग न मिळाल्यामुळेंच तो इतका कष्टी झाला असला पाहिजे, असें समजून करुणाबाई चटकन पुढें झाल्या, आणि कॉटवर त्याच्या शेजारीं बसत सद्‌गदित कण्ठानें त्यांनीं हांक मारली ' जीवन......'

दचकून उठून बसून जीवनने त्याच्याकडे अश्रुपूर्ण नजरेनें पाहिलें. ' मुळींच न डगमगता आलेल्या संकटाशीं तोंड देण्याचा निर्धार केला आहेस ना तूं ? मग अपेक्षेप्रमाणें वर्ग न मिळताच एखाद्या भेकडाप्रमाणें तू अश्रू ढाळीत बसतोस ? '

' मुळींच नाहीं ' रडण्याचें बंद करून, जीवन म्हणाला, ' मी नापास झालों असतों तरी एक थेंब देखील गाळला नसता. आतां तर मी सबंध कॉलेजात पहिला आलों......'

' काय, पहिला आलास ! ' करुणाबाई हर्षातिशयानें म्हणाल्या, ' मला वाटलंच होतं तसं. मग तू इतका कष्टी कां जीवन ? '

' कां कष्टी ! ' जीवन एक दीर्घ निःश्वास सोडून म्हणाला, ' मी त्याचं कारण सांगितल्यावर माझ्यावर रागावणार तर नाहींस ना तूं आई ?'

' वेड्या, आई आपल्या मुलावर कधीं रागावते का रे ? मुलगा कितीही वाईट असला, जगानं त्याला कितीही नांवं ठेवली तरी तो आईला प्रियच असतो, अन् तूं तर इतका हुशार, कर्तव्यनिष्ठ......'

'पण......'

'पण बिण कांहीं नाहीं. तुला कसलं दुःख होतंय् तें कसलाही आड पडदा न ठेवतां सांग पाहूं.'

जीवनला बराचसा धीर आला. घडलेली इत्थंभूत हकीकत करुणाबाईंना निवेदन करून तो म्हणाला, 'आतां तूंच सांग आई, उभारलेला झेंडा मी खालीं काढणं योग्य होतं का? त्यांत माझा भेकडपणा नसता का दिसून आला? ज्या धडाडीनं मी तो वर फडकवला, त्याच धडाडीनं त्यामुळं ओढवणारं संकट मी नको का सहन करायला!'

'मग रडत कां होतास?'

'तुला माझा राग येईल म्हणून. गेल्या कांहीं दिवसांत मी आबांना न आवडणाऱ्या कित्येक गोष्टी करीत गेलों, अन् तूं त्या निस्तारत आलीस. त्यामुळं शेफारून जाऊन, आज मी ही गोष्ट केली, अशी तुझी समजूत होऊन तूं माझ्यावर रागावशील, असं वाटल्यानं माझं हृदय कष्टी झालं नी मी रडूं लागलों.'

करुणाबाई स्तब्ध बनल्या. आपली निश्चल नजर खालीं जमिनीवर भिडवून त्या विचार करूं लागल्या.

जीवन कांहीं न बोलतां त्यांच्या चेहऱ्यावर क्षणाक्षणाला बदलणाऱ्या विविध छटांकडे पाहूं लागला.

थोड्या वेळानें करुणाबाई म्हणाल्या 'असा कसारे गाफील बनलास तू. आज, तुझ्या वाङ्‌निश्चयाच्या दिवशीं, पाहुणे मंडळी आपल्याकडे आली असतांना, तूं ही गोष्ट करावीस...!'

'मी वाईट गोष्ट केली, असं कां तुला वाटतं आई?'

'तूं केलेली गोष्ट वाईट जरी नसली तरी, तूं ती आज करायला नको होतीस, एवढं मात्र खरं. ही गोष्ट त्यांना कळताच ते सारं घर

डोक्यावर घेतील. पण आदब्यत ते तुला पाहिजे तें बोलतील, शिव्या देतील, घरांतून निघून जाण्यास देखील सांगतील. ..'

' आई ! '

' खरं तेंच सांगते आहे मी. अजून तुला त्यांच्या स्वभावाची कल्पना नाहीरे ! आधीच त्यांचं मन तुझ्याविरुद्ध प्रक्षुब्ध झालेलं आहे. पूर्वीचं त्यांचं तुजवरचं सारं प्रेम नाहीसं झालं असून, केवळ कर्तव्य म्हणून ते तुझ्याशीं वागताहेत, अन् त्या कोरड्या कर्तव्याचं रूपांतर पुनःश्च प्रेमात व्हावं, म्हणून मी आजचा हा वाङ्‌निश्चयाचा घाट घातला तो तू . !'

करुणाबाईंच्या डोळ्यात अश्रू उभे राहिल्यानें, त्यानी आपला पदर डोळ्यास लावला.

जीवनच्याही डोळ्यांचा बांध फुटला.

तोंच आबांची खालून प्रेमळ हाक ऐकू आली. ' जीवन...'

दोघानींही गोरेमोरे होऊन एकमेकाकडे पाहिलें.

' अद्यापि त्याना कळलं नाहीसं दिसतं ' करुणाबाई म्हणाल्या.

जीवननं होकारार्थी मान हालविली, तोंच आबानीं फिरून हाक मारली, ' जीवन, येतोस ना खाली ? '

' हा मी आलोच आबा ! म्हणून जीवननं आपले डोळे पुसले आणि तो खालीं जाण्यासाठीं जिन्याकडे वळतांच करुणाबाई म्हणाल्या, ' अरे पण चेहरा थोडासा आनन्दी ठेव कीं. पाहुण्याना काय वाटेल ! परीक्षेंत पहिला आलेला मुलगा...'

' माझे आई, बन्द ठेवशील कां आतां तू हें परीक्षापुराण ! '

' बरं ! बरं ! '

करुणाबाई पुढे झाल्या, आणि त्यांच्या मागोमाग जीवन जिना उतरून खालीं आला. भीतीनें छाती सारखी धडधडत असतां, बळेंच हंसून

करुणाबाई म्हणाल्या, 'मला एक आनन्दाची बातमी सांगायची आहे तुम्हांला. आमचा जीवन कीं नाहीं सर्व कॉलेजांत पहिला आला.'

आबांच्या चेहऱ्यावर आनन्दाची ध्वजा फडकू लागली. मिशांवरून हात फिरवीत त्यांनीं पाहुण्यांकडे पाहिलें. 'मुलगा आहे कुणाचा!' असाच प्रश्न जणूं काय त्यांना विचारायचा होता.

'छान! फार उत्तम!' पाहुणे मंडळी एकमुखानें म्हणाली, 'आज चांगल्या गोष्टी घडायचा योगच दिसतोय्.'

तोंच सायकलीवरून कॉलेजचा गडी तेथें आला, आणि प्रिन्सिपालांचें पत्र आबांना देऊन निघून गेला.

करुणाबाई आणि जीवन यांनीं एकमेकांकडे पाहिलें.

आबाना वाटलें कीं जीवन पहिला आल्याने प्रिन्सिपालांनीं अभिनंदन-पत्र धाडलें असेल. डोळ्यांच्या कोपऱ्यांतून पाहुण्यांकडे पहात ते पत्र उघडू लागणार तोंच करुणाबाई उठत त्याना म्हणाल्या 'थोडस आंत येतां कां?'

'कां?'

'काम आहे! महत्वाचं काम आहे!'

आबांनीं एकदा चमत्कारिक नजरेनें करुणाबाईंच्याकडे पाहिलें; आणि चटकन् उठून ते त्यांच्या मागोमाग आत गेले. पत्र त्यांच्या हातांतच होतें.

दोघेहीं आबाच्या लिहिण्याच्या खोलींत येतांच, करुणाबाई अधीर-तेनें म्हणाल्या, 'राहू द्या तें पत्र.रात्रीच्या गाडीनं पाहुणेमंडळी गेल्यावरच वाचा.'

प्रश्नार्थक चेहरा करून आबांनीं करुणाबाईंच्याकडे पाहिलें.

करुणाबाई अतिशय काकुळतीनें म्हणाल्या, 'माझ्या गळ्याची शपथ आहे, माझ्याकरितां एवढं कराच.'

' अगदीच वेडी आहेस बुवा तूं ! अग पत्रांत कांहीं तरी अशुभ असेल असं कां तुला वाटतं ? ' आबा हांसत म्हणाले. ' प्रिन्सिपालांच्याकडून आलेलं पत्र, त्यात तें काय असणार? जीवन पहिला आल्याचं अभिनंदन...'

' कांहीही असो, पाहुणे मंडळीं जाईतों नकाच तुम्ही तें वाचूं. मघा तुम्हीं ते पत्र हातीं घेताच माझा उजवा डोळा स्फुरण पाऊं लागला. जीवन कॉलेजातून परतला तेव्हांही मला तोंच अनुभव आला. माझा डोळ्यांवर फार विश्वास आहे. उजवा डोळा स्फुरण पावताच कांहीं तरी वाईट...'

करुणाबाईंच्या सर्वांगावर शहारे उभे राहिल्याचें पाहून, आबा म्हणाले. ' फारच श्रध्दा आहे बुवा तुझी या शकुनावर ! खरं म्हटलं तर तुझं म्हणणं मला पटत नाहीं, पण केवळ तुझ्या समजुतीखातर मी हें पत्र आता वाचत नाहीं, मग तर झालं ? चल, वाङ्‌निश्चयाचा मुहूर्त जवळ येत चालला....'

* + *

पाहुण्याना पोंचविण्यासाठीं आबा स्टेशनवर गेल्याची संधी साधून, जीवन करुणाबाईंना म्हणाला, ' आई, आबा इतके शान्त कसे ? '

करुणाबाईंनी घडलेला सर्व वृत्तांत निवेदन करताच, एक दीर्घ निःश्वास सोडून तो म्हणाला,' एकूण माझ्यावरच संकट टळलं नाही तर.'

करुणाबाई कांहीं बोलल्या नाहींत. जीवननेंही त्याची अपेक्षा केली नाहीं. तो वर छताकडे तर करुणाबाई खालीं जमिनीकडे पहात विचार करूं लागले !

बऱ्याच वेळानीं या प्रक्षुब्ध शांततेचा भंग करून करुणाबाई ह्मणाल्या ' जीवन, जा तू आता वर, अन् झोंप आपल्या खोलींत. मी कितीही हाका मारल्या, किंवा ते कितीही ओरडले, तरी ओ देऊं नकोस, कीं दार उघडून बाहेर येऊ नकोस, दिवा मालवून स्वस्थ कॉटवर पड. '

' दिवा कां म्हणून मालवायचा ? '

' तूं झोपी गेला आहेस, असं त्याना भासविण्यासाठी. '

' या सोंगाचा आता मला पुरा वीट आला आहे आई. '

' मला तें केव्हाच कळून चुकलय्, त्याबरोबर हेही मी जाणते, कीं तुझ्याकडून त्यांच्या इच्छेविरुद्ध अशाच गोष्टी जर का यापुढें घडत राहिल्या तर प्रसंग विकोपाला गेल्यावांचून राहायचा नाहीं अन् तेवढ्याचसाठीं मी एक बेत आखला आहे.... '

तोंच मोटारीचा हॉर्न वाजल्यानें, करुणाबाईनीं जीवनला जवळ जवळ जिन्याकडे लोटलेच.

आणि तो वर निघून जाताच त्यांनीं एक दीर्घ निश्वास सोडला आणि ज्ञानप्रकाश तोंडापुढे धरून, त्या कोचावर बसल्या.

आबा नेहमीपेक्षा आज फारच खुशींत दिसले. करुणाबाईंच्या जवळ येताच तर तिमजली हास्य करीत ते म्हणाले, ' बर कां ग ! फारच गमतदार आहेत आपले पाहुणे. त्याचं म्हणणं—आम्ही जीवनला उच्च शिक्षणासाठी परदेशीं पाठवावं. जणू काय आम्ही पाठविणारच नाहीं."

करुणाबाई काहीं बोलल्या नाहीत. भीतीने त्यांच्या छातींत धडकीच भरल्यासारखी झाली होती.

आपल्याच नादांत असलेल्या आबांनी आपलें भाषण पुढें चालू केलें, ' आणि गाडींत बसतां बसतां पाहुणे हळूंच म्हणाले, ' जांवई बुवा त्यांच्या वयाच्या मानानं फारच पोक्त दिसतात. आतां त्यांना काय म्हणावं तूंच सांग. '

तरीही करुणाबाईनीं मुग्धता स्वीकारल्याचें पाहून आबांनीं सहज त्यांच्याकडे पाहिलें, आणि त्याचा चेहरा भयंकर कष्टी दिसतांच ते म्हणाले, ' पण तूं इतकी उदास कां ? हं ! कळलं ! मघाचं दुखं तें

डोळ्याचं स्फुरणं अद्यापि तुझ्या डोक्यांतून गेलं नसेल.' तेव्हां त्यांना प्रिन्सिपालकडून आलेल्या पत्राची आठवण झाल्यानें, ते हांसत म्हणाले, 'बरं! तें पत्र आण पाहूं. आतां तरी वाचायला तुझी हरकत नाहीं ना?'

करुणाबाईच्या छातींत धस्स झालें, पण केव्हा ना केव्हां तो अप्रिय प्रसंग ओढवणार असल्याचें जाणून, त्यांनीं आतून पत्र आणून आबांना दिलें, आणि मन घट्ट करून, त्या समोरच्या कोंचावर बसल्या.

आबाचें त्यांच्याकडे लक्ष्यच नव्हतें मुळीं. इतके प्रिन्सिपालांचे पत्र वाचण्यास अधीर झाले होते. ते घाईघाईनें त्यांनीं तें उघडून वाचण्यास सुरवात केली. पत्र इंग्रजींत होतें.

'आपला मुलगा परीक्षेंत पहिला आल्याची शुभवार्ता आपणांस निवेदन करतांना मला अपरिमित आनंद होत आहे, पण त्याबरोबरच दुसरी एक अशुभ वार्ता निवेदन करतांना मला तितकंच दुःख होत आहे.

आज निकालापूर्वी थोडावेळ कांहीं उपटसुंभ विद्यार्थ्यांनीं मी बंदी केली असताही, आम्ही निकालाच्या कामात गढून गेल्याची संधी साधून, हूडपणानं कॉलेजच्या इमारतीवर तिरंगी झेंडा उभारण्याचं ठरविलं आणि त्याचा पुढाकार आपल्या मुलानं, जीवननं घेतला.

मला ही बातमी लागतांच मी तिथं आलो, तेव्हां सारी मुलं पसार झालीं होती, आणि जीवन वर झेंडा उभारून, खालीं येत होते.

जीवनबद्दल मला अतिशय आपलेपणा वाटत असल्यानं, मी त्यांना रोवलेला झेंडा उतरून ठेवण्याबद्दल परोपरीनं सांगून पाहिलं. आणि त्यांना क्षमा करण्यास तयार असल्याचं देखील सांगितलं. पण ते कांहीं केल्या त्या गोष्टीला तयार होईनात, उलट सरळ नकार देऊन ते तेथून निघून गेले.

अशाच्या मोठ्या दर्जाच्या शोभणाजोगं हें कृत्य नसल्याचं आपणांस मी कांहीं सांगायला नको.

इल्ली चळवळीची वावटळ उठली आहे. ज्यान त्यान उठावं, आणि डोक्यावर गांधी टोपी आणि अंगांत नेहरू शर्ट चढवून, आपण राष्ट्रकार्य करीत असल्याची बढाई मारावी. रिकामटेकड्या लोकांची कामं आहेत हीं. पण आपल्या सारख्या थोर अधिकाऱ्याच्या हुशार मुलानं यांत पडावं ही खरोखरच नामुष्कीची गोष्ट आहे.

अधिक तें मी काय लिहूं ? आपण वेळीं सावध व्हावं, आणि भलत्या रस्त्यानं जाऊं पहाणाऱ्या आपल्या मुलाला रोखावं, नी योग्य तो मार्ग दाखवावा म्हणून, त्याचा अध्यापक या नात्यानं मी तुम्हांला सल्ला देत आहे. '

पत्र वाचून होतांच, आबांचा पत्र वाचण्यापूर्वीचा सारा आनन्द तर ओसरलाच उलट ते इतके संतापले कीं, सर्वांग थरथर कांपत ते मटकन् खालीं बसून ओरडले, ' माझ्या नावाला काजळ फासण्याचा विडाच उचललाय् बेट्यानं. तें कांही नाहीं. आजपर्यन्त मी गय केली म्हणूनच ना या गोष्टी इतक्या थराला येऊन ठेपल्या ? बस्स ! ठरलं. आतांच या गोष्टीचा सोक्षमोक्ष करून टाकतो. ' आणि नतर करुणाबाईच्या अंगावर आवेशानें उसळून ते म्हणाले, ' तूं–तूंच सारी घाण केलीस. प्रथमच मी त्याची कानउघाडणी केली असती, पण तूं मला तसं करू दिलं नाहींस. तरुणपणाचे हे चाळे आहेत, जातील लवकरच असं सांगून तूं मला गप्प बसायला लावलंस, पण आतां......'

' पण झालं काय इतकं संतापायला ? '

' काय झालं ? ' आबा अधिकच संतापून म्हणाले,' कांहीं झाल्या-वांचून कां मी इतका संतापतो आहे ? '

' ते खरं. पण ते काय हे मला सांगितल्यावाचून कसं बरं कळणार!' करुणाबाईंनी आपलें अज्ञानाचें सोंग पूर्ववत् चालू ठेवले होतें.

आबा फसले आणि प्रिन्सिपालांच्या पत्रांतील मजकूर करुणाबाईंना निवेदन करून ते म्हणाले, ' आंता तूच सांग, मी उगीचच संतापतो आहे का तें ! '

करुणाबाईंना काय बोलावे हें न सुचल्याने, त्या खाली मान घालून उभ्या राहिल्या, तेव्हां फिरून आबांच्या मनानें उचल खाल्ली ते रागानें ओरडले, ' कुठ आहे तो कारटा ? '

' कां ? काय करायचं ठरविलंय् तुम्ही ? '

' साऱ्या गोष्टींचा सोक्षमोक्ष आताच लावून टाकणार आहे मी. '

' सोक्षमोक्ष ? अन् तो कसा ? '

' तो तू आता पाहशीलच. ' म्हणून आबा जिन्याकड वळून ओरडले, ' जीवन, अरे जीवन... '

जीवननें काही ' ओ ' दिली नाही.

करुणाबाई चटकन् पुढे होऊन म्हणाल्या, ' त्याला बोलावून काय करणार आहांत तुम्हीं ? '

' आतांच्या आता प्रिन्सिपालकडे जाऊन कृतकृत्याबद्दल पश्चाताप वाटत असल्याचं सांगून, क्षमेची याचना करण्यास लावणार आहे मी त्याला. '

' अन् तो त्या गोष्टीला तयार झाला नाहीं तर ? '

' तर...तर...मी त्याला घरातून हांकलून लावीन. '

' आईग! ' म्हणून किंचाळून करुणाबाईंनी कोचाचा आधार घेतला.

' पहा ! मी एवढ्या मोठ्यांदा हांका मारल्या, पण ओ तरी दिली कां कारट्यानं ! थांब ! ' म्हणून आबा आवेशानें जिना चढूं लागतांच, चटकन् उठून करुणाबाई त्यांना आडव्या येऊन म्हणाल्या, ' थांबा, मीच घेऊन येते त्याला खाली. '

आबा जागच्याजागीं गारठले. त्यांनी आपली तीक्ष्ण नि भेदक नजर करुणाबाईच्या मुखावर भिडविली.

करुणाबाईच्या डोळ्यात मूर्तिमत कारुण्य साठलेले होते. त्यांचा चेहरा भयंकर कावराबावरा बनला होता. त्याचे ओंठ थरथर कांपत होते.

निमुटपणें आबा परतले आणि विषण्णमनाने कोचावर जाऊन बसले. आणि करुणाबाई जिना चढून वर येताच मात्र त्यांच्या डोळ्यांचा बांध फुटला त्यांच्या हृदयात साठवून ठेवलेलें दुःख अश्रूंच्या रूपानें बाहेर पडलें, आणि समोरच्या भिंतीवर मस्तक टेकून, त्या ढसढसा रडूं लागल्या.

मोठ्या कष्टानें त्यांनी आपलें मन आवरलें, डोळे पुसले, दाटून आलेला कंठ साफ केला, आणि झपाझप जिना उतरून खालीं येऊन, आबांना त्या म्हणाल्या, ' गाढ झोंपीं गेलाय् तो, म्हणूनच तो आपल्या हांके-सरशी खालीं आला नसला पाहिजे. मी कितीतरी दार ठोठावलं, हांका मारल्या, तरी तो जागा झाला नाहीं, ' पण आबा संशयी नजरेनें त्याच्याकडे पहात असल्याचें पाहून त्या म्हणाल्या, ' खर! अगदीं खरं सांगतेय् मी. ' आणि लगेच डोळ्यांतून गळणारीं टिपे त्या पदराच्या टोकानें टिपू लागल्या.

आबाना त्याचें वाईट वाटलें. ते करुणाबाईच्या जवळ जाऊन म्हणाले, ' तूंच सांग मी अकारण सतापतो आहे का? '

' अस कस बरं मला वाटेल? ' करुणाबाई डोळे पुशीत म्हणाल्या, पण पोटचा गोळा आहे तो. वाईट निघाला म्हणून टाकून कां द्यायचा असतो? '

' मग काय करूं म्हणतेस मी? असाच अपमान सहन करीत राहूं? आज ना उद्या तो सुधारेल, असं तू सांगितल्यानं, केवळ तुझ्याकरितां म्हणून मी त्याच्या कृत्यावर पांघरूण घालीत आलों. आज तर त्यानं

कळसच उभारला. आतां जर कां मी गय केली, तर तो काय करेल, याचा नेम नाहीं.'

' यावर मी एक उपाय सुचवूं का ? '

' हं सुचव कीं ! आजवर तुझ्या सांगण्याप्रमाणं वागत गेल्यामुळंच, गोष्टी या थराला येऊन ठेपल्या. '

' कांहीं तरीच. माझ्या सांगण्याप्रमाण बागण्यास मी केव्हांही आग्रह धरला नव्हता. मी सुचविलेले उपाय आपणांस पटले, म्हणूनच आपण त्यांची योजना केलीत, अन् आता मी एक उपाय सुचवितें म्हणून, आपण त्याप्रमाणं वागलंच पाहिजे, असं काहीं माझं म्हणणं नाही,......'

आपले बोलणें करुणाबाईंना बरेचसें झोंबल्याचे पाहून आबा चमकले. थोडेसे नरमही आले आणि म्हणूनच गयावाया करीत म्हणाले, ' बरं बुवा ! आमचं चुकलं मग तर झालं ना ? '

' पुढील शिक्षणासाठीं आपण जीवनला कुठं तरी दूर मुंबई सारख्या ठिकाणीं ठेवावं '

' म्हणजे काय होईल ? '

' त्यान तिथं कांहीं केल्यास, ते इथवर येऊन पोहोंचणार नाही, किंवा त्याचा तुमच्या परिचित समाजांत बभ्रा होणार नाही. त्यामुळं तुमचे मानहानीचे प्रसंग आपोआप टळतील अन् जीवनच अभ्यासाकडे पूर्ण लक्ष असल्यानं त्याचीही काळजी करायला नको. '

' ही झाली पुढची गोष्ट. मी आतां काय करावं बे आधी सांग. '

' मधुर शब्दांनीं नटलेलं एक पत्र प्रिन्सिपालांना पाठवावं नी त्यांत लिहावं, झाल्या गोष्टीबद्दल आपणास अतिशय वाईट वाटत असून, आपण विस्कटलेली घडी पूर्ववत नीट बसविण्याच्या प्रयत्नांत आहांत, व आपल्या

वर्तमानपत्रें विकणारीं पोरें आर्तस्वरानें ओरडून, व्यवहार सुरू झाल्याचें लोकांच्या निदर्शनास आणून देत होतीं. जीवननें सोराबला विचारलें, ' मोटार वसतिगृहाकडेच न्यायला सांगितलं आहेस ना ? '

' आतां पासूनच लागली कां ओढ कॉलेजची ? गृहस्था ! आधीं घरीं तर चल. अन् नंतर पाहता येईल तुझ्या वसतिगृहाकडे जाण्याचं. मी तुला कांही कायमच आमच्या घरीं ठेऊन घेणार नाहीं......'

' बरं ! बर ! '

' आतां घरी गेल्यानतर एक गमत होणार आहे जीवन ' गालांतल्या गालात हांसत सोराब म्हणाला.

' कसली गमत ? '

' माझ्या बहिणीची फजिती होणार आहे. '

' फजिती ? नी ती कशी काय ? '

' अरे माझ्याजवळ तुझा पूर्वीचा फोटो आहे ना ! त्यावरून तिन तूं आज सुटाबुटात असणार अशी कल्पना केली आहे. आतां तुला या वेषांत पाहताच तिची जी फजिती होईल...'

' अजून तुझा पोरकटपणा गेला नाही बघ सोराब ! '

मोटार रीगल सिनेमावरून वाल्टर रोडवर आली आणि डावीकडे वळून सोराबच्या बंगल्यापुढें येऊन उभी राहिली.

झटकन् खालीं उतरून ड्रायव्हरनें मागील दार उघडतांच, सोराब आणि त्याच्या मागून जीवन खालीं उतरले आणि लिफ्टकडे वळले. तोंच खालच्या मजल्याच्या दरवाजांत सिगरेटचे फवारे सोडीत उभा असलेला एक तरुण सोराबला पाहतांच म्हणाला, ' हॅलो सोराब ! सकाळींच कुठें गेला होतां बाहेर ! '

' स्टेशनला. या माझ्या मित्राला उतरून घ्यायला. याचं नांव जीवन, इंटरच्या वर्गात आहे तो.' नतर जीवनकडे वळून सोराब म्हणाला, ' यांचं नांव क्रांतिकुमार. एम्. एस् सीच्या टर्मस भरताहेत हे. '

जीवन व क्रांतिकुमार यांनीं स्मित हास्य करीत परस्पराना अभिवादन केले आणि त्याच वेळीं एकमेकाना बारकाईने अवलोकन केले.

क्रांतिकुमाराचे ते विशाल कपाळ, मोठाले पण किंचित् उग्र दिसणारें डोळे, गोरागोमटा पण थोडासा जुनाट दिसणारा चेहरा जितका जीवनच्या नजरेंत भरला नसेल तितकी जीवनची ती गुटगुटित देहयष्टि नि तो पांढुरा शुभ्र खादीवेष क्रान्तिकुमाराच्या डोळ्यात भरला.

' मोठा स्कॉलर आहे बरं का हा. ' सोराबनें जीवनची तारीफ केली.

' छान ! फार उत्तम ! '

क्रान्तिकुमार हांसला. किती कृत्रिम वाटलें तें जीवनला ' पण नंतर त्याने केलेले हास्य तरी कुठं नैसर्गिक होते ?

' अच्छा, मग होईलच कीं आपली भेट वरचेवर. ' क्रांतिकुमार म्हणाला.

' हो! हो! ' म्हणुन जीवन सोराबच्या मागोमाग लिफ्टमध्यें चढला.

सोराबनें विचारलें, ' कशो काय आहे वल्ली ? '

' कुणाविषयीं विचारतो आहेस तूं ? '

' अरे दुसऱ्या कुणाविषयीं ? आतां भेटलेल्या क्रांन्तिकुमाराविषयीं.'

' मला काय बुवा माहीत ? आतांच नाहीं का तूं त्याची नि माझी ओळख करून दिलीस ? '

'अगदींच भयंकर आहे हा प्राणी. त्याचे विचार तर त्याहूनही भयंकर. स्वारी तुझ्या गांधीला नेहमीं पुळचट शामळू म्हणत असते, अन् त्यांची

अहिंसा म्हणजे नेभळटांचं शस्त्र वाटतं त्याला, कीं ज्यानं कधींही हिंदुस्थानला स्वराज्य मिळणं शक्य नाहीं...'

' पण असं भरमसाट विधान करायला त्याच्याजवळ तसा कांहीं पुरावा आहे कां ? '

' त्याच्यामतें भरपूर पुरावा आहे. अहिंसेनं राहून आजपर्यंत जगाच्या पाठीवर कुणी राज्य मिळविलय् का ? उलट दडुकेशाहीच्या जोरावर पुष्कळांनीं राज्यं मिळविलीं आहेत नी पुष्कळ मिळविताहेत. '

' अरे पण ही शस्त्रास्त्रानीं सुसज्ज अशा देशांची गोष्ट झाली. आमचा देश निःशस्त्र आहे. शिवाय त्याला जे तोंड द्यावयाचं आहे ते आधुनिक सर्व युद्ध सामुग्रींनीं सुसज्ज अशा प्रबळ ब्रिटिश साम्राज्य शाहीला......'

' ते काहीं असो. त्याला गांधीचीं तत्त्वं पसंत नाहींत एवढं खरं. !

' पसंत नाहींत,' ' पसंत नाहींत ' म्हटल्यानं कांहीं गांधीजींचा मार्ग चुकीचा ठरत नाहीं. तसं बोलणाऱ्यांनीं याहूनही चांगला मार्ग दाखवून द्यावा, नी मग खुशाल गांधीजींना नावं ठेवावीत. नुसतं बोलायला काय, कुणालाही येतं...'

' अहं ! तो नुसता बोलूनच थांबत नाहीं हं ! '

' मग काय करतो तो ? '

' ते मला माहीत नाही. पण काहीं तरी करतोय् एवढं मात्र खरं. आज दोन वर्षं झालीं तो आमच्या बंगल्यांत राहतोय् तेव्हांपासून मी पाहतोय्. त्याच्याकडे सारखी मंडळी जमत असतात, त्यांची गुप्त खलबतं चाललेली असतात. मी देखील पुष्कळदां त्याच्याशीं चर्चा केली आहे. अशा वेळीं तो ऐन् रंगात आला कीं, आवेशानें म्हणे, ' आम्ही बोलण्यापेक्षां करूनच दाखवूं. अन् तेंही लवकरच. '

' बरं, दाखवूंदे तो करून. त्याचा मार्ग योग्य दिसला तर उद्यां गांधीजी देखील त्याचं अनुयायित्व पत्करतील. '

जीवन हांसला. सोराबनेंही खूप मोठ्यांदा हास्य केलें.

आणि ते सोराबच्या दारापुढें येऊन उभे राहिले.

सोराबनें दरवाजावरील बटन दाबतांच दार उघडलें. एका तरुणीचे दोन अधीर नेत्र जीवनच्या मुखावर भिडले. प्रथम औत्सुक्य, नतर विस्मय आणि मागाहून आश्चर्य अशा छटा एकामागून एक चमकून गेल्या त्यांत.

तिच्या वृत्तींतील फरकाचे कारण सोराबनें पूर्णपणें जाणलेले होते. म्हणूनच खवचटपणें तो जीवनला म्हणाला, ' ही माझी बहिण जिल्लू असल्याचं तूं ओळखलंच असशील जीवन. ' आणि नंतर जिल्लूकडे वळून तो म्हणाला, ' हाच बरं का माझा मित्र जीवन. याच्याविषयीं वेळोवेळीं मी तुला इतकं सांगितलं आहे कीं, अधिक सांगायचं बाकीच राहिलं नाहीं मुळीं. '

' ओळख करून देण्याची ही पद्धत वाटतं ! ' हांसत हांसत जिल्लू म्हणाली.

' माझं चुकलं असेल, तर तूंच करून घे आपली याची पुरी ओळख. ' सोराब हांसत म्हणाला, ' बरं कां रे जीवन, एकदा आमच्या जिल्लूची नी तुझी पुरी ओळख तर होऊ दे, सारखं बोलून कंटाळा आणील ती तुला. एकदा का तिच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला...... '

' हें रे काय भाई ! ' लटक्या रागानें पण मानेला एक नाजुकसा हिसडा देत जिल्लू म्हणाली, ' नवख्या गृहस्थापुढें माझी नालस्ती करणं बरं का ? '

' बरं बुवा चुकलों ! ' सोराब म्हणाला, ' बरं पण ताईसाहेब, आतां आम्हांला कांहीं खायला देण्याचा विचार आहे कीं नाहीं तुमचा ! '

हाताला खात्रीनं यश येईलसं वाटतं, म्हणूनच घडलेला प्रकार विसरून जाऊन, आपणांवर विसंबून रहावं,' मग हें प्रकरण आपोआप मिटेल.

आबा कांहींही न बोलतां विमनस्क स्थितींत इकडून तिकडे सारख्या येरझाऱ्या घालूं लागले. करुणाबाईंचा विचार त्यांना इतकासा पसंत नव्हता, पण त्याहून चांगला दुसरा उपाय न सुचल्याने, ते वैतागानें म्हणाले, ' बरं होऊ दे तू म्हणतेस तसं, नाहीं तरी मी त्याच्याबद्दल आशा सोडलीच आहे. जाऊ दे तो माझ्यापुढून, आणि घालूं दे धिंगाणा दुसरीकडे काय घालायचा तो. '

× × ×

ड्रायव्हर फिरफिरून पुंगा वाजवून गाडीची वेळ नजीक येत चालल्याची सूचना देतांच, करुणाबाई आणि जीवन आपल्या विचारतंद्रींतून जागे झाले. जीवननें अत्यादरपूर्वक करुणाबाईंना नमस्कार केला आणि आबांचा निरोप घेण्यासाठी तो त्यांच्या खोलीकडे वळला तों गड्यानें ते बाहेर गेल्याचे सांगितले.

आतां मात्र त्याला आपले अश्रू आवरणे कठीण झाले.

करुणाबाईंनाही अतिशय वाईट वाटलें; पण तें न दर्शवितां त्या म्हणाल्या, ' जीवन, गाडीला उशीर नाहीं का होत ? चल, मी येते तुझ्या बरोबर. '

' पण आबांना...'

' कर नमस्कार त्यांच्या त्या फोटोला नि पड बाहेर. '

अश्रू पुसून जीवननें आबांच्या फोटोला भक्तिभावानें नमस्कार केला, आणि करुणाबाईसह तो बंगल्याबाहेर पडला.

दोघेंही मोटारींत जाऊन बसतांच, मोटार भर वेगांत सुटली.

वाटेंत करुणाबाईंनीं विचारलें, ' बोरीबंदरवर उतरताच, तडक कॉलेज वसतिगृहाकडेच जाणार ना तू ? '

' पाहूं कसं काय जमतं तें. '

' म्हणजे ! '

' माझा एक मित्र मला उतरून घेण्यासाठीं स्टेशनवर येणार आहे. त्यान प्रथम त्याच्या घरीं जाण्याचा आग्रह केला नाहीं तर मी थेट वसतिगृहाकडेच जाईन. '

' इतक्यांत कुठून मित्र पैदा केलास तूं मुंबईत? '

' पूर्वी इथंच रहात होता तो. '

' इथं ? '

' हो ! येथील दारू दुकानदार कूपर आहेत ना ? त्यांचाच तो पुतण्या. सोराब त्याचं नाव. गल्यावर्षी याच कॉलेजात शिकत होता. इंटरला स्वारी नापास झाली होती, अन् केवळ चेंज म्हणून इथं आली होती. '

' या वर्षी पास झाला वाटतं तो ? '

' हो ! अन् म्हणूनच बी. ए. साठीं परत मुंम्बईस गेला. '

' पण त्याच्याकडे फार वेळ राहूं नकोस हं ! मुम्बई म्हणजे सांगली नव्हे. '

जीवननें होकारार्थी मान हालविली !

मोटार स्टेशनपुढें येऊन उभी राहताच ते घाईघाईनेंच खालीं उतरले.

गाडी तयार होतीच. ड्रायव्हरनें झटकन् तिकीट काढून आणले, सामान इंटरच्या डब्यात नेऊन ठेवले आणि जीवन डब्यांत चढला.

करुणाबाई डब्याशीं रेलून उभ्या राहून म्हणाल्या, ' मन लावून अभ्यास कर, नी आपल्या ध्येयापासून च्युत होऊं नकोस. '

'तुझा नी महात्माजींचा फोटो मला नेहमीं मार्गदर्शन करीत राहील आई !'

जीवननें करुणाबाईंना नमस्कार केला.

दोघांचेही डोळे अश्रूंनीं डबडबले. कंठ दाटून आले.

गार्डानें शीळ दिली.

'संपूर्ण खुलाशाची पत्रें नियमितपणें पाठविशीलना तूं मला ?' गद्‌गदित् कंठानें करूणाबाईंनीं विचारलें.

जीवननें होकारार्थी मान हालविली.

'पण मला पाठवावयाची पत्रे स्वतंत्र पाकीटांतून पाठवीत जा हं !'

फिरून जीवनने होकारार्थी मान हालविली.

गाडी हालली आणि क्षणभरात दिसेनाशीं झाली.

करुणाबाईंनीं डोळ्यात तरंगणारे अश्रू पुसले. दाटून आलेला कंठ झाडून साफ केला आणि बाहेर जाण्यासाठीं त्या मागें वळल्या तों तेथें आबा उभे !

———

# ८

बोरीबन्दर स्टेशनवर गाडी यायला आणि अरूणोदय व्हायला एकच गांठ पडली.

आकाशांत अद्यापि एखाद् दुसरा तारा चमकत होता, आणि मधून मधून गार वाऱ्याची झुळूक येत होती.

जीवननें घाईघाईनेंच बिछाना बाधला, आणि सोराबला धुंडाळण्यासाठीं खिडकींतून बाहेर डोकावून पाहिलें, तों दुसऱ्या वर्गाच्या दरवाज्याजवळ सिगारेट फुकीत तो उभा असलेला त्याला दिसला. त्याने मोठ्यानें हांक मारली, ' सोराब, अरे सोराब !......'

सोराबनें सिगारेटचें जळकें थोटूक दूर फेकून दिलें, आणि एखाद्या अर्भकाप्रमाणें धावतच तो जीवनकडे आला. झटकन् त्याचे दोन्हीं हात आपल्या हातांत घेऊन, ते गद्गदा हालवीत तो म्हणाला, ' जीवन, आलास ! '

जीवन कांहींही न बोलतां हांसला, आणि सामान घेऊन बाहेर जाण्यासाठीं हमाल दरवाज्याकडे वळल्यानें तो सोराबसह त्याच्या मागोमाग जाऊं लागला.

सोराबनें आपली मोटार आणली होतीच हमालानें सामान मोटारींत नेऊन ठेवतांच, ते दोघेही मोटारींत जाऊन बसले आणि ती भरधांव सुटली.

सूर्योदयाचा समय असल्यानें नेहमीं जनसमुदायानें गजबजलेल्या असावयाच्या रस्त्यावर आता शुकशुकाट दिसत होता. नाहीं म्हणायला

‘ काम पडलं कीं भंगळायला हवं ! ’ म्हणून सोराबला वेडावीत पण हांसत हांसत डोळ्याच्या कोपऱ्यांतून जीवनकडे पहात, जिल्लू डाव्या बाजूच्या दारानें आंत गेली.

सोराब जीवनला म्हणाला, ‘ मी कपडे उतरून येईतो बसशील ना तूं थोडावेळ एकटाच ? ’

‘ न बसायला काय झालं ? ’

‘ Good ! That's like a good boy ! ’

सोराब उजव्या बाजूच्या खोलींत गेला आणि जीवन कोपऱ्यांतल्या टेबलावर पडलेला इलस्ट्रेटेड वीकलीचा अंक उचलून चाळूं लागला.

थोड्या वेळानें ट्रेमधून फराळाचें सामान घेऊन जिल्लू तेथें आली, पण सोराब न दिसल्यामुळें तिनें विचारलें, ‘ भाई कुठं गेला ? ’

‘ कपडे उतरतोय् तो. ’

‘ साधे मॅनर्स देखील माहीत नाहींत आमच्या भाईला, अन् ह्मणे बी. ए. होतांच बॅरिस्टर होण्यासाठीं इंग्लंडला जाणार ’

‘ मला विचारूनच गेला आहे तो ’

‘ अस्स ! ’ जिल्लू हांसली आणि नंतर जीवन समोरच्या कोचावर बसून तिनें विचारलें, ‘ बरं, आपण काय घ्यायचं ठरविलंय, आर्टस् कीं सायन्स ? ’

‘ आर्टस् ’

‘ मीही पण आर्टस् ! ’ ती बालिश हास्य करीत म्हणाली.

‘ अस्स ! ’

‘ पण तुम्हीं संस्कृत घेणार असाल ? ’

‘ हो ! कां ? ’

' नाहीं. मी घेणार आहे पर्शियन, त्यामुळं त्या तासापुरती तुमची आमची ताटातूट होणार ! '

यावर जीवनला काय बोलावें, हें न सुचल्यानें त्यानें तिजकडे पाहून बळेंच हास्य केलें. विस्फारित नेत्रांनीं त्याच्याकडे पहात तिनें अधीरतेनें विचारलें. ' पण कायहो, पर्शियनहून संस्कृतमध्यें रोमॅंटिक लिटरेचर फार आहे म्हणे ! खरं कां हें ? '

' मला कस तें सांगता येईल ? मला कुठं पर्शियन्चं ज्ञान आहे ?'

' पण संस्कृत वाङमयांत रोमान्स ओतप्रोत भरलेला आहे हें तर खरं कीं नाहीं ? '

तोंच सोराब तेथें प्रवेश करीत हांसत हांसत म्हणाला, ' इतक्यांत सुरू झाला का तुमचा रोमान्स ! '

सोराबनें विनोदासाठी ती कोटी केली खरी, पण जीवनला कांहीं ती आवडली नाहीं. अतिशय ग्राम्य वाटली ती त्याला. मोकळेपणा म्हणजे फाजीलपणा नव्हे, अशी त्याची प्रांजळ समजूत होती, आणि जिल्लूलाही पण तसेंच वाटत असावे असें कल्पून त्याने तिच्याकडे पाहिलें, तों काय आश्चर्य ! ती तोंडाला रूमाल लावून फिदफिदी हांसत होती. सोराबनें केलेला विनोद तिला मनापासून आवडल्याचे प्रदर्शनच होतें तें. त्याला वाटलें, ' जिल्लूच्या ठिकाणीं उपमा असती तर ?'

जिल्लूनें सोराबला विचारलें. ' किती उशीर केलास तूं यायला भाई ! चहा निवला देखील पहा ! ' पण जेव्हां सोराब खूप मोठ्यांदा हंसू लागला, तेव्हा ती चिडून म्हणाली, ' असा हंसतोसरे काय तूं ! अज्ञान तुला लवकरच ठाण्याला पाठवावं लागेल हं ! '

' ठाण्याला मला पाठवायचं का तुला हें जीवनच ठरवील. ' सोराब हंसें आवरीत म्हणाला. तरीही त्याच्या बोलण्याचा रोख जिल्लूनें

न जाणल्यानें ती त्याच्याकडे आश्चर्ययुक्त नजरेनें पाहू लागतांच तो म्हणाला, ‘ अग वेड, यांतला एकही जिन्नस त्याला चालणार नाहीं. ’

‘ ते का ? ’ विस्मयचकित होऊन जिल्लूनें एकदां सोराब व दुसऱ्यांदा जीवनकडे पाहून विचारलें.

‘ हा चहा, हें अम्लेट, हे सॅंडविचिस् या सांवळ्या गृहस्थाला कां चालणार आहेत ? अग, पक्का गांधीनिष्ठ आहे तो. त्याला दूध नी केळीच चालायची.’

जिल्लूला वाटलें, सोराबने जीवनची चेष्टा आरंभली आहे. मुळचाच त्याचा चेष्टेखोर स्वभाव, त्यांत त्याचा जिव्हाळयाचा मित्र फार दिवसांनीं भेटलेला. त्याच्या चेष्टेला उतं आलं नाहीं तरच नवल. म्हणून उचंबळून येणारें हांसूं आंतल्या आंत दाबण्याचा प्रयत्न करीत, ती जीवनला म्हणाली, ‘ खरच भाई म्हणतो त्याप्रमाणं तुम्ही यांतलं कांहीच कां घेत नाहीं ? ’

जीवननें होकारार्थी मान हालवताच हासत हासतच ती आंत गेली आणि चटकन् एका छोट्या ट्रे मधून दूध व अननसाच्या फोडी घेऊन येऊन तें जीवनपुढच्या टीपॉयवर ठेवीत ती म्हणाली, ‘ केळींच आणणार होतें पण घरातच नसल्यानं...!...’

‘ अहो, काय घेऊन बसलां आहांत, केळ्याच एवढसं....!’ जीवन मध्येंच म्हणाला, ‘ सोराबला आपली माझी सदोदित चेष्टा करायला हवी. मला केळींच हवींत असं कांहीं नाहीं. फार काय केळ्याहून अननस मला अधिक आवडतात. ’

‘ ठीक तर ! ’ सोराब आपल्या हास्यानें समोरच्या तिमजली इमारतीला लाजवीत म्हणाला , ‘ आमच्या घरांत आज केळीं नाहींत, हें तुझ्या प्रश्नावरच पडलं म्हणायचं ! ’

जिल्लू हासू लागली, आणि जीवनलाही आपलें हासू आवरता आले नाहीं.

× × ×

अकरा वाजले तरी सोराब सिगारेट फुंकीत कॉटवर पडून राहि-ल्याचे पाहून, जीवन हिरवटपणें म्हणाला, 'कॉलेज उघडणार आहे ना आज ?'

'बरं मग !'

'आपणास नको वा आतां घाई करायला ?'

'अरे आज पहिला दिवस. तास कांहीं सुरू होत नाहींत. फक्त प्रिन्सिपालांचं भाषण होईल, ते का ऐकायच आहे तुला ?'

'तेवढ्यांच करिता जरी नसलं, तरी कॉलेज पाहिल्यासारखं होईल.'

'खरंच तूं इथं नवखा आहेस नव्हे का? ते मी विसरलोच होतों की !'

'बर, आतां तरी आठवलं ना ? उठ तर मग.'

सोराब उठला आणि कपडे करूं लागला. जीवननेंही बॅगमधून परीट घडीचे कपडे काढले आणि अंगावर चढाविले.

ते दोघेही खालीं आले, आणि मोटारींत जाऊन बसले, तरीही मोटार सुटेना तेव्हां जीवन म्हणाला, 'कशासाठीं आडलय् आता सोराब?'

'अरे जिल्लू गेतेय् ना ? तिचा नट्टापट्टा आटपायला पाहिजे कीं नाहीं ? कॉलेजला जायचं, त्यांत आज पहिला दिवस.'

जीवन कांहीं बोलला नाहीं.

थोड्या वेळानें बूटाचा खाड् खाड् आवाज करीत जिल्लू आली. तिनें झिरझिरीत रेशमी फ्रॉक अंगात घातला होता. तो मूल्यवान पण भडक रंगाचा होता. तिच्या कानात लमाण्यासारखी भली लांब लचक डूलें

लोंबकळत होती. तिनें केशकर्तन केलेलें असून, तिचा भांग बराचसा तिरपा होता. केशरचनाही स्पष्टपणे छचोर पद्धतीची होती.

जीवननें तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें. मूळच्या लाल ओंठावरून लिपस्टिक फिरविल्यामुळें ते फाजील लाल भडक दिसत होते आणि सर्वांहून विशेष म्हणजे तिची मूळची कातडी पांढरी असतांही तिनें तोंडास भरमसाट पावडर फासली होती.

जीवनला वाटलें कीं, तिच्यांतील सारें सौंदर्य नाहींसें झालें आहे. तिच्या चेहऱ्यावर जी नैसर्गिक गोरी होती, ती त्या भरमसाट पावडरीमुळें नष्ट झाली आहे

त्याला उपमा आठवली. उपमा जिल्लूइतकी गोरी नव्हती, तरीही ती भरमसाट पावडर फासत नसे, आणि म्हणूनच तिच्या चेहऱ्यावर खेळणारें मधुर मार्दव, तिच्या गुबगुबीत गालावर विलासणारी नैसर्गिक लाली, अन् तिच्या गुलाबी ओंठावर नाचणारा रक्तमा...

त्याला वाटलें ' नटवेपणाचे कितीहि अवडंबर केले म्हणून, त्याला नैसर्गिक सौंदर्याची बरोबरी करतां येईल का ? '

त्याचें वेडे मन ! विचार सागरांत असेच कितीवेळ गटंगळ्या खात राहिलें असतें कोणास ठाऊक ! त्याच्या व सारावच्या मध्यें येऊन बसलेल्या जिल्लूच्या मासल बाहूचा स्पर्श त्याच्या अंगाला झाल्यानें सर्वांग फुलकित होऊन तो भानावर आला.

पण जिल्लूला त्याचें कांहीच वाटल्यासारखें दिसलें नाही. ऐसपैस बसून, तिनें आपली हँड बॅग उघडली, आणि त्यांतून एक छोटासा रुमाल बाहेर काढून, त्यानें आपल्या मुखावर तरगणारे विरल घर्म बिंदू टिपित ती म्हणाली, ' माझ्या करितां तुम्हांला थोडी वाट पहावी लागली असेल नाहीं ? '

जिल्लूचा प्रश्न जीवनला उद्देशून होता, पण सोराबनें तो स्वतः-कडेच ओढून घेऊन म्हटलें, 'यांत नवीन असं कांहीच नाहीं, तुझं नेहमींचच नाहींका हें जिल्लू ?'

'असूदे आमचं' या अर्थाचा एक मानेला गोडसा हिसडा देऊन, जिल्लूनें विस्फारित नेत्रांनीं सोराबकडे पाहिलं, तेव्हां तो हासून म्हणाला, 'पण या जीवनला वाटलं असेल कीं, तुला फारच नटायला, मुरडायला हवं म्हणून.'

जिल्लूनें चमकून जीवनकडे पाहिले. त्याचा तो नेहरू शर्ट, तंग पायजमा, आणि गांधी टोपीकडे लक्ष जातांच, ती आश्चर्यानें उद्गारली 'अय्या ! तुम्ही या वेषांत का कॉलेजला येणार ?'

'हो ! का ?'

'तुम्हांला पाहतांच सारा विद्यार्थीवर्ग कुणी तरी दे. भ. आला असं समजून, तुमच्या भोंवतीं गोळा व्हायचा.' जिल्लू मिष्किल हास्य करीत म्हणाली,

'सांगलीच्या कॉलेजात कांहीं कधीं अशी गोष्ट घडली नाही.'

'अहो महाशय, मुम्बई म्हणजे सांगली नव्हे, अन् मुम्बईचं कॉलेज म्हणजे सांगलीचे कॉलेज नव्हेच नव्हे.' जिल्लूचे फिदीफिदी हासणें तर मागील अंकावरून पुढें चालूच होतं.

'अन् मुम्बईच्या मुली म्हणजे सांगलीच्या मुली नव्हे !,' असें बोलण्याचें जीवनच्या जिभेच्या टोकावर आलें होतें; पण तें त्यानें मोठ्या कष्टानें गिळलं. तरीही खालील चिडखोर उद्गार त्याच्या तोंडातून बाहेर पडलेच, 'मला या वेषांत पाहतांच, माझ्या भोंवतीं जमणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घोळक्यांत सांपडण्याची जर कां तुम्हांला भीति वाटत असेल, तर मी मोटारींतून उतरलांच तुम्हीं माझ्यापासून दूर व्हा म्हणजे झालं !'

जिल्लूला ते वाक्य शल्याप्रमाणें झोंबलें आणि तिचा चेहरा खरकन उतरला.

* * *

सोराब नको नको म्हणत असताही जीवन दुसऱ्या दिवशींच वसतिगृहांत रहायला गेला खरा, पण रात्रींचे जेवण त्याच्याकडे घ्यावयाचें शेवटीं त्याला कबूल करावे लागलें.

खोलींत सर्व सामान व्यवस्थेशीरपणें मांडून होतांच त्यानें टेबलावरच्या भिंतीवर दोन फोटो लटकाविले. एक करुणाबाईचा व दुसरा महात्माजींचा.

आणि नंतर तो आई-बाबांना पत्रें लिहायला बसला.

वडिलांना त्यानें कांहीं फार लिहिलें नव्हतें, फक्त दोनच ओळी.

' मी सकाळी येथें सुखरूपपणें येऊन पोहोचलों. एल्फिन्स्टन कॉलेजांत नाव दाखल केलं असून, वसतिगृहांत मी रहातों आहें. '

पण त्याच्या आईला मात्र त्यानें सर्व गोष्टी खुलासेवार विदित केल्या होत्या. सोराबनें त्याची व कांतिकुमाराची कशी ओळख करून दिली, त्याच्या विषयीं सोराबनें सांगितलेली हकीकत ऐकल्यानंतर त्याला काय वाटलें, जिल्लूविषयी थोड्या वेळांतच त्याचें मन कसें कलुषित बनलें, आणि सर्वांहून विशेष म्हणजे, त्याची आई तेथें त्याच्या जवळ नसल्यानें त्याला कसें चुकल्या चुकल्या सारखें वाटतें, तिची कशी फिरफिरून आठवण होते, इत्यादि गोष्टी त्यानें फारच भावनात्मकतेनें निवेदन केल्या होत्या. आपलें हृदयच ओतलें होतें त्यानें त्या पत्रांत. त्यानें करुणाबाईंचे पत्र एका पाकिटांत घालून तें बंद केलें व त्यावर त्याचा पत्ता लिहून तें आबांच्या पत्राबरोबर एका मोठ्या पाकिटांत घातलें, आणि तें बंद करून त्यावर तो आबांचा पत्ता लिहूं लागला.

तोंच सोराब व जिल्लू दारांत येऊन उभी राहिली. दार उघडेच होतें.

सोराबनें दारावर टिचकी मारतांच जीवननें तिकडे पाहिलं, आणि त्या दोघांना दारांत पाहतांच तो म्हणाला, 'दार सपाट उघडं असतांना, दारावर टिचक्या मारण्याची कांहीं जरूरी नव्हती बुवा सोराब!'

'अरे पण मॅनर्स ह्मणून कांहीं आहेत की नाहीं? त्यांतल्या त्यांत जिल्लू बरोबर असतांना मला या गोष्टीची फारच दक्षता बाळगावी लागते. तूं आंत येण्यास सांगण्यापूर्वी आम्हीं जर कां आंत आलो असतो तर आमचा उद्धटपणा नसता कां दिसून आला?'

'मुळींच नाहीं. माझा मित्र तूं! अन् तुलारे कशाला पाहिजेत या नसत्या फॉर्मेलिटीज्?'

'बरं बुवा!' म्हणून सोराब कॉटवर बसला; जिल्लू टेबलाशेजारच्या खुर्चीवर बसली, आणि जीवन टेबलाशी रेलून उभा राहिला.

खोलींत चौफेर नजर फिरवीत सोराब म्हणाला, 'म्हणजे! इतक्यांत सारं सामान माडून देखील झाल तुझ जीवन?'

जीवन नुसता हांसला.

'याच नांव स्कॉलर. नाहींतर आमची जिल्लू! पुस्तकं खरेदी करून आठ दिवस झाले, पण अद्यापि त्यांना कव्हर देखील घातल नाहीं तिनं'

'अरे पुस्तकांना कव्हर न घालण्याची आज कालची फॅशनच आहे मुळीं!' जीवननें हांसत हासत टोला लगावला.

'मग तूं कां घातलं आहेस?'

'माझं नि या फॅशनचं सहसा जमत नाहीं म्हणून!'

'दिसतंच आहे तें.'

सोराब हांसला, आणि जिल्लूही हसेल असें वाटल्यावरून त्यानें तिजकडे पाहिलें, तों तिचें त्यांच्या संभाषणाकडे लक्षच नव्हतें मुळीं. ती समोरच्या भिंतीवर टांगलेल्या करुणाबाईच्या फोटोकडे एकाग्रतेनें पहात होती. जीवनला तिनें विचारलें, 'कुणाचा हा फोटो?'

'माझ्या आईचा.'

'आईचा! मग याच्या जोडीला वडिलांचा कुठं लावला नाहींत तो?'

जीवन चपापला. त्याचा चेहरा गोरामोरा झाला. पण आपल्या वृत्तींतील फरक जिल्लूच्या लक्षांत येऊं नये म्हणून प्रसंगावधान साधून तो म्हणाला, 'घाईत तो आणायचा तसाच राहून गेला.'

'म्हणून त्या ठिकाणीं गांधींचा लावलात वाटतं?'

'मुळींच नाहीं. वडिलांचा फोटो असता तरी महात्माजींचा फोटो इथं दिसलाच असता.'

'मग काय जिल्लू, तूं तुझ्या खोलींत चोहोंकडे लावले आहेस त्या प्रमाणं सिनेमा नटींचे फोटो यानं इथं लावायला पाहिजे होते?' सोराब खवचटपणानें म्हणाला.

'गप्प बैस हं तूं भाई' जिल्लू चिडून म्हणाली, 'मध्येंच आपलं तोंड खुपसू नकोस.'

'मी तर इथ दूर बसलों आहें,' विनोदाची लहर आल्यानें सोराब हांसत म्हणाला,' मी कुठ तुमच्या दोघांमध्यें तोंड खुपसतों आहें?'

'भाई!'

' नाहींतर काय ? ' सोराब कॉटवरून खालीं येत म्हणाला, आपण जीवनला न्यायला इथं आलों अन् तू सुरू केलीस फोटोची चौकशी. अशानं होडीतून फिरून यायला उशीर नाहीं का होणार ? '

' म्हणजे ! ' सोराबच्या बोलण्याचा आशय न कळल्यानें जीवननें विचारलें.

' आज पौर्णिमा ना ? जिल्लूनं होडींतून सहल करून येण्याचा बेत आंखला. मलाही तो पसंत पडला. अन् तुला घेऊन जायला आम्ही इकडे आलों. तों हिचं सुरू झालं फोटो–पुराण. '

' बरं ! बरं ! ' जिल्लू त्याला वेडावीत म्हणाली, ' आतां नको सुरू व्हायला तुझं लेक्चर. '

जिल्लू उठली आणि दरवाज्याकडे वळली; तरीही जीवन पूर्ववत् टेबलाशीं रेलून उभा असल्याचें पाहून सोराब म्हणाला, ' चलना रे! '

' नको बाबा ! '

' हें काय ? '

' अरे पण...,

' पण बिण कांहीं नाही, मुकाट्यानं उठायचं आहे कीं नाहीं तुला?'

' बरं बुवा! ' जीवन उठत म्हणाला, ' आजच्यापुरतंच बरं का हें सारं ! उद्यापासून मी अभ्यासाला लागणार आहें. '

' उद्यांपासून ? ' जिल्लू आश्चर्यानें उद्गारली.

' हो; कां ? '

' नाहीं म्हटलं एवढी कसली घाई लागून राहिली आहे अभ्यासाची? वर्गात अभ्यास सुरू व्हायला अद्यापि चार सहा दिवस लागतील कीं,...'

' लागेनात, मी आपला उद्यांच सुरू करणार ! '

जीवननें कॉटशेजारच्या खुंटीवर अडकविलेली टोपी उचलली, आणि तो खोलीबाहेर पडला. त्याच्या मागोमाग जिल्लू व सोराब बाहेर येताच त्यानें खोलीचें दार बन्द करून घेतलें आणि तीं तिघेही गेटवेवर आलीं.

होडी तयार होतीच. ते आंत जाऊन बसण्याचा अवकाश कीं ती सळसळ करीत पाण्यात निघाली.

नुकताच सूर्यास्त होऊन क्षितिजावर मान डोकावणारा पूर्णिमेचा चंद्र मधुर स्मित करीत होता; आणि त्याच्या धवल प्रकाशांत शोभून दिसणारें आजूबाजूला पसरलेल्या अथाग सागराचें निळसर पाणी, वर नयनरम्य आकाश, आणि अलीकडे अस्पष्टशा दिसणाऱ्या शहराची अपूर्व शोभा, आणि पलीकडे क्षितिजावर पसरलेल्या रंगीबेरंगी छटा...कुणाचेंही मन आकर्षून घेण्याइतका नयनमनोहर होता तो देखावा; आणि पहिल्यांदाच त्या शोभेचें अवलोकन करणाऱ्या जीवनचें मन तर फारच आनन्दी बनलें. कितीतरी वेळ तो निश्चल नजरेनें तिकडे पहात होता.

त्याच्या त्या गोड तद्रीचा भंग सोराबनेंच केला. कुलाब्याच्या दांडीपर्यंत होडी येऊन तेथून ती परतताच, त्यानें विचारलें ' जीवन, तुला गातां येतं कारे ? '

' नाहीं बुवा ! मला पाहिजे तितकं बोलायला सांग. गाण्याचं म्हटलं कीं ऊं हूं ! '

' पण आमच्या जिल्लूला या दोनीही गोष्टी साध्य आहेत. ' सोराब जिल्लूकडे डोळयाच्या कोपऱ्यांतून पहात म्हणाला.

' ही भाईची प्रशंसा कशाकरितां आहे हें मी पुरं ओळखून आहे. ' जिल्लू तिरप्या नजरेनें सोराबकडे पहात म्हणाली, ' अशानं मी हुरळून जाईन नी गाईन असं मात्र तूं समजूं नकोस हं भाई ! '

' गातां येतं तुम्हांला ? ' जीवनच्या रसिक मनानें प्रश्न केला.

' फक्त इंग्लिश पदच गातां येतात तिला. ' जिल्लू जीवनच्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वीच सोराबनें आपलें मत ठोकून दिलें.

' कांही हरकत नाहीं, ' जीवन उल्हासानें म्हणाला, ' सागराचं मंजूळ पार्श्वसंगीत, होडीची सुळ् सुळ् साथ...अशावेळीं तुम्ही गाणार नाही तर मग केव्हां ? '

जीवनच्या चेहऱ्यावर विलसणारें गोड हास्य, त्यानें जिल्लूच्या मुखावर भिडविलेली अधीर दृष्टि...

जिल्लूच्या हृदयपटलावर आनंदाच्या ऊर्मी थै थै नाचूं लागल्या. तिनें एकदा विस्फारित नेत्रांनीं जीवनकडे पाहिलें आणि किंचित् लाजून ती म्हणाली, ' बरं ! गातें मी. '

जीवन काही न बोलतां जिल्लू गात असलेलें पद ऐकूं लागला.

तिचा आवाज विलक्षण गोड व सुरेल होता, पण गाताना जीवनकडे विलक्षण गूढतम दृष्टीनें पाहून ती करीत असलेला फाजील शृंगारदर्शक हावभाव, आणि तेंच तें कडवें फिरफिरून म्हणताना अकारण डावा डोळा उडविण्याची तिची संवय, आणि मधून मधून अधरोष्टावरून जीभ फिरविण्याची तिची पद्धत...जीवनला तें कसेंसेंच वाटूं लागलें.

ती म्हणत असलेलें पद उत्तान शृंगारिक होतें, आणि 'प्रेमयाचना' हा त्याचा विषय होता. तिनें त्याच्या मुखावर प्रेममय दृष्टि रोखली होती. मनातील सर्व भाव प्रकट करणाऱ्या, चित्तांतील सर्व विकार दर्शविणाऱ्या, हृदयांतील सर्व प्रेम सिद्ध करून देणाऱ्या तिच्या त्या अतृप्त अशा नेत्रांत भावनेच्या उत्कटतेपेक्षां वासनेची प्रबलताच अधिक तीव्र असावी असें वाटलें जीवनला. त्यामुळें त्याचें रसिक मन देखील क्षणभर गोंधळलें, आणि पलीकडे उभ्या असलेल्या डोंगरी खेण्याच्या निमित्तानें त्यानें उगीचच

आपली नजर दुसरीकडे वळविली. अतिशय लाजल्या लाजल्या सारखें होत होतें त्याला.

जिल्लूनें आपलें पद संपविलें आणि मनगटावरील घड्याळाचा पट्टा सरळ बसविण्याच्या निमित्तानें तिनें आपली नजर खालीं वळविली आणि डोळ्याच्या कोपऱ्यांतून ती जीवनकडे पाहूं लागली.

' छान गाते नाहीं जिल्लू ? ' सोराबनें जीवनला विचारलें.

' हो छान गातात त्या; पण इतकं उत्तान शृंगारिक पद म्हणणं केव्हांही वाईट नव्हे का ? ' जीवनच्या मनातील विचार अस्पष्टपणे कां होईना, शेवटी बाहेर पडलेच.

' मग काय, मी एखादं विरहगीत म्हणायला पाहिजे होतं ? ' जिल्लू खूप मोठ्यादा हासून म्हणाली. सोराबही हासला.

यावर जीवन कांहींस खडसून उत्तर देणार होता; पण अकारण कशाला एखाद्याचें मन दुखवावें असा पोक्त विचारकरून त्यानें तो विषय तेथेंच सोडला.

होडी धक्याला येऊन लागतांच तो खालीं उतरला. त्याच्या मागोमाग जिल्लू आणि तिच्या मागून सोराब उतरतांच ते तिघेही सोराबच्या घरीं आले.

जेवण तयार होतेंच. सोराबचे आणि जिल्लूचे कपडे उतरण्याचा काय तो अवकाश होता. जेवण झाल्यावर जीवन आपल्या खोलीवर जाण्यासाठीं उठतांच, सोराब त्याला थोपवून म्हणाला, ' थांबेर ! आतां कुठं नऊ वाजले आहेत. '

' म्हणूनच आतां मला गेलं पाहिजे. साडेनऊला हजेरी असते ना!'

' हां. पण आज पहिला दिवस असल्यानं हजेरी देणार नाहींत. '

' म्हणून काय झालं ? नियम म्हणजे नियम ! तो पाळलाच पाहिजे. आमच्या हिताकरितांच ना हे सारे नियम आहेत ? '

' भारीच बुवा तू...! ' सोराब किंचित् त्रासून म्हणाला. ' बरं पण मी कपडे करून येईतोपर्यंत तरी तू थांबशील की नाही ? '

' का ? कुठं बाहेर जायचं आहे वाटतं ?

' हो ! रीगलला जाणार आहे मी. '

' मग कर लवकर पोशाख. '

सोराब कपडे करण्यासाठी आपल्या खोलींत गेला.

आतां जीवन व जिल्लू यांशिवाय तेथें तिसरें कोणी नव्हतें.

' तुमचे वडील पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट आहेत नाही ? ' जिल्लूनें विचारलें.

' हो, का ? '

' मग त्याना कसं तुम्ही हे असले कपडे केलेलं आवडतं ? '

जीवन थोडासा चपापलाच. पण आपल्या गोंधळलेल्या मनाची छाया आपल्या चेहऱ्यावर पडू न देण्याची खबरदारी घेत तो म्हणाला, ' मॅजिस्ट्रेट झाला म्हणून त्याला काही राष्ट्राभिमान नसतो असं थोडंच आहे ! माझ्या बाबाचा याला पूर्ण पाठिंबा आहे. ' त्यानें ठोकून दिलें.

' अन् तुमच्या आईला ? '

' तिला तर अतिशय आवडलं. '

' अस्सं ! '

जिल्लू गप्प् झाली, पण ती बरीचशी आश्चर्यचकित झाल्यासारखी दिसली. तिच्या हातांची सारखी चुळबुळ सुरू होती. तिचे डोळेही

जीवनकडे बारकाईनें पहात होते. त्याला वाटले, ' कसला गहन प्रश्न पडलाय् हिला ? '

तों ती चांचरत म्हणाली, ' तें कांहींही असो, तुम्हीं सुटांतच सुंदर दिसतां बाई ! '

' तें कशावरून ? '

' तुमचा सुटांतला भाई जवळचा फोटो मी कित्येकदां पाहिला आहे; आज पण मी तो तुलनात्मक दृष्टीनं फिरून पाहिला, तों तुम्ही त्यांतच सुंदर दिसलां. '

' अस्सं ! ' जीवन आलेलें हांसू आंतल्या आंत दाबण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, ' हें सारं पाहणाऱ्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. '

' म्हणजे ? '

' म्हणजे माझ्या आईला मी या पोषाखांत अतिशय सुंदर दिसतों तर तुम्हांला सुटांत बरा दिसतो. हा फरक तुम्हां दोघांच्या माझ्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतच नाही का ? '

' माझी दृष्टि तरुणीची आहे. '

' असेल, पण माझ्या माहितीची एक तरुणी आहे की, जिला मी या पोषाखांतच सुंदर दिसतों. ' असें उत्तर देत असतां जीवनच्या मनश्चक्षूपुढें उपमा उभी होती.

' मग खात्रीनं ती अशिक्षित असली पाहिजे. '

' मुळींच नाहीं. याचवर्षी ती प्रीव्हिएसची परीक्षा पास झाली आहे.'

आतां मात्र जिल्लूच्या तोंडाला कुलूप बसलें, पण तिचें डोळे क्रुद्ध झाले, तिच्या भिवया वक्र झाल्या, तिचा श्वासोच्छवास जोरानें वाढूं लागला; तिने शेजारच्या कोचाचा आश्रय घेतला आणि जीवनच्या

मनाचा ठाव घेण्यासाठीच की काय, आपले डोळे विस्फारून ती त्याच्याकडे पाहूं लागली.

जीवनचा चेहरा निर्विकार होता, नाहीं म्हणायला त्यावर किंचित् गंभीरतेची छटा पसरली होती.

जिल्लूचें मन अधिकच गोंधळलें, भयंकर प्रक्षुब्ध झालें, तिचें सर्वांग थरथर कांपूं लागलें आणि ती झट्कन् आंत निघून गेली.

जीवनचा चेहरा अतिशय गंभीर बनला.

तोंच जिल्लूचे शब्द त्याच्या कानीं पडले, 'फारच अरसिक दिसतात तुझे मित्र भाई !'

जीवनच्या भिवया आवळल्या गेल्या.

सोरात्र येतांच तो उठला, आणि झपाझप् जिना उतरून खालीं आला, आणि रस्ता चालूं लागला.

मधून मधून सळसळणारा गार वारा त्याच्या उघड्या मानेशी झोंबत असतांही, शर्टची मोकळी असलेली वरची गुंडी बसवावी असें त्याला वाटलें नाहीं. शुद्धच नव्हती त्याला त्याची, अन् स्वत:चीही. आपल्याच नादात तो चालत होता.

———

# १

जीवनच्या ध्यानीं नाहीं मनीं नाहीं अशी गोष्ट घडली आज.

इंग्लिशच्या प्रोफेसरांचा, कवीश्वरांचा तास होता आणि जीवन नेहमीं-प्रमाणें विषयाची जय्यत तयारी करून वर्गात उपस्थित झाला होता.

प्रोफेसर महाशय जो–जोरानें आपलें भाषण झोडीत होते. मध्येंच त्यांना काय लहर आली कोणास ठाऊक. भाषण अर्धवट थांबवून त्यांनीं एक कविता उघडली आणि विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले, ' या कवितेचं कुणी विवेचन करूं शकेल कां ? '

थोडीशी अवघडच होती ती कविता. त्यांत प्रोफेसर कवीश्वरांचा दरारा. थोडें चुकण्याचा अवकाश कीं झालीच त्यांच्या तोंडाची सरबत्ती सुरू. त्यामुळें कोणताही विद्यार्थी खात्री असल्याशिवाय उठत नसे.

जीवनला मात्र तशी खात्री वाटत होती. पण होतां होईलतों आपलें वास्तव्य कुणाच्या नजरेस न येईल अशारीतीनें राहावयाचें त्यानें ठरविलेले असल्यानें तो तसाच गप्प बसून राहिला.

वर्गातील एकही मुलगा उठत नाहींसे पाहून प्रोफेसर महाशय चिडले आणि रागानें ओरडले, ' तुमच्यापैकीं एकालाही सांगतां येत नाहीं कां ? '

आतां मात्र जीवनला राहावलें नाहीं. तो चटकन उठून उभा राहिला.

सर्वांची दृष्टि एकदम त्याच्यावर केंद्रीभूत झाली आणि जो तो त्याच्याकडे कुतूहलानें पाहूं लागला.

तिकडे मुलींच लक्ष न देतां तसेंच मुलींच न भितां जीवननें अस्खलित वाणीनें त्या कवितेचें विवेचन केलें.

सारा विद्यार्थीवर्ग आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागला. प्रोफेसर महाशयांचेही डोळे विस्मयानें चमकले. समाधानानें ते म्हणाले. 'छान! फार उत्तम ! पण कायहो, तुमची इतकी तयारी असतां, तुम्ही माझ्या पहिल्या हांकेसरशीच कां उठलां नाहींत ? '

जीवन कांहीं न बोलतां खालीं मान घालून उभा राहिला. विद्या विनयानेंच शोभते. नाही का ?

त्याचा इष्टच परिणाम झाला प्रोफेसरांच्या मनावर. त्यांनीं उत्सुकतेनें विचारलें ' तुमचं नांव काय ? '

' जीवन '

' जीवन! ' प्रोफेसर महाशय कांहींसें आठवीत म्हणाले, ' परवांच्या इंग्लिशच्या टेस्टमध्ये पहिले आलेले तुम्हीच कां ! '

जीवननें होकारार्थी मान हालविली.

'Good! Weapons of Freedom हा तुमचा निबंध फारच आवडला मला. तुम्ही प्रयत्न कराल तर खात्रीन तुम्हांला यंदा इंग्लिशला असलेलं एलिस प्राइझ मिळेल. '

जीवनच्या अंगावर एकदम मुठभर मांस चढल्यासारखे झाले.

घंटा झाली आणि प्रो. कवीश्वर व्यासपीठावरून खाली उतरून जीवन जवळ येत म्हणाले, ' भेटत जा मला वरचेवर. लागेल ती मदत करण्यास मी तयार आहे. या संध्याकाळी घरीं '

जीवननें होकारार्थी मान हालवितांच, प्रोफेसर महाशयांनीं हांसून त्याच्याकडे पाहिले आणि ते वर्गाबाहेर पडले.

जीवन आपल्या जागीं जाऊन बसला आणि विद्यार्थी विद्यार्थिनींत कुजबुज सुरू झाली.

पण ती थोडा वेळच ! कॉलजचा शिपाई येऊन बाहेरच्या बोर्डवर नोटीस लावू लागतांच त्यांचा मोर्चा एकदम तिकडे वळला आणि नोटीस कसली आहे हें ते पाहूं लागले.

तों काय आश्चर्य ! प्रो. कवीश्वरांची होती ती नोटीस. तींत त्यांनीं जीवनचा weapons of Freedom हा निबंध वर्गांतील विद्यार्थ्यांना वाचण्यास शिफारस केली होती. झाले ! क्षणभरात विद्यार्थीगण जीवन भोंवतीं गोळा झाला आणि त्याचा निबंध वाचण्यास मागू लागला. सर्वांना 'देतो देतो' म्हणून सांगता सांगता जीवनच्या नाकीं नऊ आले.

× × ×

प्रो. कवीश्वराच्याकडे पुस्तक मागण्यास जीवन गेला तेव्हां ते बाहेर जाण्याच्या तयारीत होते. तरीही त्यानी त्याचं सस्मित स्वागत करून त्याला हवं होतं ते पुस्तक तर दिलंच; पण ते त्याविषयीं योग्य त्या सूचना देऊं लागले.

शेवटीं उशीर होऊं लागल्याचे पाहून ड्रायव्हरास त्यांना आठवण करून द्यावी लागली, 'साहेब, पांच वाजले...'

'खरंच कीं !' प्रो.कवीश्वर मनगटावरील घड्याळाकडे पाहात म्हणाले, 'जीवन, आतां आमची महत्वाची मीटिंग आहे; मला गेलंच पाहिजे.'

प्रो. कवीश्वर उठतांच जीवनही उठला.

'येत जा वरचेवर.' प्रोफेसर महाशय अंगावर कोट चढवीत म्हणाले. 'कांहीं अडल्यास विचारीत जा. सकोच बाळगण्याचं मुळींच कारण नाहीं.'

‘ बरं ’ म्हणून बाहेर जाण्यासाठीं जीवन दरवाजाकडे वळणार तोंच आंतून तेथें एक सडपातळ बांध्याची तरुणी आली आणि तिनें त्याचे मन आपल्याकडे आकर्षून घेतलें. नकळत त्याचें पाय जागच्या जागीं स्थिर झालें.

तशी ती फार सुंदर नव्हती. तिचे केस विपुल नव्हते कीं तिचा वर्ण पांढरा शुभ्र नव्हता. पण तिचे ते निष्पाप डोळे, मनाचा सरळपणा दर्शविणाऱ्या तिच्या त्या पातळ गोलाकृती भिवया आणि तिचे ते तांबड्या काठाचे खादीचे पांढरे पातळ....

जीवनचे नेत्र तिच्या मुखावर भिडले.

पण त्याच्या तेथील अस्तित्वाची जाणीव नसल्याप्रमाणेंच तिनें प्रो. कवीश्वराना विचारलें, ‘ अन् माझी कविता बाबा ? ’

‘ बाबा ! म्हणजे ही यांची मुलगी तर ! ’ जीवन स्वत:शीच बोलला.

‘ काय पण कटकटी पोर आहे ....’

‘ इच्छा नसली तर नका समजावून देऊं जा, ’ ती लटक्या रागानें म्हणाली.

‘ इच्छा नाही असं कां म्हणालो मी ? ’

‘ नाहीं तर काय ? ’

‘ काय उलट्या काळजाची कार्टी आहे, ’ प्रो. कवीश्वर हांसत म्हणाले, ‘ आता मला मीटिंगला जायच नाहीं कां कविता ? ’

‘ कविता आहे कां हिचं नांव ? छान. ’ जीवननें मनांतल्या मनांत प्रशंसा केली.

‘ नेहमींचंच तुमचं आहे हें ! ’ म्हणून कविता फणकाऱ्यानें आंत निघून जाऊं लागतांच, प्रो. कवीश्वरांनीं तिला हांक मारून म्हटले, ‘ अग पण रागावतेस काय अशी ! ’

' नाहीं तर काय ? मी कालपासून विचारतेय् पण तुम्हाला आपली सवडच होत नाहीं. आजतर वर्गांत मला या कवितेचं appreciation लिहून घेऊन जायचय्.'

' असं होय. ' प्रो. कवीश्वर थोडासा विचार केल्यासारखे करून म्हणाले. ' मग असं का होईना ? हे जीवनच तुला तुझी कविता समजावून देतील ... '

आतां मात्र कवितेनं जीवनकडे पाहिलें. ती कांहीं बोलली नाहीं. पण त्याला पाहताच, त्याच्या त्या पोषाखाकडे लक्ष जाताच, तिला थोडासा विस्मय वाटल्यासारखा दिसला.

' हे कोण ठाऊक आहे कां तुला ? काल मी ज्यांचा निबंध तुला वाचायला दिला तेच हे. ' प्रोफेसर मजकुरांनीं आपल्यापरीने जीवनची ओळख करून दिली.

' असं कां ? ' म्हणून कवितेने सस्मित जीवनकडे पाहून आपला आदरभाव व्यक्त केला.

तेव्हा प्रो. कवीश्वर जीवनला म्हणाले, ' द्याल ना हिला कविता समजावून ? '

' पाहतो प्रयत्न करून. ' जीवनने विनयपूर्वक म्हटलं.

' अच्छा. ' म्हणून प्रो. कवीश्वर खोली बाहेर पडताच कविता म्हणाली, ' इथच बसायचं का येता माझ्या खोलीत ? '

जीवनला काय उत्तर द्यावे, हें न सुचल्यानें तो म्हणाला ' कुठेही चालेल. '

" चलातर मग माझ्या खोलींत. '

कवितेच्या मागोमाग जीवन तिच्या खोलींत आला आणि तिनें पुढें केलेल्या खुर्चीवर बसत बसत त्यानें एकदां चौफेर नजर फिरविली,

समोरच्या भिंतीवर महात्मा गांधी आदि पुढाऱ्यांच्या सुव्यवस्थित लावलेल्या तसबिरी, टेबलावरच्या काचेच्या कपाटात व्यवस्थेशीरपणें मांडून ठेवलेलीं पुस्तकें आणि कोपऱ्यातल्या कॉटवर उघडे पडलेलें महात्माजींचें आत्मचरित्र.....यांनीं चांगलाच परिणाम केला जीवनच्या मनावर!

जीवननें कवितेनें दाखविलेली कविता मननपूर्वक वाचली आणि नंतर तिला समजावून दिली. त्यांत त्याचा चांगला अर्धा तास मोडला खरा! पण कवितेची कुरकुर म्हणून कांहीं राहिली नाहीं. आपणांस ती कविता चांगली कळल्याचें तिनें आपण होऊन कबूल तर केलेंच केलें, वर ती हांसत हांसत म्हणाली, ' तुमच्या सारखा गुरू जर कां मला भेटला तर माझं कच्चं असलेलं इंग्लिश बघतां बघतां सुधारेल. '

" तुमच्या वडिलांसारखे विद्वान प्रोफेसर तुम्हाला लागेल ती मदत करण्यास तयार असतां, मी कोण्या झाडाचा पाला ? ' जीवननें म्हटलें.

' हा तुमचा विनय आहे. बाबा विद्वान् आहेत हें खरं अन् त्यांच्या विद्वत्तेचा उपयोग तुमच्या सारख्या हुशार विद्यार्थ्यांना होतो हेंही मला ठाऊक आहे; पण त्याबरोबर हीही गोष्ट मी जाणते कीं, माझ्या सारख्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्वत्तेचा कांहीं म्हणून फायदा होत नाहीं. वरच्या वर्गाचे विद्यार्थी जितके त्यांच्या इंग्लिशवरच्या प्रभुत्वावर खूष असतात, तितकेंच खालच्या वर्गाचे विद्यार्थी नाखूष असतात. नाहीं कां ? '

जीवनलाही तसेंच वाटत होतें. तीच तक्रार बरेच विद्यार्थी करीत होते. तरी तसें कवितेपुढें बोलून दाखविणें त्याला बरें वाटलें नाहीं.

म्हणून तो विषय तेथेंच सोडण्याच्या इच्छेनें तो म्हणाला, ' बर, विचारीत जा तुम्हांला कांहीं अडलं तर. '

' खरं ना ? ' कविता मिष्किल हास्य करीत म्हणाली, ' कां इथून जाताच तुम्ही हें विसरून जाल ? '

' असं कां वाटलं तुम्हांला ? '

आपण गंमतीनें विचारलेल्या प्रश्नानें जीवन एकाएकीं गंभीर झाल्याचे पाहून कविता म्हणाली, ' कारण यापुढं तुम्हीं मला केव्हां भेटतां कोणास ठाऊक ! '

' न भेटायला मी कांहीं अज्ञात स्थळीं रहात नाहीं. कॉलेजच्या वसतिगृहांतच रहातों नि दररोज कॉलेजला येत असतों '

' तें खर ! पण तुम्हीं स्त्री-द्वेष्टे असल्याचं जिल्लू काल म्हणत होती; म्हणून सहज चेष्टेन मी तस म्हणालें. '

' खरं आहे, ' जीवन हांसून म्हणाला, ' जिल्लूचा माझ्याविषयीं तसा ग्रह होणं साहजिक आहे. '

कवितेला कांहीं जीवनच्या बोलण्याचा फारसा बोध झाला नाहीं. पण काय असेल तें असो तिला त्याला अधिक विचारणें बरें वाटलें नाहीं. तशांत तो जाण्यासाठीं उठतांच तिनें विचारलें, ' फिरून केव्हां येणार ? '

' सोमवारीं येणारच आहें कीं मी हें पुस्तक परत करायला. '

' अन् माझ्या शंका निरसन करायला. '

त्यावेळीं तिनें केलेला बालिश हावभाव पाहून जीवन खुदकन् हांसला. कविताही हासूं लायली.

* * *

कबूल केल्याप्रमाणें जीवन सोमवारीं प्रो. कवीश्वरांच्याकडे आला तेव्हां प्रोफेसर महाशय व कविता देखील फारच घाईत दिसली.

त्याला पाहतांच तिने बालिश हास्य करीत म्हटले, ' आज अभ्यासाला बुट्टि ! '

' ती कां ? '

' आज माझा वाढदिवस आहेना ? '

' अस्सं ! मग जातो मी परत. '

' अंहं ! बाबानीं तुम्हांला मुद्दाम ठेऊन घ्यायला सांगितलंय् '

' तें कशासाठीं ? '

' एवढ्याचसाठीं ' प्रो कवीश्वर आंतून तेथें प्रवेश करीत म्हणाले, ' कवितेला चांदण्याच्या रात्रीं वाळवंटांत सहल करण्याचं मोठं वेड आहे; म्हणून आम्ही आज तिचा वाढदिवस जुहूच्या वाळवंटावर साजरा करण्याचं ठरविलं आहे. '

प्रोफेसर कवीश्वरांना आजच्या इतके खुशीत असल्याचें जिवननें त्यापूर्वी कधींही पाहिलें नव्हतें. त्याला वाटलें, ' प्रत्येकाच्या जीवनांत आनंदी आनंद उत्पन्न करणाऱ्या कांहीं गोष्टी असतातच. तसें नसतें तर मनुष्याचें आयुष्य हें निरानद, अगदीं सहारा वाळवंट बनलें असतें. '

अन् प्रो. कवीश्वरांचा आनंद त्यांची एकुलती एक कन्या कविता असल्याचें त्याला माहीत होतें; आणि आज तर तिचा वाढ दिवस. मग त्यांच्या आनंद सागराला कां नाहीं भरती येणार ?

त्या आनंदाच्या भरांतच त्यांनी जीवनला आग्रह करून ठेऊन घेतलें, वसतिगृहाच्या सुपीरटेंडेंटला त्यांनीं स्वतः चिट्ठी लिहिली कीं, जीवनला रात्रीं परतायला उशीर होईल म्हणून.

आता त्याला त्यांच्याबरोबर जुहूला जाण्यावाचून गत्यंतरच नव्हतें. पण त्यांच्याबरोबर जाणारा तो कांही एकटाच नव्हता; चांगल्या दोन लॉऱ्या भरल्या होत्या आमंत्रित मंडळींनीं.

वर विस्तीर्ण व विविध रंगाच्या छटांनीं युक्त असें आकाश, त्यांत तारकासमवेत हंसत डुलत विहार करणारा पौर्णिमेचा चंद्र, आजूबाजूला हिरवीगार रम्य वनश्री, समोर अथांग सागर, त्यांत उसळणाऱ्या फेसाळ लाटा आणि त्यावरून येणारा गार वारा..... चोहीकडे कसें अगदीं प्रसन्नतेचें वातावरण पसरलें होतें.

कोरडया मऊ वाळूवर जीवन बसला. किती मोकळे मोकळे वाटत होते त्याला. सुंदरशा पिंजऱ्यांत गुबगुबीत राहायला आणि चमचमीत खायाला मिळत असताही तेथून निसटून निसर्गाच्या सान्निध्यांत जाण्यासाठीं पक्षांची सारखी धडपड कां चाललेली असते याची कल्पना आली त्याला.

त्याचें मन भयंकर उल्हसित बनलें. आणि त्यानें सहज समोर पाहिलें तो थोड्या अंतरावर कविता वाळूंत घरकुलें बांधत होती.

किती बालिश ! किती अल्लड !

जीवनच्यानें राहावले नाहीं. तो चटकन् उठला आणि कवितेजवळ जाऊन हांसत म्हणाला, ' अगदीं पोर झालांत कीं तुम्ही. '

कवितेनें मानेला एक नाजुकसा हिसडा दिला आणि डोळ्याच्या अभिनयानें उत्तर दिलें, ' आहेच मुळीं. '

' कुणी पाहिलं तर काय म्हणेल ? ' जीवन विनोदानें म्हणाला, ' एवढ्या बड्या प्रोफेसराची एवढी वडी मुलगी...'

' अन् वाळूत खेळते. असंच ना ? '

कविता हांसली, आणि जीवनलाही आपले हासूं आवरतां आले नाहीं.

' बरी आठवण झाली ' कविता कांहींसें आठवून म्हणाली. ' जिल्लू म्हणत होती कीं, तुमचे वडील पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट आहेत म्हणून. खरं का हें ? '

‘ हो ! कां ? ’

‘ मग ते पक्के राष्ट्रीय वृत्तीचे दिसतात. ’

‘ कशावरून ही अटकळ बांधलीत तुम्ही ? ’

‘ तुमच्या पोषाखावरून. ’

‘ मग तुम्ही सपशेल तोंडघशी पडलांत. ’

‘ तें कसं काय ? ’

‘ अहो, मी हा पोषाख करतों म्हणून माझ्या वडिलांना तो आवडत असल्याचा तुम्ही जो निष्कर्ष काढलांत, तो अगदीं चुकला. त्यांना तो मुळींच आवडत नाहीं. ’

‘ अस्स ? ’ कवितेला त्याचें महदाश्चर्य वाटल्यासारखें दिसलें. जिवननें विचारले, ‘ माझी अशी समजूत आहे कीं, आपण जो पोषाख करतों तों पाहणाऱ्याला चांगला दिसावा म्हणून. आतां तुम्ही सांगा हिंदी तरूण सुटांत चांगला दिसतो कां मी करीत आहें अशा कपडयांत ?’

‘ हिंदी तरूण म्हणजे तुम्हीच ना ? ’

‘ क्षणभर तसं समजायला कांहीं हरकत नाही. ’

‘ खरं सांगायचं म्हणजे मी यावर आजपर्यन्त कधीं विचारच केला नाहीं,’ जीवनला नखशिखांत न्याहाळून पहात कवितेने म्हटलें. ‘ तरी मला वाटतं कीं आपल्या देशाचें हवामान, आरोग्य, मितव्यय, संस्कृति नि सौंदर्य या दृष्टीनं विचार केल्यास, हिंदवासीयांनीं सुटा ऐवजी तुम्ही केला आहांत असा अगर अशा प्रकारचा साधा पेहरावच केलेला बरा. ’

‘ अन् स्त्रियानी ? ’

‘ तें तुम्ही पुरुषांनी ठरवायचं. ’ कविता मिस्किल हास्य करीत म्हणाली, ‘ तुम्हींच आतां नाहीं कां म्हणालांत कीं, आपण जे कपडे करा-

वयाचे असतात ते पाहणाऱ्याला बरें वाटावे ह्मणून; अन् आह्मां स्त्रियांना पाहणारे कोण असतात ? पुरुषच ना ? '

तिच्या त्या कोटिक्रमानें आनंदित होऊन जीवन ह्मणाला, ' तरी तुमची आवड म्हणून कांहीं असेलच कीं ! '

' माझी आवड मी करीत असलेल्या कपड्यावरून नाहीं का कळण्यासारखी ? '

थोडक्यांत आणि समर्पक उत्तर होतें तें ! तिला नीटनेटकी पण साधी रहाणी आवडत असल्याचें, छान छोकीचा, पाश्चिमात्यांच्या अंध अनुकरणाचा तिला अतिशय तिटकारा असल्याचें, तिनें कांहींही न बोलतां जीवनच्या मनावर बिंबविलें.

जीवनला काय बोलावे हें सुचेना. पण कवितेनें त्याला निरुत्तर केल्याचें तिला भासूं नये ह्मणून तो विषयांतर करण्याच्या इच्छेनें हांसत हांसत म्हणाला, ' चांगल्या कवयित्री होऊं शकाल तुम्ही. '

' चांगली होईन किंवा नाहीं हें जरी मला सांगतां आलं नाहीं तरी मी कवयित्री आहे एवढं खास ! '

आतां मात्र जीवनची चांगलीच जिरली; पण तें न दर्शविण्याच्या उद्देशानें तो म्हणाला, ' मला नव्हतं ठाऊक कीं तुम्हीं कविता करतां म्हणून. '

' तुह्मांला माहीत होण्याइतक्या कांहीं माझ्या कविता प्रसिद्ध नाहींत.' हांसत हांसतच कवितेनें टोमणा मारला.

' मग दाखवा ना एखादी कविता म्हणून ! '

आतां मात्र कविता लाजली. गोंधळलीही. आणि ती पातळाचा पदर उगीचच पायाच्या अंगठ्याभोंवती गुंडाळूं लागली.

'मग काय...'

'म्हणतें ना मी.' डोळयाच्या कोपऱ्यांतून जीवनकडे पहात पण किंचित् लटक्या रागानें कविता म्हणाली, 'इतकी कसली घाई लागून राहिली आहे...'

कांहींही न बोलतां जीवन अनिमिष दृष्टीनें तिच्याकडे पाहूं लागला. समोरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीसरशीं तिचे केस भुरभुर उडत होते; आणि तिच्या त्या गुलाबी गालावर चंद्राची सुषमा पडल्यानें, त्याला रम्यपणाची छटा आली होती, आणि ती हंसत नसतांही तिच्या मुखावर हास्य विलसत होतें.

जीवनच्या गालावर मधुर स्मित झळकलें, आणि तन्मयतेनें तो तिची कविता ऐकूं लागला.

विज्ञान-प्रभाकर येई उदया चला
क्रांतिच्या युगाची नौबत झडते चला!
आसुरी बलाचें असह्य होई ऋण
अज्ञान-तमानें अंध जाहले जन
शुभवार्ताहर हा उगवे ज्ञानारुण
दैन्याचा दुर्बल काल आज संपला १

गुदमरती आशा आकांक्षा दृढपणीं
येऊं द्यात आतां उत्शृंखळ उसळुनी
गगनाला घालूं धैर्याने गवसणी
प्रिय प्राण पणाला निर्धारें लाविला २

द्या अुगारुनी द्या बुरसटल्या कल्पना
उन्मत्त रूढिच्या फोडा सिंहासना
पायबंध घाला अन्याया दारुणा
‘ आम्हांस हवे स्वातंत्र्य ’ गर्जुनी बोला ३

पददलित जनांचें प्राशुनिया शोणित
आसुरी मदानें साम्राज्यें हासत !
परि धुळीस त्यांना मिळवाया सांप्रत
सज्जला जगांतिल अशांत समतावाला ४

निज-ध्येय--देवता प्रसन्न व्हायाप्रती
पेटला होम हा धडधडता संपती
अर्पण्या पुढें या स्वार्थत्यागाहुती
पुण्याई-पर्वणी काल निकट पातला
क्रान्तिच्या युगाची नौबत झडते चला ! ५

जीवनला अतिशय आवडली ती कविता. वर्ण्य विषय जिव्हाळ्याचा असल्यानें तो त्याच्या अतरंगाचा ठाव घेत गेला. शिवाय गायलीच होती मुळीं तिनें ती तितक्या भावनात्मकतेनें ! जीवन आनंदाति-शय्यानें उद्गारला, ‘ किती छान गाता हो तुम्ही !’

कवितेला जीवनची प्रशंसा मनापासून आवडल्याचें, तिच्या गालावर एकदम उमटलेले दोन गुलाबच दर्शवीत होते. पण ती किती वस्ताद. ते न दर्शवितां तिनें विचारलें. ‘ आधीं हें सांगा कशी काय वाटली माझी कविता ! ’

‘ मला फारच आवडली ती. ’

‘ खरं ? ’

‘ हो कां ? ’

‘ नाही. कित्येकांना माझ्या कविता रुक्ष नी कंटाळवाण्या वाटतात, म्हणून मी तसं म्हणाले...’

‘ तसं वाटण्याचं कारण ? ’

‘ अहो त्यात प्रणय नाहींना ? ’

आता मात्र जीवनच्या डोक्यांत लख्खकन् प्रकाश पडला. ! तो हांसत म्हणाला, ‘ खरं आहे. ’

तोंच प्रो. कवीश्वरांनी कवितेला हांक मारल्याने ती उठली.

जीवनही उठला आणि म्हणाला, ‘ ठरलं. मी दररोज तुम्हाला एक इंग्लिश कविता समजावून द्यायची, अन् तुम्ही मला एक मराठी कविता म्हणून दाखवायची। ’

‘ वा ! पक्के बनिया आहांत कीं.’

जीवन हांसला, आणि कविताही हांसली आणि प्रो. कवीश्वरांच्याकडे जवळजवळ पळालीच.

जिवनने धोतराला लागलेली वाळू झाडली, आणि तो पाहुण्यांच्या घोळक्याकडे वळला तो सिगरेट फुंकीत पण तारवटलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पहात समोर क्रांतिकुमार उभा असलेला त्याला दिसला. त्यानें हांसत म्हटले, ‘ हॅलो क्रांतिकुमार, तुम्हांला पाहिलंच नव्हतं कीं मी !’

‘ चंद्र दृष्टीस पडल्यावर नंदादीपाकडे कोण पहाणार ? ’

जीवनला तो प्रश्न अप्रासंगीक तर वाटलाच, पण थोडासा चमत्कारिकही वाटला. चंद्र आणि नंदादीपाचा तेथें काय संबंध हेंच त्याला कळेना.

क्रान्तिकुमाराचें बोलणें चेष्टेवारी नेत तो म्हणाला, ' अरे वा ! हिंसात्मक क्रान्तीच्या गोष्टी बोलतां बोलतां तुम्ही काव्यांत बोलूं लागलांत कीं ! '

' आहेच मुळीं त्या दोन्हीचं इतकं साम्य. '

' अस्सं ? मग उद्यां तुम्ही लोक तुमच्या प्रेयसींच्या मानेवरून सुरी देखील फिरवायचे '

' अलबत् ! त्या आमच्याशीं प्रतारणा करून, दुसऱ्याशीं लगट करूं लागतील तर ! '

आतां मात्र जीवननें चमकून क्रान्तिकुमाराकडे पाहिले.

तों क्रान्तिकुमार खूप मोठ्यांदा हासू लागला. त्याचें तें विकट हास्य, त्याच्या नेत्रांतून बाहेर पडणाऱ्या संतापाच्या ठिणग्या... जीवनचा सारा आनंद ओसरला, आणि अकारण त्याचें मन कष्टी बनलें.

तशांत क्रान्तिकुमार म्हणाला, ' जीवन, थोडसं जपूनच हं ! ' आणि पूर्ववत् विकट हास्य करीत, तो तेथून चालता झाला.

जीवनला त्याच्या त्या विक्षिप्त वर्तनाचें कारणच कळेना. हा कांहीं तसा पहिला प्रसंग नव्हता, पण आजच्याप्रमाणें तो रागानें बोलल्याचें व विकट हास्य करीत निघून गेल्याचें त्याला आठवत नव्हतें.

तो त्याच्याशीं कधींही वैरभावानें वागल्याचें त्याला आठवत नव्हते. असें असतांही त्यानें त्याच्याशीं तसें वागावे त्या दोघांची मतें भिन्न तर पडली म्हणून? कां तो लवकरच त्याच्याविरुध्द वक्तृत्वोत्तेजक चढाओढींत भाग घेणार होता म्हणून ?

त्याला वाटलें हीच का खेळाडू वृत्ति ?

त्याच्या मनाला नसती चुटपुट लागून राहिली, एवढें मात्र खरें !

# १०

जीवनच्या आयुष्यांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्याजोगा प्रसंग घडला होता आज; कॉलेजांतील वक्तृत्वोत्तेजक चढाओढींत तो पहिला आला होता. क्रांतिकुमार सारख्या पहिल्या प्रतीच्या वक्त्याला त्यानें मागें सारलें होतें.

अध्यक्ष प्रो. कवीश्वर यांनी जीवनला पहिलं बक्षिस दिल्याचें जाहीर करतांच, त्याच्या सर्वांगावर आनंदोर्मीचें थैमान सुरू झालें. त्याचें हृदय हर्षातिशयानें भरून आलें.

विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या प्रचंड कडाकडाटांत तो विंगमध्यें आला.

त्याच्या मागोमाग तेथें प्रवेश करीत प्रो० कवीश्वर म्हणाले, 'खरोखरच आज तुम्हीं कमाल केलीत, आज तुम्हीं कॉलेजांत पहिला नंबर पटकावलांत, उद्यां कॉलेजच्या सामन्यांत पहिले याल...'

जीवनच्या अंगावर अधिक मांस चढल्या सारखें झालें. हार्दिक शाबासकीच्या चार शब्दांनें केवढें कार्य होतें हें !

'हें सर्व आपल्याच शिकवणीचं फळ आहे सर ! ' विनयानें नम्र झालेला जीवन म्हणाला.

'तुमच्यासारखे हुषार नी अभ्यासू विद्यार्थी असले म्हणजेचआमच्या प्रयत्नांचं चीज होतं. ' प्रोफेसर महाशय स्नेहभरानें जीवनच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, 'प्रयत्न करण्यास आम्हांला अधिक उत्साह वाटतो... '

तोंच धांवतच तेथें येऊन कविता ह्मणाली,' Congratulations जीवन...'

जीवननें स्मित हास्य करून तिजकडे पाहिले. आनंदांत आनंद मिसळला.

' अहो थँक्स तरी ह्मणा कीं, ' शेवटीं कविता आपल्या पोरकट-पणावर गेलीच.

' या औपचारीक गोष्टींचा मला मनस्वी तिटकारा आहे, ' जीवननें हांसत हांसत टोला लगावला.

' शाबास ! चांगला टोमला दिलांत, ' प्रो. कवीश्वर हांसत म्हणाले.

पण कविता कांहीं कमी नव्हती. नाकपुड्या विस्फारीत तिनें म्हटलें, ' हो. तुमचेच शिष्य कीं नाहीं. '

तोंच जीवनचें अभिनन्दन करण्यासाठीं विद्यार्थ्यांच्या झुंडीच झुंडी तेथें लोटल्या. प्रो. कवीश्वरांना तेथून काढता पाय घेणेंच बरें वाटलें. त्यांच्या बरोबर बाहेर जाण्यासाठीं कविताही दरवाज्याकडें वळणार तोंच कांहींसें आठवल्यानें ती परतून जीवनला म्हणाली, ' रविवारी ट्रिपला येणार ना ? '

' हो ! पण सशय कां आला ? '

' कालच संशय—कल्लोळ पाहिला आहेना मी ! '

' कां ? फार खुशींत दिसतेय् स्वारी आज ? '

' तसा प्रसंगच नाहीं का आजचा ? '

हांसत हांसत तिनें बाहेर धूम ठोकली.

आणि जीवत कौतुकानें तिच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात असतां, हॉस्टेलचा शिपाई तेथें येऊन त्याला ह्मणाला, ' साहेब, कुणी बाई

खोलीवर आपली वाट पहात असून तुम्हांला देण्यासाठीं त्यांनीं ही चिठ्ठी दिली आहे. '

जिवननें चिठ्ठी घेतली. आणि ती उघडून तो वाचूं लागला.

प्रिय जीवन,

मला नव्हती कल्पना कीं मुम्बईस येऊन तुम्ही एवढी प्रगति केली असलसी ! वक्तृत्वकलेमध्यें तुम्हीं इतके पारंगत झालां असाल, इतकंच नव्हे तर सबंध कॉलेजांत तुम्हीं पाहिले याल असं मला कुणी सांगितलं असतं तरी त्यावर माझा विश्वास बसला नसता, पण आज मी ती गोष्ट प्रत्यक्ष पाहिली.

कितीतरी लिहावसं वाटतं, लिहिण्यापेक्षां बोलावंस वाटतं, पण नकोच तें ! आपलं हार्दिक अभिनन्दन करून मी आपली रजा घेते.

आ. सौ. प्रतिमा

'प्रतिमा' चालतां चालतां जीवन विचार करूं लागला. 'कोण बुवा ही?'

' साहेब ! ' त्याच्या बरोबर चालणारा शिपाई ह्मणाला, 'पहिल्यांदा बाईनी चिठ्ठी लिहून दिली, पण नंतर त्याना काय वाटलं कुणास ठाऊक, तुम्हांला भेटूनच जाण्याचं त्यानीं ठरावेलं...'

' अस्सं ! ' ह्मणून हातातल्या चिठ्ठीवरून नजर फिरवीत जीवन विचार करू लागला, ' पूर्ण परिचिताप्रमाणें लिहिते, पण प्रतिमा, सौ. प्रतिमा ह्मणून कुणी ओळखीची...'

तोंच त्याच्या खोलच्यिा दाराला रेलून उभा असलेल्या तरुणीकडे त्याचें लक्ष गेलें आणि तो आश्चर्यानें उद्गारला, ' कोण उपमा ! '

होय उपमाच होती ती. पण ती कांहीं बोलली नाहीं. उदास नजरेने ती त्याच्याकडे पहात होती. तिची प्रकृति बरीचशी खालावली होती.

उन्हाच्या तिरपीनें करपणाऱ्या फुलाप्रमाणें फिक्या व निस्तेज दिसणाऱ्या तिच्या चेहऱ्याकडे पहात असता, एकाएकी गंभीर बनून जीवन ह्मणाला, ‘ प्रतिमा म्हणजे उपमा असेलस वाटलं नव्हतं मला. ’

‘ लग्नानंतर बायकांची नांवं बदलतात जीवन. ’

‘ पण तुझं लग्न झालं असेल असंच मुळीं मला वाटलं नव्हतं. ’

‘ न वाटणाऱ्या गोष्टी देखील कित्येकदां नाहीं कां या विचित्र जगांत घडत ? ’

जीवन गोंधळला. तिची ती उत्तरें देण्याची तऱ्हा, तिच्या चेहऱ्यावर क्षणाक्षणाला दाट होणारी खिन्नतेची छटा...

त्यानें विचारलें, ‘ किती गंभीर, किती पोक्त दिसूं लागलीस तूं या चारसहा महिन्यांत...’

‘ लग्नानंतर स्त्रिया गंभीर बनतात, जीवन. ’

‘ पण तूं इतकी उदास का? ’ जीवननें इतका वेळ त्याच्या मनांत घोळत असलेला प्रश्न विचारला, ‘ तूं इतकी कष्टी कां ? ’

उपमेनें खालचा ओंठ वरच्या दंतपंक्तीने घट्ट दाबला आणि समोर पाहिलें. नुकत्याच विकत घेतलेल्या गोजिरवाण्या मैनेला घेऊन एक गृहस्थ येत होता. तो हांसत होता, तर ती मैना सारखी चिंव चिंव करून ओरडत होती.

तिकडे बोट करून उपमेनें विचारलें, ‘जीवन, कां ओरडतेय् ती मैना?’

‘ तिला दुःख होतय् ’

‘ कशाचं ? ’

‘ तिला तिच्या पूर्वीच्या मालकापासून दूर केलं म्हणून; तिची इच्छा नसतांना तिला दुसऱ्याला दिलं म्हणून...! ’

'होय ना ? मग सांगा, पूर्वीच्या मालकाला काय वाटत असेल ?'

'अपरिमित दुःख.'

उपमेनें विकट हास्य करून म्हटले 'हं ! नुसती कल्पना आहे ही !'

'कल्पना !'

'हो ! कल्पनाच' निश्चल नजरेने जीवनकडे पहात उपमा म्हणाली, 'आपल्यापासून तिची ताटातूट होताच, तिनं कष्टी का व्हावं म्हणून उलट तो प्रश्न करील. पुरुषाची जात आहे की नाही त्याची ...'

आता मात्र जीवनच्या डोक्यांत लख्खकन् प्रकाश पडला. बेचैन होऊन तो उद्गारला 'उपमा !'

'जातेंच मी. वेडं मन ! तुम्ही एवढं दाडगं यश मिळविलं असतां तुम्हाला भेटून तुमचं अभिनंदन केल्याविना मला राहवेना. तेवढयांच-साठीं मी इकडे आलें. मीही याच कॉलजात नाव दाखल केलं असताही, इतकच नव्हे तर दररोज मी तुम्हांला पहात असताही, फार काय तुम्ही इथ रहात असल्याचं देखील मला ठाऊक असतांही, मी तुम्हाला कधीं भेटले नाहीं. हो मुद्दामच मी तो प्रसंग टाळला. म्हटलं माझा कशाला तुमच्या नवीन मैत्रींत व्यत्यय...'

'काय बोलतें आहेस तूं हें ?'

'खरंच काय बोलतें आहे मी ? माझं मलाच कळत नाहीं तिथं... जातेंच कशी मी.'

ती झपझप पावलें टाकित चालू लागली.

विलक्षण चकित् होऊन जीवन ओरडला. 'उपमा ! उपमा !'

पण उपमेनें मागें वळून म्हणून पाहिलें नाहीं. मात्र दुसऱ्या बाजूनें येऊन जिल्लूनें विचारलें, 'कुणाला हांक मारलीत तुम्हीं जीवन ?'

दु:खावर डागण्याच होत्या त्या. निदान जीवनला त्या तशा वाटल्या. म्हणून खोलीचे दार उघडून आत जांत तो वैतागानें म्हणाला, ' कृपा-करून आपण इथून जाल कां ? '

' मी काय केलं बाई ? ' बुचकळ्यांत पडलेली जिल्लू म्हणाली, ' मी विचारलं कीं...'

' म्हणूनच म्हणतो कीं तुम्हीं आता इथून जाल कां ? '

जिल्लूला आजचा रागरंग कांहीं ठीक दिसला नाहीं. जीवनचें ते तारवटलेले डोळे, ते विखुरलेले केस ., तो दारू पीत नसल्याचें जर का तिला माहीत नसते तर...

म्हणूनच तेथून काढता पाय घेत ती म्हणाली, ' जातें मी. मी कांहीं गप्पा मारण्यासाठीं तुमच्याकडें आलें नव्हते ट्रिपला आम्हीं आमच्याच गाडींतून जाण्याच ठरविल्यान तुम्ही त्यातून येता कां म्हणून विचारायला आलें होतें मी. '

' नाही '

एकच शब्द. पण किती कर्णकटु, मर्मभेदी वाटला तो जिल्लूला. विलक्षण चकित होऊन तिने विचारलें ' पण तें कां ? '

' मी ट्रिपवरच येणार नाहीं. '

' अं ! काल तर येतो म्हणाला होता. '

' पण आज येणार नाही म्हणून सांगतो ना मी ! '

जीवननें धाडकन् खोलीचे दार बंद करून घेतले.

* * *

कॉलेजच्या पोर्चमध्यें मोटार येऊन उभी राहतांच, जिल्लू घाई-घाईनेच खालीं उतरली; खाड्खाड् बुटाचा आवाज करीत लेडीजरूममध्यें

आली आणि कोपऱ्यांतल्या टेबलाशीं रेलून उभ्या राहिलेल्या कवितेकडे तिरप्या नजरेनें पहात, पण समोर कॅरम खेळणाऱ्या विमलला उद्देशून म्हणाली, ' बरं कां ग विमल, जीवन येणार नाहींत आज. '

' ते ग कशावरून ? ' खेळण्याचे बंद ठेऊन विमलनें विचारलें.

' अग, परवांच्या त्या वक्तृत्वोत्तेजक चढाओढीपासून,ते असें काहीं विक्षिप्तपणानं वागताहेत कीं काही विचारू नकोस. त्यांना खोलींतून बाहेर पडलेलं कुणी पाहिल आहे कां ? '

' म्हणून ते ट्रिपवर येणार नाहींत असा निष्कर्ष काढणं तर्कशास्त्राच्या दृष्टीनं चुकीचं आहे; ' कोपऱ्यातल्या खुर्चीवर बसून तर्कशास्त्राच्या पुस्तकांत खुपसलेलें डोकें किंचित् वर काढीत सुमती म्हणाली.

' अग पण माझं म्हणणं तर पुरं ऐकून घे, अन् मग पहा तुझं तर्कशास्त्र काय म्हणतं ते. '

सुमती खजील झाल्याचे पाहून समाधानाचें हास्य करीत जिल्लू म्हणाली, ' परवां मी त्यांच्याकडे आमच्या गार्डीतून ट्रिपवर चलण्याविषयीं सांगायला गेले, तों त्यानीं ट्रिपवरच येणार नसल्याचं सांगितल. '

' अस्सं ? '

' अन् त्यावेळीं त्यांनीं चेहरा असा कांहीं वेडावांकडा केला कीं, त्यांची मनःस्थिति भयंकर प्रक्षुब्ध असल्याचं मला कळून चुकलं. '

' अंह ! अजूनही मला तुझं म्हणणं पटत नाहीं,' सुमती म्हणाली. ' वाङ्मय मंडळाच्या सदस्यानीं ट्रिपवर जावं, त्यांनीं खूप खेळावं नि पुष्कळ विषयावर चर्चा करावी म्हणून त्यांनींच ना हा बेत सुचविला, नि नाखुष असलेल्या सेक्रेटरीचं मन वळविलं ?...'

' तें खरं गं ! ' जिल्लू मानभावीपणानें म्हणाली, ' पण त्यानंतर

त्यांचं मन उद्विग्न बनलं असलं तर ? तसं नसतं तर, ते काल सरोजिनी नायडूंच्या भाषणाला कां हजर राहिले नसते ? '

' आमच्या लक्षांत ही गोष्ट आली नाहीं बाई. ' विमल म्हणाली.

' पण माझं होतं ना लक्ष त्यांच्यावर. भाषण संपेतों माझी नजर त्यांना सारखी धुंडाळीत होती, पण ते कांहीं दिसले नाहींत; भाषणानंतर मी मुद्दाम हॉस्टेलच्या शिपायाजवळ चौकशी केली तेव्हां ते त्यांच्या खोलींतच असल्याचं कळलं. '

' असं ! '

' अन् म्हणून मी म्हणते कीं, जीवनना कष्टी होण्यास तसंच कांहीं तरी सबळ कारण घडलं असलं पाहिजे. '

' खरं आहे. ' सर्वांचे एकमत झाले.

' मुळींच नाहीं, ' इतकावेळ काहीही न बोलतां गप्प बसलेली, पण वरील संभाषण लक्षपूर्वक ऐकणारी कविता म्हणाली, ' तुम्हांला नसते तर्क वितर्क लढवायला हवेत. तसंच कांहींतरी महत्वाचं काम असल्यामुळं, जीवन कालच्या सभेला हजर राहू शकले नसतील म्हणून...'

' अग, पण तें आम्हांला कसं माहीत असणार ? ' जिल्लू खवचटपणानें म्हणाली, ' आम्हांला ते थोडच दररोज भेटतात, की आमच्याबरोबर तासन् तास गुलगुल गोष्टी करीत बसतात. '

हंशाच हशा पिकला तेथें. नाहीं म्हणायला पलीकडे आरशा शेजारच्या खुर्चीवर बसून तोंडापुढे फ्री-प्रेस धरलेल्या, पण लक्षपूर्वक वरील संभाषण ऐकणाऱ्या उपमेच्या चेहऱ्यावर विकट हास्य पसरले आणि रागावलल्या कवितेचे डोळे लाल झाले. चिडूनच ती म्हणाली, ' म्हणून तुम्हांस भारी वाईट वाटत असेल नाहीं ? '

' तें ग काय म्हणून ? ' आंतून उचंबळून येणारें हंसू आंतल्या आंत दाबण्याचा प्रयत्न करीत विमल म्हणाली, ' तू चोवीस तास त्यांच्याशीं बोलत बसलीस म्हणून, आमचं थोडच बिघडणार आहे ! होय ना ग जिल्लू ?'

' केव्हांहीं '

' होय ना ? ' अधिकच चिडून कविता म्हणाली. ' बसा तर मग मुकाट्यानं गप्प. मी सांगते कीं जीवन ट्रिपवर खात्रीन येणार. '

तोंच हॉस्टेलचा शिपाई कवितेजवळ येऊन म्हणाला, ' जीवन साहेबांनीं आपण ट्रिपवर येणार नसल्याचं तुम्हांला कळवायला सांगितलय्. '

' हिप् हिप् हुर्रे ! ' मुली टाळ्या पिटीत ओरडल्या. उपमेच्याही चेहऱ्यावर समाधानाची छटा पसरली.

कविता चिडली, संतापलीहि, आणि रागानें बेफाम होऊन ओरडली, ' काय वाटलं तुम्हाला ? मोठी लढाई जिंकली असच नाहीं ? हंसतां काय आहांत; खिदळतां काय आहात. जीवन येणार नसल्याच शिपायानं सांगताच तुमचाच तर्क बरोबर असल्याचं तुम्हाला वाटलं असेल नाही ? पण आतां ते आल्यावर मात्र नाकावर टिचल्याप्रमाण गप्प बसाल. '

'ते आल्यावर ना ?' हासत जिल्लू म्हणाली, ' ते तर येणार नाहीत.'

' दिसेलच आतां ते ! '

कवितेनें कोपऱ्यांतल्या टेबलापुढें खाडकन् खुर्ची ओढली, तिच्या वर बसून बरोबर आणलेल्या वहीतील एक कोरें पान फाडेल आणि त्यावर घाईघाईनेच लेडीजरूममधील हकीकत थोडक्यात निवेदन करून शेवटीं लिहिलें, ' तुम्ही येणार असल्याचा उलट निरोप आला तरच मी ट्रिपवर जाईन. ' ती चिट्ठी शिपायाजवळ देत ती म्हणाली, ' नेऊन दे ही जीवनना. अन् ते काय म्हणतात तें मला येऊन सांग. '

' हा मी इतक्यांत आलोंच ह्मणून सांग. ' असें जीवननें ह्मणतांच शिपाई निघून गेला.

जीवन तोंड धुतलें, घाईघाईनेच केंसावरून हात फिरविला, आणि लगबग पोषाख करून तो खोलीबाहेर पडणार तोंच, उपमेला तिकडेच येत असल्याचें त्यानें पाहिलें. त्याचें पाय जागच्या जागींच थबकले.

तिचा चेहरा बराचसा गंभीर दिसत होता, उदास दिसत होता, किंचित् रागीटही दिसत होता.

जीवनजवळ येताच, त्याच्या मुखावर आपली तीक्ष्ण नजर भिडवीत तिनें विचारलें, ' प्रथम ट्रिपला येत नाहीं म्हणून सांगून नंतर येत असल्याचा निरोप तुम्ही का धाडलात ? '

' कवितेचा निरोप आला...'

' तुमच्यावर हुकमत चालविणारी कोण ही कविता ? '

' उपमा ! '

'मला नाहीं आवडत, तुम्ही तिला चिठ्या चपाट्या पाठविलेल्या, तिच्या बरोबर तासन् तास गप्पा मारीत बसलेलं, कीं अतिशय सलगीनं वागलेलं...

' नाही आवडत ! ' विस्मयचकित् होऊन जीवन उद्गारला. ' पण तें कां ? '

' कां ? कां ? कां ? '

ती एकदम रडूं लागली.

आतां मात्र जीवन बुचकळ्यांत पडला. उपमेच्या त्या विचित्र वर्तनाचे गूढ न उकलल्यानें त्यानें विचारलें, ' अस काय करतेंस तूं ? '

' निष्ठूर, निर्दय आहांत तुम्ही, ' उपमा अश्रू पुशीत म्हणाली, ' शेवटीं आपल्या जातीवर गेलांत ! '

'काय बोलते आहेस तूं हें ? मी तसं वागल्याचं...'

तोंच समोरून तिकडेच हांसत हांसत येणाऱ्या कवितेकडे तारवटलेल्या नजरेनें पहात उपमा म्हणाली, ' तो पहा पुरावा ! '

झपाझप् पावलें टाकीत ती निघून गेली आणि वृत्ति बधीर झाल्याप्रमाणें तो तिच्याकडे पहात राहिला.

आनंदातिशयानें कवितेनें म्हटले, ' तुम्हीं येण्याचं कबूल केलंत; कित्ति कित्ति छान केलंत म्हणून सांगूं ! पण इतका वेळ काय करीत होता तुम्हीं ? अं ! '

जीवन कांहीं बोलला नाही, आपल्या डोळ्यांत तरंगणारे अश्रू कवितेला दिसूं नयेत म्हणून तो झपाझप् पावलें टाकूं लागला.

आपल्याच नादांत असलेल्या कवितेला वाटलें कीं, आधींच उशीर झाला आहे त्यांत अधिक व्हायला नको म्हणूनच तो घाईघाईनें चालू लागला असावा. तीहि त्याच्या मागोमाग जाऊं लागली.

\+ + +

बरोबर आणलेल्या फराळावर यथेच्छ ताव मारून सारा विद्यार्थीवर्ग आंब्याच्या झाडाखालीं आरामांत बसला असतां, एकाला ग्रामोफोन लावण्याची लहर आली.

गाणें ऐकत व गप्पा मारत ते हांसत खिदळत होते. तोंच समोरून एक वयस्क गृहस्थ तेथें आला आणि कोपऱ्यांत बसलेल्या एका मुलाला म्हणाला, ' हात दाखवतां कां ? अगदीं अचुक भविष्य सांगतो बघा. '

जोरानें हास्याची लाट उसळली तेथें.

पण त्याचा कांहीं त्या जोतिषाच्या मनावर परिणाम झाल्यासारखा दिसला नाहीं, आपली शांत मनोवृत्ति मुळींच ढळूं न देतां, तो म्हणाला,

' माझं गंभीर बोलणं असं हंसण्यावारी नेऊं नका तुम्ही, माझं भविष्य मनाशीं पडताळून पहा, आणि मगच—'

' अरे ! अरे ! पण त्याला चेहरा इतका कष्टी कशाला करायला हवा ? ' अष्टेकराची विनोद बुद्धि जागृत झाली.

' तस नसेल, त्याचं स्वतःचंच भविष्य आतिशय वाईट असल्याचं जाणून बिचारा इतका कष्टी झाला असेल, ' परूळेकरानें आपलें मत मध्येंच ठोकून दिलें.

आतां मात्र ज्योतिषाच्यानें रहावलें नाहीं. तो म्हणाला, ' किती वात्रट आहांत पोरांनो ! '

' इथं सारी पोरच आहेत कां ? ' जिल्लूनें म्हटलें. विद्यार्थी फिरून खों खों करून हांसू लागलें.

' हें सांगायला ज्योतिषी कशाला पाहिजे पोरी ' ज्योतिषी बारकाईने जिल्लूच्या चेहऱ्याकडे पहात म्हणाला, ' पण एवढं मात्र मी खात्रीनं सांगूं शकतों की, आज काल तुला मात्र एका पोराशिवाय कांहीं दिसत नाहीं कीं कांहीं सुचत नाहीं. '

' ही काय भानगड आहे बुवा ? ' म्हणून मुलें सहेतुक नजरेनें एकमेकांकडे पाहूं लागले. मुली तोंडाला रुमाल लावून हांसू लागल्या.

आतां मात्र सर्वांचे लक्ष ज्योतिष्याकडे वेधले.

' हिच्या चेहऱ्यावरून असं स्पष्ट दिसतं कीं, हिचं एकावर प्रेम असून तो...'

' कोण निलाजरा आहे मेला ? ' रागानं ज्योतिष्याच्या अंगावर उसळून जिल्लू म्हणाली, ' लाज कशी वाटत नाहीं असं सांगायला. '

जिल्लू एकाएकीं हमरी तुमरीवर आल्याचें पाहून, तेथें कांहींतरी पाणी मुरत असल्याचें पुष्कळांनीं ताडलें आणि म्हणूनच काहिजण ओरडले,

' अहो ज्योतिषीबुवा, या इकडे अन् सांगा आमचं भविष्य. पण कांही कांहीं म्हणून लपवून न ठेवता ह ! '

ज्योतिष्याच्या चेहऱ्यावर समाधानाचें हास्य झळकलें आणि तो विद्यार्थ्यांच्या घोळक्यांत प्रवेश करताच सोराब जीवनला पुढें करीत म्हणाला, ' सांगा याच भविष्य. '

' माझं ! ' जीवन म्हणाला ' नकोरे बाबा. '

' कां ? सारं गुह्य बाहेर पडेल म्हणून ? '

' ह ! माझं कसल आल आहे गुह्य ' जीवन तुच्छतापूर्वक हांसून म्हणाला.

' नाहींना ? मग कर तर हात पुढ. सांगा हो ज्योतिषीबुवा याचं भविष्य. पण कांहीही लपवून न ठेवता ह ! '

ज्योतिष्यानें जीवनचा हात आपल्या हातांत घेतला आणि बारकाईनें तो अवलोकन करूं लागला.

सर्वजण अधिरतेनें त्याच्या मुखाकडे पाहूं लागले.

आणि जीवन गालांतल्या गालांत हंसू लागला.

' तुम्ही हंसता आहात खर; पण तुमच हृदय रडत असलं पाहिजे साहेब. ' ज्योतिषी सांगू लागला.

' तें काय म्हणून ? ' जीवननें चमकून विचारलें.

' तुमच्या हातावरच्या रेषाच सांगताहेत तें. तुम्हांला कसलं तरी दुःख होत असलं पाहिजे. तसच तुम्हाला तुमच्या वडिलांचं सुख नसल्याचं पण... '

' राहूं द्या हो तें, ' सोराब मध्येंच म्हणाला, ' काय घेऊन बसला आहांत वडिलांच्या सुखाचं ! मुलगा मोठा झाल्यावर कां त्यानं कधीं त्याची फिकीर केली आहे ? दुसऱ्या सुखाविषयीं सांगा. '

' आतांपर्यंत आईचं सुख भरपूर लाभलं आहे ' ज्योतिषी सांगू लागला, ' पण यापुढ लाभेलसं वाटत नाहीं साहेब...'

' डोचकं तुमचं ! ' ज्योतिष्याच्या हातातून आपला हात झटकन् काढून घेत जीवन रागानें म्हणाला, ' असलं अभद्र बोलायला...'

' राग आला तुम्हांला ? अहो, हातावर जे दिसलं तें मी तुम्हांला सांगितलं. तोंडपूजेपणा आपल्याजवळ नाहीं साहेब ! '

' राहू द्याहो तें ! ' सोराब थोडासा चिडूनच म्हणाला, ' दुसर कांहीं तरी सांगा. वर्तमान काळांतल्या गोष्टी सांगा. तरुणांना आवडणाऱ्या गोष्टी सांगा. '

ज्योतिष्यानें त्याचा आशय ओळखला. त्यानें फिरून एकदा जीवनचा हात पाहिला आणि स्मित हास्य करीत तो म्हणाला, ' स्त्रियांची फारच आवडती दिसतेय् स्वारी. पुष्कळ मुली यांच्यावर प्रेम करीत असतील.'

' मार डाला. ' सोराब टाळ्या पिटीत ओरडला.

विद्यार्थी हांसले, विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरही स्मित झळकलें,

पण उपमेचा चेहरा मात्र एकदम फिकट पडला.

' माझ्यावर ? ' जीवन मोठ्यांदा हांसत म्हणाला, ' जगातले सारे पुरुष मेले की काय ? '

त्यानें सहज मुलींच्या घोळक्याकडे पाहिलें. कविता गालांतल्या गालात हांसत होती, मिस्किल हास्य करणारी जिल्लू डोळे लांब करून त्याच्याकडेच पहात होती आणि उपमा ! तिचा चेहरा क्रुध्द तसाच उदास दिसत होता.

जीवनचा चेहरा खरकन् उतरला. त्यानें आपला हात ज्योतिषाच्या हातांतून काढून घेतला आणि त्याच्या अनिष्ट मनःस्थितीची कल्पना

इतरांना येऊं नये म्हणून सोराबला ज्योतिषापुढें करीत तो म्हणाला, ' आतां सांगा याचं भविष्य. '

ज्योतिषी सोराबचा हात पाहूं लागला.

विद्यार्थ्यांचें लक्ष आपल्यावरून उडून सोराबवर वेधल्याचें जीवननें जाणलें. म्हणून पलीकडे थोड्या अंतरावर असलेल्या भांड्यांतील पाणी पिण्याच्या निमित्तानें तो तेथून उठला आणि दूर असलेल्या चिंचेच्या झाडाखाली जाऊन बसला.

' या पुढं तुम्हांला आईचं सुख लाभणार नाहीं. '

हे थोड्या वेळांपूर्वीचें ज्योतिष्याचें वाक्य जरी सारखें त्याच्या मनांत घोळत होते तरी त्याचा ज्योतिषावर विश्वास नसल्यानें त्याला त्याचें कांहीं वाटत नव्हते. पण जर कां कोणत्या गोष्टीची त्याच्या मनाला सारखी टोचणी लागून राहिली असेल तर ती उपमेच्या त्याच्या बरोबरच्या विलक्षण वर्तनाची.

उपमा !

त्याचें तिच्यावर निरतिशय प्रेम होतें; पण त्या प्रेमाची परिणति दोघांच्या मीलनांत, वैषयिक मीलनांत होण्यासारखी नव्हती आणि त्याला तें व्हावें असेंही वाटत नव्हतें. पण तिनें त्याच्यावर रागवावें, चिडावें, त्याच्याकडे पाहून नाक मुरडावें...

अन् तेंही कांहीं कारण नसता ! त्यानें कधीं काळी तिचे मन दुखविल्याचेंही त्याला आठवत नव्हतें.

आणि म्हणूनच त्याचें मन अतिशय कष्टी बनलें होतें. तें कशांतही रमत नव्हतें. त्याला आनंद म्हणून कशांत वाटत नव्हता.

शेवटीं उपमेला भेटून साऱ्या गोष्टींचा स्पष्टपणें खुलासा करून घेण्याचें त्यानें ठरविलें. कारण या पुढें हा मुका मार असाच सहन करणें

त्याच्यानें शक्य नव्हते. तोंच जिल्लू तेथें आली.

ती फारच खुशींत दिसत होती. मूर्तिमत हास्य तिच्या चेहऱ्यावर बिलसत होतें.

' मघा त्या ज्योतिष्यानं काय सांगितलं ठाऊक आहे का तुह्मांला अं ? ' डोळ्याच्या कोपऱ्यातून जीवनकडे पहात तिनें विचारलें.

' हो ! कां ? '

' नाहीं म्हटल कितपत आपणांस त्याचं म्हणणं पटलं ? '

' भविष्य ! अन् पटणं ! शक्य आहे कां तें ? '

' कां नाहीं ? '

' पटत नाहीं ह्मणून ! तुमचंच पहाना. त्यान सांगितलं कीं तुमचं एकावर प्रेम आहे म्हणून. मग सांगा, आहे का तुमचं कुणावर प्रेम ? '

' हो ! '

' आं ! '

' कां तुम्हांला आश्चर्य वाटलं ? '

' मला वाटलं नव्हतं कीं, तुम्हीं कुणावर प्रेम करीत असालसं. '

' कुणावर म्हणजे तुमच्यावर. ' जिल्लूनें लगेच आपली नजर जमिनीकडे वळविली.

' माझ्यावर ! ' जीवन महादाश्चर्यानें उद्गारला, ' वेडे पोरी, अशा प्रेमाबिमाच्या गोष्टी बोलूं नकोस तूं माझ्याबरोबर ! मी आपला आहे आडदांड मनुष्य. तुझ्यासारख्या रंगेल गुलहौशी पोरीबरोबर प्रेमाचे खेळ खेळायला अगदींच नालायख. वरवर फायदेशीर दिसणारा हा सौदा फारच महाग पडायचा तुला. जा. एखादा छाकटा मुलगा शोधून काढ, अन् सुरू कर त्याच्याबरोबर प्रणयाचे खेळ खेळायला. तुझ्या सहवासासाठीं,

नव्हे तुझ्या प्रेमासाठीं हपापलेलीं पोरं, काय थोडी आहेत आपल्या कॉलेजात नि कॉलेज बाहेरही... '

' हृदय शून्य! ' जिल्लू चिडून म्हणाली, ' अगदींच उलटं काळीज आहे तुमचं. '

अन् भयंकर संतापून ती जोजोरानें पाय आपटीत तेथून निघून गेली.

जिल्लूचें मन दुखविल्याबद्दल जीवनला वाईट वाटलें; पण ही गोष्ट त्याला केव्हां ना केव्हा करावी लागणार असल्याचें तो पूर्णपणे जाणून असल्यानें, झाल्या प्रकाराबद्दल त्याला समाधानच वाटलें. आतां तिला त्याचें प्रेम तिच्यावर नसल्याचें कळून चुकताच, ती आपला त्याजबरोबरचा फाजिलपणा थांबवील, या कल्पनेनें त्याला उलट समाधान वाटलें. त्याच्या चेहऱ्यावर न कळत स्मित झळकलें.

आणि ते हांसत हासत तेथे प्रवेश करणाऱ्या कवितेला दिसल्यानें तिनें विचारलें, ' अहो प्रेमवीर, कसल्या आनंदाच्या उकळ्या फुटताहेत मनात ?'

काहीही न बोलतां किंचित् हांसून जीवननं तिजकडे पाहिलें.

तेव्हां कविता म्हणाली, ' कां आपणावर कोणती मुलगी अधिक प्रेम करते आहे, हे मनातल्या मनांत अजमाविण्याच चाललंय् अं ! '

जीवनने कवितेच्या चेहऱ्यावर भिडविलेली नजर, भेदक व तीक्ष्ण बनली. तिचा तो प्रश्न, आणि तिच्या चेहऱ्यावर विलसणारे मधुर स्मित...

चटकन् त्याच्या मनांत विचार येऊन गेला, ' जिल्लूप्रमाणं हिचं आपल्यावर प्रेम तर नसेलना ? '

जीवन बोलत नाहींसे पाहून कवितेनें आपलें भाषण पुढें चालू केलें, ' चुकता आहांत तुम्ही. एकांतस्थळीं बसून इतका विचार करण्यापेक्षां त्या ज्योतिष्याजवळच चौकशी केली असतीत तर नसत कां त्यान सांगितलं ?

हो ! पण 'यामुळं एक अनर्थ ओढवला असतां; सर्वांना तुमच्या प्रियतमेचं नांव कळून चुकलं असतं...'

जीवनला अद्यापि कवितेच्या मनाचा अंत लागेना. तिच्या अंतरंगाची कल्पना येईना. ती नेहमीप्रमाणें खुल्यादिलानें त्याच्याशीं बोलत होती, त्याच्या बरोबर वागत होती, त्याच्याकडे पाहून हांसत होती आणि...

आपण होऊन तिचें मन अजमाविण्याचें ठरवुन तो म्हणाला, 'मी आज ट्रिपवर न येण्याचं ठरविलं होतं...'

'पण मी आग्रह केला म्हणून आलात. असंच ना ?' कवितेनें हांसत हांसत जीवनचें वाक्य पुरें केलें.

जीवननें अधिक खोल जाण्याचें ठरविलें. तिच्या दृष्टीशी दृष्टि भिडवीत व हांसत तो म्हणाला, 'तुमच्यासाठीं मी आलों असं पाहून, या पांचट विद्यार्थ्यांनीं काय काय तर्क लढविले हें आहे कां ठाऊक तुह्मांला?'

'हुं ! कोण करतो आहे त्याची फिकीर !' कविता बेफिकीरपणें म्हणाली, 'उटल्या सुटल्या आपण लोकांच्या बोलण्याची जर कां पर्वा करूं लागलो तर आपणांस या विचित्र जगांत एक क्षणभरही राहतां यायचं नाहीं. फार काय उद्यां माझ्या पतीनं जर कां मला असं कांहीं विचारलं तर, त्यांना देखील सडकून उत्तर देण्यास मी मागं पुढं पाहणार नाहीं.'

जीवनला आपला संशय चुकीचा असावेसें वाटले; पण अजून त्याची पुरी खात्री होईना. अद्यापि त्याचें मन संशय सागरांत गटंगळ्या खात होतेंच. तें त्याला म्हणाले, 'काढलाच आहेस मुद्दाम विषय उकरून, ने तो शेवटास.'

म्हणून तो हांसत म्हणाला, 'अरे वा! आतां पासूनच लग्नाच्या गोष्टी बोलूं लागलांत कीं तुम्हीं.'

‘ हो ! करतां काय.’ कविता आपल्या भिवया वर चढवीत म्हणाली ‘ बाबांनीं गेल्या सुट्टींत माझा वाङनिश्चय केला नसता तर, कशाला या विचारांनीं आतांच माझ्या डोक्यांत थारा दिला असतां ? ’

‘ वाङ्निश्चय ! ’ जीवन उद्गारला. ‘ वाङ्निश्चय झाल्याचं नव्हत मला ठाऊक. इतक्या दिवसांत तुह्मीं पण कधीं बोलला नाहींत.’

‘ जाणून बुजूनच मला ही गोष्ट तुमच्यापासून चोरून ठेवावी लागली. क्रांतिकुमारांचीच तशी इच्छा होती. ’

‘ क्रांतिकुमाराशीं कां तुमचा वाङ्निश्चय झाला आहे ? ’ जीवनला आश्चर्याचा धक्काच बसला.

‘ हो ! कां ? ’

‘ नाहीं आपलं सहज...’

‘ अन् बरं का जीवन ’ आपल्याच नादात असलेली कविता गालांतल्या गालांत हांसत म्हणाली, ‘ तसं करण्याचा त्यांचा उद्देश कळला तर खात्रीन हसाल तुम्ही. आम्ही दोघेंही एकाच कॉलेजांत शिकत असल्यानं आमचा वाङ्निश्चय झाल्याचं विद्यार्थ्यांना कळतांच, ते चेष्ठा करतील म्हणून त्यांनी मला या गोष्टीची कुणापुढ वाच्यता न करण्यास बजावलं होतं...’

‘ अस्स ! अस्सं ! ’ म्हणून जीवन हांसला खरा; पण त्याचें मन भयंकर उद्विग्न बनले. त्याच्या बरोबरच्या क्रांतिकुमारच्या विचित्र वागण्याचा व त्याच्या कवितेबरोबरच्या वाङ्निश्चयाचा काहीं संबंध तर नसेल ना ? असा संशय डोकावला त्याच्या मनांत. पण याची कल्पना कवितेला येऊं नये म्हणून बळेंच हांसून तो म्हणाला, ‘ म्हणून तुम्ही ही गोष्ट आज मला सांगितलीत वाटत ? ’

' आतां कांहीं त्याची इतकीशी फिकीर बाळगायला नको म्हणा. '

' तें कां ? '

' येत्या सुटींतच आमचं लग्न होणार आहे कीं ! '

' अस्सं ! '

' आलं पाहिजे हं लग्नाला ! '

' अवश्य. पण त्याचवेळीं माझं लग्न असेल तर ? '

' म्हणजे ? '

' माझही लग्न याच सुटींत होणार आहे. '

' किती लबाड आहात हो तुम्ही. इतक्या दिवसांत मला ही गोष्ट कळू देखील दिलं नाहींत ना ? '

' तुमच्याप्रमाणंच कीं. '

जीवन मोठ्यांदा हांसताच कविताही हांसली आणि त्या सम्भ्रमांत तिची मान डावीकडे वळली असता, तिनें त्याबाजूनें जिल्लूला गेल्याचें पाहिलं. तेव्हां ती उद्गारली, ' च् ! किती धांदरट मी ! '

' काय झालं ? '

' जिल्लू मध्येंच उठून गेल्यान, तिला शोधायला म्हणून मी इथे आले, नी तुम्हांला इथं पाहताच तुमच्याशींच बोलत राहिलें. '

' काय काम होत जिल्लूकडे ? '

' कुमारानीं मला संध्याकाळीं बोलाविल्याचं ती मघा बोलली, पण कशाला हें कांहीं तिन सांगितलं नाहीं; अन् एवढ्या मुलींत तिला तें विचारणही मला बरं वाटलं नाहीं. '

' जिल्लूची नी क्रांतिकुमाराची काय ओळख ? '

' ते तिच्याच बंगल्यांत रहात नाहींत कां ? '

' हो खरंच. '

काय असेल तें असो जीवन अधिकच गंभीर नी विषण्ण बनला.

' बरं जातें मी ' म्हणून कविता पळाली आणि जीवन तिकडे सकौतुक पाहात असतां समोरून उपमा आली.

तिला एकांती भेटून तिच्या त्याजबरोबरच्या विचित्र वागण्याचा खुलासा करून घेण्याचें तो मनात आणतो न आणतो तोच तशी संधी आयती चालून आल्याचें पाहून त्याला समाधान वाटले.

ती जवळ येतांच त्यानें हांसून तिच्याकडे पाहिलें. पण अपेक्षप्रमाणें ती त्याच्याकडे पाहून हासली नाहीं; उलट तिच्या भिवया अधिकच वक्र झाल्या आणि तिच्या कपाळावरील आठ्यांत एकदोन आठ्याची भर पडली. इतकेंच नव्हे तर, त्याच्याकडे पाहून मुद्दाम न पाहिल्यासारखें करून ती तशीच पुढे जाऊं लागली.

आतां मात्र जीवनला रहावलें नाहीं. त्यानें हांक मारली, ' उपमा. '

' काय काम आहे तुमचं माझ्याशीं ? ' तेथूनच मागें वळून पहात उपमेनें फणकाऱ्यानें विचारलें, ' दोघीशीं गुलगुल गोष्टी केल्यात तेवढं पुरं नाहीं वाटतं झाल ? '

उपमेच्या प्रश्नातील उपरोध काट्याप्रमाणे जीवनच्या मनाला बोचला. क्षणभर तो गोंधळलाही. तिच्या त्या बेपर्वाईच्या प्रश्नाचा, क्रुद्ध नजरेचा, आणि तुसड वर्तनाचा अर्थच कळना त्याला. सांगलीस असतांना त्याला पाहतांच खुद्कन् हंसणारी, हमरस्त्यांत तो भेटला असताही, तासन्तास त्याच्याबरोबर गप्पा मारणारी, एखादा दिवस कां भेटल्याविना गेला कीं, भले लांब लचक पत्र धाडणारी, त्यानें त्याचें ताबडतोब उत्तर न धाडल्यास रुसून गोंधळ माजविणारी उपमा, आणि आज इतक्या दिवसानें तो तिला

एकांती भेटला असतां, तो आपणहून तिला बोलावित असतां, वरील प्रमाणें बेपर्वाईनें वागणारी उपमा एकच कां ? असा विचार येऊन गेला त्याच्या मनांत. तिचें त्याजबरोबरचें विचित्र वर्तन ह्मणजे एक न उकलणारें कोडें होऊन बसलें त्याला. पण तें उकलण्याचा निर्धार करून तो तिला म्हणाला, ‘ असं कां वागतेस तूं माझ्याशीं ? ’

‘ असं म्हणजे कसं ? ’

‘ तें मी उघड करून सांगायला कां हवं ? तुझ्या अशा वागण्यानं माझ्या हृदयास घरे पडत असल्याचं नाहीं कां कळत तुला उपमा ? ’

‘ अन् तुमच्या तशा वागण्यानं? ’ उपमा आवेशानें ह्मणाली. ‘ माझी आंतडी पिळून निघताहेत. माझं डोकं फिरण्याची पाळी आली आहे. पण तुह्माला त्याची काय पर्वा म्हणा. तुम्हीं पूर्वीचे जीवन राहिला नाहींत. जागेबरोबरच तुमच्या वृत्तींत बदल झाला. नव्या मैत्री जुळतांच जुन्या मैत्रीचा तुम्हांला विसर पडला. तुमच्या करतां स्वतःचं जीवन आनंदशून्य करून घेणाऱ्या मला तुम्हीं विसरलांत, तुम्हीं मला फसावलत, सपशेल तोंडघशीं पाडलंत...’

अन् जीवनच्या उत्तराची वाट न पाहतां झपाझप पावले टाकीत ती तेथून निघून गेली आणि वृत्ति बधिर झाल्याप्रमाणें तिजकडे पहात जीवन ओरडला, ‘ उपमा, उपमा, थोड थांब. माझ्याकडे पहा, माझं म्हणणं ऐकून घे... ’

पण उपमेनें मागें वळून देखील पाहिले नाहीं.

# ११

दिवाळीच्या सुटीसाठी आपण आज सकाळच्या गाडीनें सांगलीस येत असल्याचे जीवननें आबांना आगाऊ पत्रानें कळाविलें असतांही तो आल्यावेळीं ते बाहेर गेल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटले; पण खेद वाटला नाहीं, आपल्याला आपल्या लाडक्या आईशीं खुल्या दिलानें खूप खूप बोलायला मिळणार, आपल्यामध्यें आबांचा आडपडदा मुळींच राहणार नाहीं या, आनंदात गर्क होऊन तो करुणाबाईच्या खोलीकडे वळणार तोंच म्हातारा गडी दाजी त्याला म्हणाला, ‘ बाईसाहेब आजारी आहेत. ’

‘ आई आजारी आहे ! केव्हा पासून रे ? ’

‘ बरेच दिवस झाले साहेब...’

‘ आ ! काय सांगतो आहेस तू ह ? ’

जीवन इतका घाबरला होता कीं, दाजीचें उत्तर ऐकण्यासाठीं न थांबता तो करुणाबाईच्या खोलीकडे पळालाच.

करुणाबाई अगदीं निपचित कॉटवर पडल्या होत्या. त्यांचा चेहरा सुकून गेला होता. डोळे खोल गेले होते. हाडाच्या नुसत्या काड्या झाल्या होत्या त्यांच्या.

जीवनला त्यांच्याकडे पाहवेना देखील. गद्‌गदीत कंठानें त्यानें हांक मारली, ‘ आई...’

करुणाबाईचे मिटलेले डोळे चटकन उघडले आणि अतृप्त नजरेनें जीवनकडे पहात त्या म्हणाल्या, ‘ केव्हां आलास तूं ? ’

' आतांच. पण आई, तूं आजारी असल्याचं मला कळविलं कां नाहींस ? परवांच्या पत्रांत देखील...'

' मी मुद्दामच ही गोष्ट तुझ्यापासून चोरून ठेवली बाळ. '

' पण ती कां ? '

' तुझ्या अभ्यासांत व्यत्यय येऊं नये म्हणून. मी आजारी असल्याचं, इतकी आजारी असल्याचं कळतांच, तूं इकडे धांवून येऊं नयेस म्हणून.'

' पण आई...'

जीवनचा कण्ठ दाटून आला आणि त्याच्यानें अधिक बोलवेना. त्यानें आपलें मस्तक करूणाबाईंच्या छातीवर टेकलें आणि तो ढसढसां रडूं लागला.

करुणाबाईंच्याही डोळ्यांचा बांध फुटला आणि त्या त्याच्या डोक्यावर अश्रू सिंचन करूं लागल्या.

थोड्या वेळानें या स्तब्धतेचा भंग करून जीवन म्हणाला, ' तूं आजारी असल्याचं मला कळविलं असतंस तर, नसतो कां मी तुझ्याजवळ बसून राहिलों ? तुझ्या औषध पाण्याची पण...'

' किती अजाण आहेस रे तूं ? ' करुणाबाई बळंच हांसून म्हणाल्या. ' तूं नव्हतास म्हणून माझ्या औषधाची अबाळ झाली असं कां तुला वाटतं ? वेड्या, ते माझी किती काळजी घेत होते याची कांहीं आहे कां तुला कल्पना ? माझ्या उशाशीं बसून कित्येक रात्रींच्या रात्रीं जागून काढल्या आहेत त्यांनीं...'

तोंच बाहेर मोटरीचा हॉर्न वाजल्यानें जीवन चमकून म्हणाला, ' आबा आले वाटतं ? '

' अंहं ! डॉक्टर आले असतील. '

‘ दररोज यावेळी नियमानं येतात वाटतं ते ? ’

‘ हां ! ’

डॉक्टर तेथें आले. जीवनला पाहतांच त्यांनीं विचारलें ‘ केव्हां आलास तूं जीवन ? ’

‘ आतांच. ’

‘ ठीक आहेस ना ? ’

जीवननें होकारार्थी मान हालवितांच डॉक्टरांनीं करूणाबाईची प्रकृति तपासून म्हटलें. ‘ अजून खूप विश्रांति घ्यायला हवी बरं का तुम्हांला. ’

‘ कायमची नाहीं ना ? ’ करुणाबाई बळेंच हांसून म्हणाल्या.

त्यांच्या त्या अनपेक्षित प्रश्नानें आणि भेसूर हास्यानें जीवनच्या हृदयाचें पाणी पाणी केलें. तो किंचित् रागानेंच उद्गारला, ‘ आई ! ’

‘ अरे आतां सूनबाई घरीं येणार, मग काय तूं मला काम करण्यास लावणार आहेस ? पूर्ण विश्रांतिच देणार ना ? ’

‘ भलत्यावेळीं भलती थट्टा करणं चांगलं कां आई ? ’

‘ मी थट्टा करीत नाहीं. बरं कां डॉक्टर, आमच्या जीवनचं लग्न आम्ही पुढील महिन्यांत करायचं ठरविलय्. सूनबाई घरीं येणार, मग माझ्या भाग्याला काय उणं...’

‘ बरं आता तुम्ही काहीं न बोलतां स्वस्थ पडून रहा पाहूं, ’ डॉक्टर म्हणाले आणि करूणाबाईनीं आपली मान दुसरीकडे वळविली.

डॉक्टर बरोबर खोलीबाहेर येतांच जीवनने विचारले, ‘ डॉक्टर, काय होतंय् आईला ? ’

‘ त्यांच्या मेंदूवर भयंकर परिणाम झाला आहे. ’

' मेंदूवर ? '

' हो ! अन् म्हणूनच त्यांची प्रकृति सारखी ढासळत चालली आहे. इतर सर्व तक्रारी त्यामुळंच. आता तू इथं राहणार आहेस म्हणून सांगतो जीवन तू त्याना नेहमीं आनंदित ठेवायला हवं. त्यांचं मन सदोदित उल्हासित राहिल तरच त्यांची प्रकृती सुधारेल. '

' बरं ' म्हणून जीवननें एक दीर्घ निःश्वास सोडला आणि जड पावलें टाकीत तो करुणाबाईजवळ परततांच त्या म्हणाल्या , ' अभ्यास ठीक चालला आहे ना ? '

जीवननें होकारार्थी मान हालविली.

' प्रकृति पण ठीक दिसतेय् ' करुणाबाई जीवनला नखशिखांत न्याहाळून पहात म्हणाल्या, ' अन् बरं कां रे जीवन, अभ्यासाबरोबर तू कॉलेजांतील इतर घडामोडींतही लक्ष घालीत असल्याच वाचून, मला किती किती समाधान होतसें म्हणून सांगूं! आतां एकदां कां तुझं लग्न झालं, कल्पनेला नि तुला जोडीनं उभं राहिलेलं पाहिलं म्हणजे माझ्या डोळ्यांचं पारणं फिटेल. पण कायरे या सुटीत लग्न करायला नाहीं ना तुझी हरकत ? '

' तुझ्या शब्दाबाहेर कां आहे मी आई ! '

जीवननें धडधडीत खोटे सांगितले. त्याची इच्छा नसतांही, तसें सांगत असतां त्याला दुःख होत असतांही, तो खोटे बोलला. त्यानें आपल्या मनाशीं प्रतारणा केली; पण तें केवळ करुणाबाईंना बरें वाटावें म्हणून, त्यांचें मन आनंदी रहावे म्हणून.

वाङ्निश्चय होईतोपर्यंत त्यानें कल्पनेला पाहिले देखील नव्हते. मग तिच्या स्वभावाची, आवडी निवडीची त्याला कल्पना येण्याची गोष्ट तर बाजूलाच राहो.

त्यानंतर जो त्याला तिजविषयीं माहिती मिळाली होती, नव्हे त्यानें मुद्दाम मिळविली होती, ती समाधानकारक नव्हती. त्याच्या सहचारणीची जागा कल्पना कितपत भरून काढील, हा त्याच्यापुढें मोठा प्रश्न होता.

महिन्यापूर्वीचा एक छोटासा पण महत्वपूर्ण प्रसंग त्याला आठवला.

कल्पना तिच्या मामाबरोबर मुम्बईस आली होती आणि फोनवरून मामांनीं जीवनला बोलाविल्यानें, तो त्यांना भेटण्यासाठीं एम्पायर हॉटेलात गेला होता.

कल्पनेनें सिनेमाला जायचा बेत आंखला होता आणि जीवननें बरोबर यावें अशी मामांनीं इच्छा प्रदर्शित केल्यानें त्यानें पण आढेवेढे घेतले नव्हते.

सिनेमा सुरूं होण्यास फक्त पांच मिनिटें अवकाश असल्याने, लगेच निघणे जरूर असल्याचे जीवननें मामाना सांगितले होते; पण कल्पनेचा नट्टा पट्टा व्हायचा असल्यानें, ती अद्यापि खोलींतच रेंगाळत होती. तेव्हा मामा हांसून ह्मणाले होते, ' भारी नटायला मुरडायला हवं पोरीला. अजून शाळेतच आहे तर दिवसांतून दहादा कपडे बदलायला हवेत नी शंभरदा तोंडाला स्नो पावडर फासायला हवी. उद्यां कॉलेजला गेल्यावर कितीदा बदलेल कोणास ठाऊक. पण लवकरच लग्न होणार असल्यानं...'

मामांनीं बुद्धिपुरस्कर आपलें वाक्य अर्धवटच सोडलें होतें आणि ते फिदीफिदी हांसूं लागले होते.

जीवन हांसला नव्हताच; उलट फारच गंभीर बनला होता.

मामा त्याला ह्मणाले होते ' बरी आठवण झाली. एक काम करायला हवं बुवा तुम्हांला. '

' कोणतं ते ? '

' लीला देसाईचे चार सहा पोझेस गोळा करून देण्याच. सिनेमा नटींच्या तसबिरी गोळा करण्याचा भारी नाद आहे पोरीला. इथं आल्यापासून हिचा माझ्या मागं सारखा ससेमिरा लागलाय्. मी माझ्या माहितीच्या दुकानांत चौकशी केली, पण मला कांहीं मिळाल्या नाहींत. तुम्हांला माहीत असेल कुठं मिळतात त्या. '

' नाहीं. '

' आं ! '

मामाना आश्चर्य वाटल्याचें पाहून जीवनला कांहीं आश्चर्य वाटलें नव्हतें, उलट विषाद वाटला होता, तोंच समोरच्या घड्याळांत सहाचे ठोक पडल्यानें तो त्यांना म्हणाला होता ' सिनेमा सुरू होण्याची वेळ झाली. '

मामांची धांदल उडाल्यासारखी दिसली होती. ते खोलीकडे पहात म्हणाले होते ' कल्पना...'

' ही मी आले मामा. '

' अग पण...' म्हणत मामा आंत गेले होते. ' किती उशीर लावते आहेस पोरी. '

' पहिल्यांदा मी ही पोपटी साडी नेसले मामा. हा ब्लाऊझही अगांत चढविला. पहातें तों त्या रंगाच्या बांगडया मी घरांत विसरून आल्याचं दिसल. शिवाय हे चप्पल त्याला मॅच होत नाहींत. तेव्हां ही अस्मानी साडी नेसले. पण त्या रंगाचे इअरिंग्ज् कांहीं केल्या सांपडेनात, बरोबर आणल्याचं नक्की आठवतं. मी मघापासून सारखी धुंडाळतेय् पण...'

कल्पनेचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच मामा चाचरत म्हणाले होते, 'अग, दुसऱ्या रंगाचे इअरिंग्ज घातलेस तर काय बिघडणार आहे इतकंस ? हें कानांतलं हिरवं कांहीं वाईट नाहीं. '

' पण साडी--ब्लॉऊझना मॅच नको का व्हायला ? '

मामा स्तब्ध झाले होते; पण बाहेर बसलेल्या जीवनचें मन मात्र भयंकर प्रक्षुब्ध बनले होते. वेळोवेळीं मिळालेल्या व मिळविलेल्या माहितीवरून त्यानें कल्पनेचें जें कल्पना–चित्र रंगविलें होतें तें हुबेहुब असल्याचे, इतकेंच नव्हे तर त्यांत आणखी एक दोन भडक रंग मिसळण्याची जरूरी असल्याचे, त्याला कळून चुकले होते. आणि अशा भिन्न मनोवृत्तिच्या मुलीबरोबर आपले कसें जमणार हा प्रश्न पडला होता त्याला. सुटीत घरीं जाताच आपले विचार करुणाबाईच्या पुढें बोलून दाखविण्याचें ठराविले होते त्याने. पण आज त्या बिछान्यावर पडून असतां, त्यांच्या मनाला वाईट वाटेल अशी कोणतीहि गोष्ट न करण्यास डॉक्टरानीं बजावलें असता, तो विषय काढून त्यानीं निवड केलेल्या मुलीविषयीं नापसंति दर्शविणें, तेंही वाङ्निश्चय होऊन सहा महिन्याचा काळ लोटल्यानंतर दर्शविणें, मुळींच योग्य नव्हते.

' लग्नानंतर घडवून आणीन मी कल्पनेच्या मनोवृत्तीत फरक,' त्यानें स्वतःची समजूत घातली. ' आपल्या हातून एवढीं साधी गोष्ट झाली नाहीतर, समाज जागृतीचं कार्य तें काय होणार ? प्रत्यक्ष स्वतःच्या घरापासूनच सुरुवात करावी लागणार आहे आपल्याला, एवढच काय ते... '

अशा रीतीनें तो विचार करीत असतां आबा परतल्याचे दाजीनें सांगितले. तो बाहेर आला आणि आबाना नमस्कार करून समोरच्या कोचाला रेलून उभा राहिला.

आबांनीं त्याच्याकडे पाहिलें न पाहिल्या सारखं करून म्हटलें, ' आलास ? प्रकृति बरी दिसतेय्. अभ्यासही ठीक चालला असेल. '

आबाच्या बोलण्यांतील रुक्षता, औपचारिकता, तिरस्कार, जीवनच्या ध्यानांत चटकन् येण्याइतका स्पष्ट आणि उघड होता. त्यांची त्याज-

विषयींची तेढ अद्यापी कमी न झाल्याचें त्यानें ताडलें. पण तें न दर्शवितां तो मुद्दाम म्हणाला. 'षण्मासिक परीक्षेत पहिला येण्याची जवळ जवळ खात्री वाटते मला आबा आणि परवाच्या वक्तृत्वोत्तेजक चढाओढीत...'

'सारं काही कळलं आहे मला.' आबा मध्येंच म्हणाले. त्यांच्या शब्दांना एकएकी कठोरतेची धार चढली. 'तिला तू सार काहीं खुलासेवार लिहित होतासच की.'

जीवन चपापला. स्वतंत्र पाकीटातून करुणाबाईंना पाठविलेली त्याची पत्रें आबांच्यापासून गुप्त राहतात या समजुतीनें तो करुणाबाईंना लिहिताना काही काहीं म्हणून चोरून ठेवत नस. पण ही गोष्ट आबांना कळल्याचें पाहून त्याला महदाश्चर्य तर वाटलेंच पण भयंकर भीती वाटली. आबांनीं ती पत्रें चोरून तर वाचली नसतील नां? या कल्पनेने त्याच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला आणि भेदरलेल्या नजरेनें त्यानें त्याच्याकडे पाहिले.

आबांचा चेहरा निर्विकार होता.

त्याचा जीव खाली पडल्यासारखा झाला. त्याला वाटले. आबा एवढे मोठे शिस्तीचे भोक्ते. कशाला ते आईची पत्रं वाचतील? आईनंच वक्तृत्वोतेजक चढाओढीत मी पहिला आल्याचं आनंदाच्या भरांत त्यांना सांगितलं असलं पाहिजे...'

आबा विषयींच्या अविश्वासामुळेंच आपल्या मनांत वरील विकल्प उत्पन्न झाला असला पाहिजे असें वाटले जीवनला आणि तसल्या भलत्या सलत्या विचारांना मनांत थारा दिल्याबद्दल त्याला त्याची लाज वाटली.

---

# १२

‘ मी इतकं सांगितलं तरी तूं आपला हेका सोडीत नाहींस ना कल्पना ? ’

‘ मी पुष्कळ सांगितलं म्हणून तुम्ही कुठं आपला हेका सोडून देतां?’

‘ दोनीही गोष्टी सारख्याच का ? ’

‘ नाहींतर काय ? तुम्हांला जसं विदेशी वस्त्र परिधान करणं आवडत नाहीं, तसंच मला ती जाडी भरडी खादी वापरणं आवडत नाहीं. ’

‘ जशी तुझी मर्जी ’ म्हणून जीवननें एक दीर्घ निःश्वास सोडला.

कुणीही कांहीं बोलत नव्हतें कीं एकमेकाकडे पाहात नव्हते. बऱ्याच वेळानें या स्तब्धतेचा भंग करून जीवन म्हणाला ‘ त्या सिनेमा नटींच्या तसबिरी पण इथं लटकत रहाणार असतील ? ’

‘ हो ! ’

‘ कल्पना ! ’

कल्पना कांहीं बोलली नाहीं कीं जीवनचा चेहरा क्रुध्द बनल्याचें पाहून, त्यावर भिडविलेली आपली तीक्ष्ण नजर तिनें काढून घेतली नाहीं.

‘ अशानं तूं...’

जीवन थांबला. जीभेच्या टोकापर्यंत येऊन ठेपलेले आपले शब्द त्यानें मोठ्या कष्टानें मागें घेतले आणि एकदां विस्फारित नेत्रांनीं कल्पनेकडे पाहून तो दरवाजाकडे वळणार तोंच कल्पना म्हणाली, ‘ सांगा ना, निकाल ऐकण्यास तयार आहे मी. ’

जीवनचा चेहरा अधिकच क्रुध्द बनला. त्याच्या डाव्या भिवईवर एक ठळक आठी पसरली. आवेशानें तो खोलीबाहेर पडला.

आणि कल्पनेनें शेजारच्या कॉटवर अंग टाकलें.

तोंच करुणाबाईंची हांक तिला ऐकूं आली, ' कल्पना... '

ती दचकून उठून बसली. तिला वाटले पलीकडच्या दालनांतून करुणाबाईंनीं मघाचें त्यांचे संभाषण ऐकले तर नसेल ना ?

वरच्या दंतपंक्तीनें खालचा ओंठ तिनें घट्ट दाबला आणि झटकन् खोलीबाहेर पडून ती करुणाबाईंच्या कॉटशेजारी येऊन उभी राहिली.

बराच वेळ कुणीही कांहीं बोलत नव्हते.

करुणाबाई निश्चल पण भकास नजरेनें कल्पनेकडे पहात होत्या, तर कल्पना आलोचन दृष्टीनें खालीं जमिनीकडे पहात होती.

या स्तब्धतेचा भग करून करुणाबाई म्हणाल्या, ' पुरुषांशीं प्रत्येक बाबतींत बरोबरी करून, दरखेपेस आपलाच हट्ट तडीस नेण्याचा प्रयत्न करणं पुरुषावर अवलंबून राहणाऱ्या स्त्री–जातीला, केव्हांहीं घातक आहे कल्पना.... '

' म्हणजे आम्हीं आमच्या आवडी निवडी त्यांच्या आवडी निवडीसाठीं टाकून द्याव्यांत असंच ना तुमचं म्हणण ? '

' हो ! ' करुणाबाई चटकन् उतरल्या, ' तुला वाटेल, मी तुझ्या स्वाभिमानावर घाला घालीत आहे, तुझा समानहक्क मुळासकट उपटून टाकीत आहे. कल्पना, पोरी, तुझं मन मला कळतं, तुझे विचार मला पटतात, प्रत्येक स्त्रीनं आपल्या जाज्वल्य स्वाभिमानाला, आपल्या आवडी निवडींना मुळींच विसरूं नये, असंच मला वाटतं. पण तें केव्हां ? त्याचा अनिष्ट परिणाम तिच्या संसारावर होत नसेल तेव्हां. तिच्या वैवाहिक

जीवनाचा गाडा सुरळीत चालत असेल तेव्हां. ' एकदम अधिक बोल-ल्यानें त्यांना श्वास लागला. त्या थांबलल्या आणि कल्पनेनें पुढें केलेल्या प्याल्यांतील पाणी पिऊन त्या म्हणाल्या. ' कल्पना तुला जीवनच्या स्वभावाची कल्पना नाहीं. या खादीसाठी त्यानं प्रत्यक्ष आपल्या जन्म-दात्या पित्याची अवकृपा पत्करली. तेवढ्यासाठीं त्यानं गांव सोडलं; इतकंच नव्हे तर त्या साठीं त्याची घरदार सोडण्याची तयारी होती. असं असतां तूं, त्याच्या बायकोनं, त्याच्या खांद्याशीं खांदा भिडवून संसाराचा आणि त्याबरोबरच देशोध्दाराचा गाडा हाकू इच्छिणाऱ्या त्याच्या सह-चारिणीनं त्याच्या इच्छेच्या आड यावं, तो फिरफिरून समजावून देत असतांही, विनवीत असतांही, तूं त्याच्या विनंतीचा अव्हेर करावास; इतकंच नव्हे तर, त्याच्या इच्छेप्रमाणं वागण्यास मुळींच तयार नसल्याचं स्पष्टपणें बोलून दाखवावंस हें मुळींच हितावह नाहीं. पोरी, रबर तुटेतों ताणणं केव्हांही चांगलं नाहीं, ते तुटल्यावर पश्चात्ताप करीत बसून कांहींही उपयोग होणार नाहीं. त्यामुळं तुझ्या वैवाहिक जीवनावर अनिष्ट परिणाम झाला नाही तरच नवल... '

' आतां काय व्हायचं राहिलं आहे ! '

' म्हणजे ! '

कल्पना काही बोलली नाही. डोळ्यांना पदर लावून ती मुसमुसू रडूं लागली.

करुणाबाईंचा चेहरा कावरा बावरा झाला, अतिशय हलकी पडलेली त्यांची छाती धडधडूं लागली आणि लुकलुकणाऱ्या डोळ्यानें कल्पनेकडे पहात त्या अधीरतेने म्हणाल्या, ' इकडे ये पाहूं. '

कल्पना त्यांच्या जवळ गेली आणि त्यांना रेलून उभी राहिली. तिचे दोन्ही हात आपल्या कापऱ्या हातांत घेऊन ते घट्ट दाबीत करुणाबाई म्हणाल्या, 'माझ्या गळ्याची शपथ आहे तुला. कांहींही लपवून न ठेवता, कसलीही भीडभाड न बाळगतां, मला आपली आई कल्पून सारं सारं कांहीं मोकळ्या मनानं सांग...'

कल्पनेचा चेहरा निश्चयी बनला. मनाचा हिय्या करून ती म्हणाली, 'मी या जन्मी खऱ्या संसार सुखाची अपेक्षा करणं व्यर्थ आहे.'

'कल्पना !'

'खरं, अगदीं खरं तेच सांगते आहे मी. असं सांगतांना हृदय जळतं, आंतडी तुटतात. आजपर्यंत मी या गोष्टीची वाच्यता केली नाहीं. फार काय लग्नाआधींच मला ही गोष्ट कळली असताही, माझा त्यावर विश्वास बसला नाहीं; पण लग्नानंतर एकामागून एक अशा गोष्टी घडत गेल्या कीं, कळलेली गोष्ट खरी असल्याची माझी खात्री झाली. अशुभ वार्ता सहसा खोट्या ठरत नाहींत हेच खरं !'

'सारं कांहीं मला कळेल अशा शब्दांत सांगशील कां ?'

'त्यांचं प्रेम मला मिळणं शक्य नाहीं.'

'जीवनचं प्रेम !' करुणाबाई किंकाळल्या. 'त्याच्या तुजबरोबरच्या तुसड वर्तनाचा असा भलता अर्थ केलास कां तूं ? कल्पना, पोरी, थोड्याशा दूर दृष्टीनं विचार कर, म्हणजे तुझ्या तुलाच साऱ्या गोष्टींचा उलगडा होईल. मी पक्की आहे, त्यानं तुला एखादी गोष्ट करायला सांगावी, अन् तूं त्याला सपशेल नकार द्यावास, यामुळं त्याचा स्वभाव चिडखोर बनला आहे. कालचीच गोष्ट घे. तूं सर्व खोलीभर सिनेमा नटीच्या तसबिरी लटकावल्यास, त्याला ती गोष्ट मुळींच आवडली नाहीं. राष्ट्रीय पुढाऱ्याच्या शेजारी सिनेमा नटीच्या तसबिरी असणं हें केव्हांही

त्याच्या राष्ट्रप्रेमी मनाला रुचणं शक्य नव्हतं. त्यानं आपली मनीषा तुला कळविली तरीही जेव्हां का तूं आपला हेका सोडण्यास तयार होईनास, तेव्हां तो चिडला असेल आणि अशा गोष्टी वरचेवर घडत गेल्यामुळं त्याला भयंकर मनःस्ताप झाला असेल, अन् तो तुझ्याशीं तुसडपडानं वागूं लागला असेल! असं असतां तू त्याच तुझ्यावर प्रेम नसल्याची समजूत करून घेणं...'

'इतकी कां मी दूधखुळी आहे? ' कल्पना मध्येंच म्हणाली, 'त्यांच माझ्यावर मुळींच प्रेम नसल्याचा माझ्याजवळ इतका सबळ पुरावा आहे की, माझ्या जागीं दुसरी एखादी स्त्री असती तर, वैतागून तिनं केव्हांच आपल्या जीवाचं बरं वाईट करून घेतलं असतं...'

'कल्पना! कल्पना!...'

कल्पना कांहीं न बोलतां स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

करुणाबाईचा चेहरा कावरा बावरा झाला. भीतीनें त्यांच्या सर्वांगाला तर दरदरून घाम सुटला. तारवटलेल्या नजरेनें कल्पनेकडे पहात त्या कांपऱ्या स्वरानें म्हणाल्या, 'सांग. जीवनचं दुसऱ्या कुणावर प्रेम असल्याचं तुला कळलं आहे कां?'

कल्पनेनें होकारार्थी मान हालविली.

'कुणावर? उपमेवर कां?'

कल्पनेनें नकारार्थी मान हालविली.

'मग कुणावर?'

'कविता नांवाच्या त्यांच्या एका प्रोफेसराच्या मुलीवर.'

'कुणी सांगितलं तुला हें?'

'उपमेनं.'

'उपमेनं!' करुणाबाई उद्गारल्या, 'केव्हां भेटली तुला ती?'

‘ नेहमीं भेटत असे मला ती. ’

‘ तें कसं काय? ’

‘ आमच्या वडिलांच्या घराशेजारीच ती राहतेय् ना? आम्ही दोघीही सारख्याच वयाच्या.त्यांत दोनीही घराचा पुष्कळ दिवसाचा घरोबा. त्यामुळं तिची नी माझी ओळख होण्यास मुळींच वेळ लागला नाहीं. तिच्या नवऱ्याचं नी तिचं पटत नसल्यानं तर आम्ही बराच वेळ एकमेकांच्या सहवासांत घालवित असूं. ..’

‘ त्यांचं न पटायला काय झालं! ’

‘ तिचं तिच्या इच्छेविरुद्ध तिच्या वडिलांनीं लग्न केलं. अन् तेंही कुणाशी तर एका मध्यम वयाचा बिजवराशी. त्यामुळं...’

‘ अस्सं! बरं पण तिला जीवनची काय माहिती?

‘ ती मुंबईला त्यांच्याच कॉलेजांत शिकतेय् ना? अन् या गोष्टीचा बभ्रा इतका झाला आहे कां....’

एवढं बोलून कल्पना थांबली डोळयांत तरंगणारे अश्रू तिनें पदराच्या टोंकान पुसले आणि अतिशय दाटून आलेला गळा साफ करून ती म्हणाली, ‘ तरीहि मी तिकडं कानाडोळा केला; पण लग्नानंतर एकामागून एक अशा कांहीं गोष्टी माझ्या निदर्शनास आल्या कीं, मला कळलेली हकिकत शब्दशः खरी असल्याची माझी खात्री झाली. ’

‘ त्या गोष्टींपैकीं एखाद् दुसरी मला सांगशील कां? ’

‘ त्यांच्या बॅगेंत सुंदर नक्षीदार फ्रेममध्यें बसाविलेला तिचा फोटो आहे; अन् तिची कितीतरी पत्रें त्यांनीं आपल्या पत्राच्या फाईलमध्यें जपून ठेवली आहेत. प्रथम मला वाटलं कीं, लग्नापूर्वीचा हा सारा पत्रव्यवहार असावा; पण आजही त्यांना तिची पत्रं येत असल्याचं, अन् ते तिला लिहित असल्याचं मी उघड्या डोळ्यांनीं पहातें...’

कल्पनेचा कंठ दाटून आला आणि ती हुंदके दे देऊन रडू लागली.

करुणाबाईच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. शून्य दृष्टीनें वर छताकडे पाहात त्या विचार करू लागल्या.

थोड्यावेळानें कांहींसा निर्धार करून त्या म्हणाल्या, ' जा तूं आतां. मी करते या गोष्टीचा कसून तपास. '

कल्पना कांहीं बालली नाहीं. तिनें एक दीर्घ निःश्वास सोडला आणि जड पावलें टाकीत ती खालीं बाहेर पडली.

तिच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहतच करुणाबाईनीं दाजीस हांक मारली, आणि जीवनला पाठवून देण्यास सांगितलें.

थोड्यावेळानें जीवन तेथे आला.

' जीवन, ' आपला चेहरा जितका निर्विकार ठेवता येईल तितका ठेवण्याचा प्रयत्न करीत करुणाबाई म्हणाल्या, ' तू येऊन किती तरी दिवस झाले; पण अद्यापि तुझ्या मुंबईच्या आठवणी कांहीं मला सांगितल्या नाहींस ह ! '

' वेळोवेळी तुला मी त्या पत्रातून निवेदन करीत आलो आहेच की.'

' अरे ! पत्रातून कांहीं सान्याच गोष्टी निवेदन करता येत नाहींत, तेव्हां मला न कळविता राहिलेल्या कांहीं गोष्टी असतीलच की. '

जीवन विचारात पडल्यासारखा दिसला; थोड्या वेळानें तो म्हणाला, ' अशी कोणती गोष्ट असेलसें मला नाही वाटत. '

' पहा पुनः विचार करून, ' करुणाबाई आपली दृष्टि जीवनच्या मुखावर भिडवीत म्हणाल्या, तरीही त्याला कांहीं न आठवल्यानें त्यांनीं सुचविलें ' कवितें विषयीं...'

' कवितेविषयीं मी तुला सारं काहीं कळविलंच आहे, ' जीवन चटकन् म्हणाला, ' तिची नी माझी ओळख कशी झाली, पुढं परिचय कसा वाढत गेला...'

' अन्...'

' अन् काय आई ! '

' अन् कांहींच कां नाहीं ? '

' नाहीं. '

करुणाबाई बुचकळ्यांत पडल्या; पण लगेच कांहीसा निश्चय करून त्या म्हणाल्या, ' जीवन, काहीं कांहीं लपवून न ठेवतां मला सांग. कवितेविषयीं तुला काय वाटतं ? '

' काय वाटत म्हणजे ! ' जीवन विस्मयानें म्हणाला, ' मला नाहीं कळला तुझ्या प्रश्नाचा आशय...'

' थोडसं स्पष्टच विचारतं, सांग जीवन, तुला कवितेबद्दल प्रेम वाटतं कीं नाहीं ? '

'प्रेम !' जीवन चमकून म्हणाला,' अतिशय वाटतं. पण ते बहिणीचं.'

' खरं! अगदीं खरं ? '

' मी तुला कधीं खोटं सांगितलं आहे कां आई ? '

' संशयी मन मोठं पापी असतं रे बाबा; पण आधीं मला हें सांग. सुंदर फ्रेममध्यें बसविलेला कवितेचा फोटो तुझ्याजवळ आहे कां ? तिचा नी तुझा सध्या पत्रव्यवहार चालू आहे कां ? '

' हो ! पण त्यात बिघडलं कुठं ? भाऊ—बहिणीचा फोटो आपल्याजवळ बाळगणार नाहीं कां ? भाऊ बहिणीला पत्र लिहिणार नाहीं का ? '

करुणाबाई विचारमग्न बनल्याचें पाहून जीवन म्हणाला, ' नुकतंच तिचं लग्न झालं...'

‘ खरं! अगदीं खर ! ’ करुणाबाई हर्षाने उद्‌गारल्या, ‘ आहेच मुळीं माझा बाळ गुणाचा. अन्…’

‘ अन् काय आई ? ’

‘ कांहीं नाहीं. जा तूं आतां. अन् दे पाठवून कल्पनेला. माझ्या औषधाची वेळ झाली आहे. ’

‘ देऊं कां मी औषध ? ’

‘ अंहं ! ’ करुणाबाई नकारार्थी मान हालवीत म्हणाल्या, ‘सून-बाईचा पुरा उपयोग करून घ्यायचा आहे मला. ’

करुणाबाईनीं जीवनकडे पाहून हास्य केले; पण जीवन कांही हांसला नाहीं. एक दीर्घ निःश्वास सोडून तो खोलीबाहेर पडला.

आणि कल्पना तेथें आली.

तिला पाहतांच हर्षभरित होऊन करुणाबाई म्हणाल्या, ‘ कल्पना, पोरी, किती भलती समजूत करून घेतली आहेस ग तूं. जीवनचं...’

‘ मघाचं सारं संभाषण ऐकलं आहे मी. ’

‘ ऐकलंस ? झालं तर मग. आतां तर तुझा संशय नाहींसा झाला ना ? जीवन नि कवितेचा संबंध कशा प्रकारचा आहे याची तुला कल्पना आली ना ? ’

‘ थोडसं स्पष्ट बोलते याबद्दल क्षमा करा हं ! तुम्ही त्यांच्याकडे आईच्या नजरेनं पाहतां आहांत. तुमच्या मातृमनाला त्यांचं मानभावी पणाचं भाषण खरं वाटलं, त्यावर तुमचा चटकन् विश्वास बसला; पण माझ्या पत्नी—मनाला त्यांतला एकही शब्द खरा वाटला नाहीं ! ते धड-धडीत खोटं सांगत असल्याचं मला स्पष्ट दिसत होतं. म्हणे बहीण...’

अतिशय आवेशानें बोलणारी कल्पना मध्येंच एकाएकीं थांबल्याचे पाहून भयग्रस्थ व अधीर झालेल्या करुणाबाई म्हणाल्या, ‘ बोल, बोल, काय ते स्पष्ट बोल. ’

'काय बोलू नी कसं बोलू ?' बोलत असतां कल्पनेच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या, पण त्या पुरुण्याच्या भरीस न पडतां ती आवेशानें म्हणाली, 'त्या दोघांबद्दल संबंध कॉलेज काय बोलतां हें माझ्याप्रमाणं तुम्हांला कळलं असतं तर, तुम्ही त्यांच्या बोलण्यावर चटकन् विश्वास ठेवलाच नसता. तिचं आतां लग्न झालं आहे खरं; पण तं इतक्या घाईनं कां उरकण्यांत आलं...'

'नको! नको! नाहीं माझ्याच्यानं ऐकवंत' आपले कान हातानं घट्ट दाबून घेत करुणाबाई म्हणाल्या आणि त्यांच्या डोळयांतून अश्रू प्रवाह वाहू लागला.

* * *

करुणाबाईची प्रकृति तपासून होतांच डॉक्टर उठले. त्यांच्याबरोबर जीवनही बाहेर येतांच ते त्याला म्हणाले, 'जीवन, आलेल्या संकटांशी धीरानं तोंड द्यायला नको कां ?'

जीवनचे डोळे अश्रूंनीं डबडबले आणि गद्गदित कण्ठानें तो म्हणाला, 'सकाळपर्यंत आईची प्रकृति बरी होती. ती माझ्याबरोबर मोकळया मनानं बोलली देखील नी आतां...'

'मला देखील याचं राहून राहून आश्चर्य वाटतं. त्यांच्या मनावर आघात करणारी एखादी गोष्ट आज घडली आहे कां ?'

'मला तर कांहीं आठवत नाहीं.'

डॉक्टर कांहीं न बोलतां मोटारींत जाऊन बसले.

बाहेर अंधार नुसता मी म्हणत होता. जीवनला वाटलें,' तो अंधार नसून त्याची आई मृत्युशय्येवर पडली असतां तिचा जीव हरण करून घेऊन जाण्यासाठीं दत्त म्हणून उभी राहिलेली अंतकाची भयंकर नि आक्राळ विक्राळ स्वारीच होती ती !

तोंच पावसाची सर आली आणि बंगल्या भोंवतालच्या बागेंतील झाडाच्या पानावरून अविरत पडणाऱ्या पावसाच्या पाण्याकडे पहात असतां पोटच्या पोराप्रमाणें संवर्धन—पालन केलेल्या करुणाबाईंच्या गळ्याभोंवतालचा पाश पाहून त्यांच्या डोळ्यातून अश्रूप्रवाह तर सुरू झाला नाहींना ? असा विचार येऊन गेला त्याच्या मनात.

इतक्यांत त्याची दृष्टि दिपविणारी वीज चमकली, आपल्या आईची प्राणज्योत मृण्मय शरीराचा त्याग करून तर जात नसेल ना ! अशी कल्पना विजेप्रमाणें त्याच्या मनांत येऊन गेल्यानें त्याचें सर्वांग थरारलें आणि धावतच तो आंत आला.

कॉटवर निचेष्ट पडलेल्या करुणाबाई पुटपुटल्या, ' पाणी... '

झटकन् पुढें होऊन जीवननें चमच्या चमच्यानें त्यांच्या तोंडात पाणी घातलें.

करुणाबाईंनी डोळे उघडले. आपली दृष्टि जीवनच्या मुखावर स्थिरावत त्या म्हणाल्या, ' जीवन... '

आपलें मुख त्यांच्याजवळ नेत जीवनने विचारलें ' काय आई ! '

' कल्पनेशीं प्रतारणा करू नकोस; तुझ्या पतीच्या कर्तव्यापासून कधींही च्युत होऊ नकोस. '

' नाहीं आई, मी कधींही च्युत होणार नाहीं. '

' अन् तू कल्पना ... ' करुणाई कल्पनेकडे पहात बोलू लागल्या पण फिरून त्यांचा घसा कोरडा पडल्यानें, आपले वाक्य अर्धवट सोडून त्या म्हणाल्या, ' पाणी . '

कल्पनेनें चटकन् दोन चमचे पाणी त्यांच्या तोंडांत घालतांच त्या म्हणाल्या, ' कल्पना, पोरी, जीवनच्या इच्छेप्रमाणं वागूं लाग. त्याच्यावर

विश्वास ठेव...' तोंच त्यांची नजर आबासाहेबांच्याकडे गेल्यानें त्या म्हणाल्या, 'एकलं कां ? चाललें मी. क्षमा करायची म्हटलं मला. जीवन अजून हूड आहे, त्याच्या चुका पोटांत घालायच्या, अन् उदार मनानं त्याला क्षमा करायची. कराल ना ? सांगा, कराल ना ?'

त्यांना ठसका लागला आणि... ' त्यांतच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें.

जीवननें टाहो फोडला.

आबांनीं डोळ्याला धोतर लावलें.

आणि कल्पना हुंदके दे देऊन रडूं लागली.

---

# १३

जीवन आपली रोजनिशी लिहूं लागलाः—

‘अगदीं सुनं सुनं वाटतय् मला सारं जग. हें माणसानं गजबजलेलं घर मला खायला उठलयसं वाटतं. सारखे विचार चाललेले असतात आई-विषयीं. आई ! माझी लाडकी आई...

आई बरोबर माझ्या आयुष्याचा एक धागाच तुटल्या सारखा वाटतो आहे मला. या विचित्र जगांमध्यें कुणाच्या सल्ल्यान मी माझे पुढील बेत आंखायचे ? मार्ग आक्रमणायचा ?

कल्पना !

मरण समयीं आईला दिलेलं वचन पाळण्यासाठीं, मी तिच्याशीं होतां होईलतो नमून वागत आलों आहे. तिला आनंदी ठेवण्यासाठीं मी माझ्या आनंदावरही पाणी सोडलं. माझ्या हृदयाच्या चिंधड्या चिंधड्या उडत असतांही, मी माझ्या बहिणीच्या—कवितेच्या पत्रांच्या फाईलीचे तुकडे तुकडे केले. फक्त एकाच इच्छेन. कल्पनेचं संशयी मन शान्त व्हावं अन् आमच्या संसाराचा गाडा सुरळीत चालावा.

पण यापुढं ते शक्य नसल्याचं मला कळून चुकलं आहे, नव्हे खात्री झाली आहे शक्यच नाहीं ते. शकट वाहणाऱ्या दोन्ही बैलांची तं हांकण्याची इच्छा पाहिजे. एकट्याची असून काय उपयोग ? त्यामुळं खड्यांत पडण्याचीच भीति अधिक.

मी कोणत्या खड्यांत पडणार आहे कोणास ठाऊक. ...’

जीवनचे एवढें लिहून होतें न होतें तोंच दाजी तेथें येऊन म्हणाला, ' साहेब ... '

जीवननें वर मान करून त्याच्याकडे पाहिले.

' तुमचं पत्र आलंय् ' म्हणून एक पाकीट जीवनच्या हातीं देऊन, दाजी आल्या मार्गे निघून गेला.

जीवननें पत्त्याच्या अक्षराकडे पाहिलें. त्याच्या चेहऱ्यावर प्रथम विस्मयाची आणि नंतर समाधानाची छटा उमटली. अधीरतेनें त्यानें पाकीट फाडलें आणि आंतील पत्र काढून वाचण्यास सुरुवात केली.

प्रिय जीवन,

कॉलेज सुरू होण्यास अद्यापि एक दोन दिवसांचा अवकाश असतां-नाच इकडे येणार स्कॉलर, कॉलेज सुरू होऊन आठदहा दिवस झाले तरी घरींच रेंगाळताहेत, यातील अंदरकी बात न जाणण्याइतकी मी कांही दूधखुळी नाहीं.

बरेच आहात कीं ! मला नव्हती कल्पना कीं,नवीन वातावरणांत तुम्हीं इतक्या लवकर रंगून जालस. इकडचा दखील विसर पडला हं! पुरुषाची जात.

तसं नसतं तर माझ्या दोन्ही पत्राची उत्तर का आलीं नसती ? मी पहिलं पत्र धाडून आज वीस दिवस झाले तरी ...

या गोष्टी सांगून थोडयाच कळतात ?

असो खूप बोलायचं आहे मला तुमच्याशीं. पण ते सारं भेटी अंतीं. सांगा, ती भेट केव्हां ? उद्यां ? महिन्यानं कीं वर्षभरानं ? अं !

पत्राच्या उत्तरापेक्षां स्वतः तुमचीच अपेक्षा करते, अन् तीही शक्य तितक्या लौकर बरं कां ?

तुमची—कविता.

पत्र वाचून होतांच किती विरगुळा वाटला जीवनच्या मनाला. त्याची आई वारल्यापासून त्याला इतकं समाधान कधीही लाभलें नव्हतें. त्याला वाटलें आपली आई आपणांस सोडून गेली खरी; पण आईप्रमाणें आपली काळजी वाहणारी, आपल्यावर निरतिशय प्रेमाचा वर्षाव करणारी ताई भेटली.

त्याचें मन उल्हसित बनलें आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य झळकलें.

रात्रीच्याच गाडीनें मुम्बईस निघण्याचा निर्धार करून त्यानें तें पत्र तसेंच टेबलावर फेकलें आणि दार्जीस सामानाची बांधाबांध करण्यास सांगण्यासाठीं तो खोली बाहेर पडला.

कोपऱ्यांतल्या चटईवर बसून, कांहींसें वाचण्याचें सोंग करणाऱ्या कल्पनेचें सारें लक्ष जीवनकडेच होतें. दार्जीनें पत्र आणून देतांच त्याचा चेहरा फुलल्याचें, तें पत्र वाचून होताच त्याच्यावर हास्य पसरल्याचे, आणि त्या हर्षभरानच तें पत्र टेबलावर फेकून तो खोली बाहेर पडल्याचे, तिनें चाणाक्षपणानें जाणल्यानें, तो जाताच ती चटकन् उठली आणि टेबलावर पडलेले कवितेचें पत्र उघडून वाचू लागली—

' प्रिय जीवन, '

तिच्या भिवया वक्र झाल्या.

सर्व वाचून होतांच तर तिचे डोळे क्रुद्ध बनले. ओंठ थरारले आणि खालील सहीवरून आपली नजर फिरवीत ती दात ओंठ खात पुटपुटली, ' तुमची कविता. तुमची हं ! '

नंतर समोरच्या भिंतीवर टांगलेल्या करुणाबाईच्या फोटोकडे विस्फारित नेत्रानीं पहात ती आवेशानें म्हणाली, ' अन् यांना वाटत होतं कीं मीच चुकतं आहे, मला त्यांच कवितेबरोबरचं पवित्र आचरण

पापी दिसत आहे, नि मी त्यांच्यावर पूर्णपणे विश्वासून रहावं. कशाला? विश्वासानं त्यांच्या खांद्यावर टाकलेली मान निर्दयपणे कापली जायला! हं! हं! हं! काय लिहिते, ' खूप बोलायचं आहे मला. पण भेट केव्हां? खरंच भेट केव्हां? '

तिनें भेसूर हास्य केलें आणि कर् कर् दांत खाल्ले.

तोंच समोरून जीवन येत असल्याचें पाहून, तिनें ते पत्र टेबलावर फेकलें, आणि समोरच्या मोठ्या आरशापुढे उभी राहून, त्यांत ती आपले रूप न्याहाळूं लागली.

विशेष खुषींत असल्यानें जीवन तिच्या मागें जाऊन उभा राहिला आणि विनोदाच्या तुषारांनी तिचा त्याजविषयींचा क्रोधाग्नी विझविण्याच्या उद्देशानें तो हांसत हांसत ह्मणाला, ' काय पाहते आहेस इतकं स्वतः-लाच न्याहाळून? '

' कॉलेजच उच्च शिक्षण घेणाऱ्यांचं मन आकर्षून घेण्याइतकं माझ्यांत सौंदर्य आहे किंवा नाहीं तें पहात आहे मी. '

कल्पनेच्या उत्तरांतील उपरोध जीवननें जाणला. तीक्ष्ण धारेच्या शस्त्राप्रमाणें त्याच्या मनाला तो बोचला. तरीहि तिचे बोलणे चेष्टवारी उडवून लावण्याच्या इच्छेनें, तो हांसत म्हणाला, ' ते ज्याचं त्याला कळत नसत, दुसऱ्यानं सांगाव लागतं. '

' अस्स? मला अशिक्षिताला काय हें ठाऊक असणार? मी कुठं कॉलेजचं उच्च शिक्षण घेतले आहे कीं, मुम्बई सारख्या शहरांत राहिले आहे? '

जीवनचा चेहरा खरकन् उतरला. तिचे ते शब्द त्याच्या अंतरंगाचा ठाव घेत गेले. तो चिडून म्हणाला, ' अशा रीतीनं टोंचून बोलून, आणखी किती दिवस छळणार आहेस तू मला? '

' चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात त्या यांच वाटतं ? '

' कल्पना ! '

' असल्या गुरकावण्याला मी मुळींच भीक घालत नाहीं. ' रागानें बेफाम झालेली कल्पना मोठ्या आवेशानें म्हणाली, ' याचा चांगला सराव झालेला आहे मला. खोट्या प्रेमाचा बहाणा करून आजवर तुम्ही मला फसवीत आलांत अन् वर...'

' असले खोटें विधान करतांना तुझ्याजवळ कांहीं पुरावा आहे कां ?'

' हा घ्या ताजा पुरावा; ' म्हणून टेबलावर पडलेलें कवितेचें पत्र उचलून जीवन पुढें करीत कल्पना म्हाणाली, ' तुमच्या भेटीसाठीं ही फारच उतावीळ झाली आहे म्हटलं. जा, भेट द्या तिला अन् करा तिच विरहामुळं तप्त झालेलं हृदय शांत. '

आतां मात्र जीवनचे पित्त खवळलें,त्याचा मनावरचा ताबा उडाला. त्याची मूळची शांत वृत्ति नाहींशी झाली आणि बेफाम बनून त्यानें कल्पनेच्या कानफडात ठेऊन दिली.

' आईग ! ' म्हणून किंकाळून कल्पना धाडकन् खालीं पडली. तिच्याकडे न पाहतांच जीवन खोलीं बाहेर पडला आणि दिवाणखान्यांत येतांच तेथें लटकाविलेल्या करुणाबाईच्या मोठ्या तसबिरीवर मस्तक ठेऊन, तो पुटपुटला, ' आई, संपला माझा संसार. '

किती वेळ तो तसाच करुणाबाईच्या तसबिरीकडे एकाग्रतेनें पहात उभा राहिला असतां कोणास ठाऊक. थोड्यावेळानें समोरून दाजीला येतांना पाहतांच तो उठला आणि आपल्या प्रक्षुब्ध मनःस्थितीची कल्पना त्याला येऊ नये म्हणून त्यानें उगीचच त्याला विचारले, ' झालं कां बेडिंग बांधून ? '

' झालं साहेब ! '

' पुस्तकांचं गाठोडं नीट बांधलं आहेस ना ? नाहींतर मागच्या-प्रमाणं ते उचलतांच सारी पुस्तकं बाहेर पडायची. '

' नाहीं साहेब ! अगदीं घट्ट आवळून बांधलं आहे. '

' छान, जा तर मग. अन् कळव स्वयंपाक्याला फराळाचा डबा भरून ठेवायला. '

दाजी ' बरं ' म्हणाला खरा; पण तो तेथेंच रेंगाळूं लागल्याचे पाहून जीवननें विचारले, ' कायरे, अजून तूं इथच...'

' आपल्यापाशीं एक काम होतं साहेब. '

' कोणतं तें ? साहेब. '

' तुम्ही इथं येण्यापूर्वी थोरल्या बाईनीं तुम्हांला देण्यासाठीं एक पत्र माझ्याजवळ दिलं होतं. '

म्हणून दाजीनें एकदां भरकन् चौफेर नजर फिरवून, आसपास कुणीही नसल्याची खात्री करून घेतली, झटकन् पैरणीच्या आंत लपविलेलें पाकीट बाहेर काढलें आणि जीवनच्या हातीं ठेवलें.

' आईनं त्यावेळीं दिलेलं पत्र तूं मला आज देतो आहेस ना रे थांदरटा ! ' जीवन पाकीट फोडीत म्हणाला.

' नाहीं साहेब ' दाजीनें आपली बाजू मांडली, ' त्यांच्या पश्चातच हें पत्र तुम्हांला देण्यास बजावलं होत बाईनीं. '

' काय ! '

कसलीशी असह्य वेदना विजेच्या झटक्याप्रमाणें जीवनचें हृदय भेदून गेली.त्याचा चेहरा गोरा मोरा झाला. त्याची छाती धडधडूं लागली. आणि कांपऱ्या हातांनेंच तें पत्र उघडून तो वाचूं लागला.

जीवन बाळ,

माझं हे शेवटचं पत्र. अन् तें तुझ्या हातीं माझ्या मृत्यूनंतर पडणार! ही घटना विचित्र तर खरीच, पण मला ती मुद्दामच घडवून आणावी लागली.

अशानं बुचकळ्यात पडशील तूं कदाचित् गोंधळूनही जाशील. अन् म्हणून मी सर्व गोष्टी सरळ सरळ तुला निवेदन करते.

जीवन, मला पहिल्यापासून, माझ्या लग्नाच्या पूर्वीपासून, राष्ट्रकार्यांची आवड. स्वातंत्र्याप्रित्यर्थ देशभर चाललेल्या घडामोडी जाणण्याचा मला मोठा नाद. महात्माजी नि त्यांच्या तत्वज्ञानाचं दांडग वेड. पण हे सारं मला उघडपणें बोलण्याची देखील चोरी होती. मग प्रत्यक्ष त्यात भाग घेण्याची गोष्ट तर दूरच राहो.

अन् याचं कारण तू जाणतोसच.

मी अगदीं त्यांच्या 'होला हो' देत होते. त्यांनीं राष्ट्रीय पुढाऱ्यांना शिव्या देताच मी मान डोलवावी, त्यांनीं मा-बाप सरकारची आणि त्यांच्या राज्यापासून हिंदुस्थानला झालेल्या फायद्याची तोंड भरून तारीफ करतांच, मी हांसून मला त्यांचं म्हणणं पटल्याचं, मनापासून आवडल्याचं दर्शवाव.

मी ढोंग करीत असल्याचं मला कळत होतं; पण त्यावांचून मला गत्यंतरच नव्हतं. या घरात सुखासमाधानानं रहावयाचं झाल्यास त्या वांचून मला दुसरा मार्ग नव्हता.

जोपर्यंत मी त्यांच्या इच्छेबरहुकूम वागत होते, निदान वागल्याचं दर्शवित होते तोपर्यंत सारं कांहीं सुरळित चालल होतं. आपणांस हवी तशी बायको मिळाल्याचं पाहून, त्यानाही बरं वाटत होतं. त्यामुळेंच ते माझ्यावर प्रेम करीत आणि याचा फायदा मी कित्येकदां घेतल्याचं तूं जाणतोसच.

पण हें सारं कुठपर्यंत! माझं ढोंग त्यांच्या निदर्शनास आलं नव्हतं

नाहीं तोपर्यंत. पण ज्या दिवशीं मी आंत एक आणि बाहेर एक वागत असल्याचं त्यांना कळून चुकलं त्या दिवशीं त्यांनीं उग्र रूप धारण केलं.

माझं ढोंग कसं बाहेर पडलं ठाऊक आहे कां तुला ?

त्याची सुरुवात तूं शिक्षणासाठीं मुंबईस गेलास तेव्हां झाली असावी. त्या दिवशींच त्यांना तसा संशय आला असावा. त्यांनीं कधीं तसं बोलून दाखविलं नाहीं; पण त्यांचं मजबरोबरचं वर्तन पूर्वीप्रमाणं मोकळ नसल्याचं मी जाणलं. क्रोधाग्नी आंतल्याआंत धुमसत असल्याचंही मला कळून चुकलं;पण या पेटलेल्या अग्नीचा भडका उडविला तो तुझ्या पत्रानीं.

जीवन, तूं मला लिहिलेलीं पत्रं जशीच्या तशीं माझ्या हातीं पडतांत असं कल्पून तूं प्रत्येक गोष्ट खुल्या दिलानं त्यांत विदित करीत होतास. परवा परवापर्यंत माझी देखील तशीच समजूत होती; पण माझं प्रत्येक पत्र सेन्सॉर होऊन माझ्याकडे येत असल्याचं नंतर मला कळून चुकलं. त्यामुळं झालं काय ठाऊक आहे कां तुला ! त्यांचा मजवरचा पूर्वीचा सारा विश्वास तर उडालाच, उलट त्यांना माझा मनस्वी संताप आला. तुला ' बिघडविणारी ' मीच असल्याची त्यांची ठाम समजूत बनल्यानं ते मला पाण्यांत पाहूं लागले. त्यांची नाहीं नाहीं तीं बोलणीं मला ऐकून घ्यावी लागली.

मला या गोष्टी सहन होईनात आणि यांतून सहीसलामत बाहेर पडण्याचा मला कोणता मार्गही दिसेना.

या सर्व गोष्टींचा माझ्या मनावर भयंकर परिणाम झाल्यानं माझी प्रकृति ढासळली अन् मी लवकरच इहलोकची यात्रा संपवून जाणार असल्याचं आंता मला कळून चुकलय्.

पण त्याचं मला मुळींच वाईट वाटत नाहीं. लाजिरवाणं जिणं कंठण्यापेक्षां मेलेलं बरं असंच मला वाटतं. मी माझं कर्तव्य करीत असतां

मला प्राणार्पण करावं लागलं तर त्यांत मला आनंदच आहे. हेंच नाहीं कां महात्माजींनीं सांगितलं ?

' प्रत्येकानं आपल्या राष्ट्रासाठीं, आपल्या देशबांधवासाठीं, आपल्या प्रिय व्यक्तीसाठीं थोडाफार त्याग हा केलाच पाहिजे. वेळप्रसंगीं प्राणाहुति देण्यासही तयार झालं पाहिजे. '

हे आहूतीचं तत्व मला पटलं नी मी ते स्वतःच्या उदाहरणानं सर्वांना पटवून दिलं. अन् तुलाही मी सांगते जीवन, स्वार्थाला बळी पडूं नकोस, त्यागाचा विसर पडूं देऊ नकोस. निःस्वार्थ बुद्धीनं केलेल्या त्यागांतच सिद्धी आहे हे ध्यानांत ठेव.

माझ्या बाळाला सद्बुद्धी देवो म्हणून त्या सर्वसाक्षी परमेश्वराजवळ अनन्यभावानं प्रार्थना करणारी तुझी लाडकी आई—करुणा !

पत्र वांचून होतांच जीवनला भोंवळ आली. त्याला तोल संभाळणें कठीण गेल्यानें, त्यानें कोचाचा आधार घेतला आणि दोन्हीं हातांनीं मस्तक घट्ट दाबून धरलें.

तो तसाच तारवटलेल्या नेत्रांनीं करुणाबाईंच्या फोटोकडे पहात होता. त्यांचें हृदय दुःखातिशयानें व्याकूळ झालें होतें, पण त्याच्या डोळ्या-वाटें एक टिपुस्‌देखील बाहेर पडत नव्हते.

कांहींशा निश्चयानें तो उठला आणि आबांच्या खोलीकडे वळला.

आबा वर्तमानपत्र वाचीत आरामखुर्चीत पडले होतें. जीवनला तेथें आल्याचे पाहूनही त्यांनीं त्याला न पाहिल्याचें दर्शविलें. त्याच्या भिवया आकुंचित झाल्या आणि कपाळावर दोन आंठ्या पडल्या.

त्यांच्या हालचालीवर लक्ष असलेल्या जीवनच्या दृष्टिपथातून हा फरक झांकून राहूं शकला नाहीं. तरीही त्यानें आपल्या चेहऱ्यावरची

गंभीरता ढळूं दिली नाहीं. दारालगतच्या खुर्चीच्या दांड्याला रेलून उभा रहात तो म्हणाला, ' आबा...'

आबांनीं वर्तमानपत्रांतून तोंड वर काढून जीवनकडे पाहिलें.

' कॉलेज उघडून आठ दहा दिवस झाले, आज मी जावं म्हणतों.'

' मग जा कीं, ' आबा बेफिकीरपणें उत्तरले.

' मला तुमची परवानगी पाहिजे आहे'.

' परवानगी ! ' आबा उपहासानें हांसून म्हणाले, ' आजपर्यंत कुठं तू माझी परवानगी घेत होतास ? माझ्यासांगण्याप्रमाणं वागत होतास ? '

' पण यापुढं...'

' सारं ठाऊक आहे मला' , आबा स्वर चढवून म्हणाले. ' या असल्या भुलथापावर मी आजपर्यंत फसलों, पण यापुढं......कशाला नसत्या वाटाघाटी ? तुझ्याबद्दलच्या माझ्या सर्व आकांक्षा केव्हांच मातीशीं मिळाल्या आहेत; आणि म्हणूनच सर्व गोष्टी कळल्या असतांही, मी अज्ञानाचं सोंग आणून गप्प बसलो आहे. मुंबईला जा, अगर वर्ध्याला जा, मला दोन्हीहि सारखच...'

आपल्या मस्तकावर एकामागून एक घणाचे घाव पडताहेतसं वाटलें जीवनला. त्यानें आपलें मनःस्वास्थ्य ढळूं दिलें नाहीं; पण त्याला तेथें अधिक वेळ थांबवले नाहीं.

# १४

' समजलीस कविता, मी पाहिजे तें सहन करीन, पण ही गोष्ट केव्हांही सहन करणार नाहीं, ' रागानें बेफाम झालेला क्रांतिकुमार हातांतील पुस्तक जोरानें समोरच्या टेबलावर आपटींत म्हणाला.

' ही म्हणजे कोणती ? '

' जाणून बुजून अज्ञानाचं सोंग आणते आहेस तू ...'

' खरंच नाहीं कळलं मला. '

' तर मग सांगतोच, ' क्रांतिकुमार निश्चयी स्वरानें म्हणाला. त्याचा चेहरा करारी दिसत होता आणि सर्वांगावर तर रागाच्या लहरी जोरानें उसळत होत्या. टेबलावरच्या भिंतीवर टांगलेल्या जीवनच्या फोटोकडं बोट करून तो म्हणाला, ' हा फोटो कुणाचा ? '

' जीवनचा. '

' तुझा नि त्याचा काय संबंध ? '

' काय म्हणजे ' कविता चमकून पण चटकन् उत्तरली, ' बहीणभावाचा. '

' म्हणे बहिणभावाचा ! ' अतिशय संतापलेला क्रांतिकुमार कवितेला वेडावीत म्हणाला, ' असानं भोळ्या भावड्या लोकाना फसवितां येतं; त्यांची तोंडं बंद करतां येतात; पण माझ्या सारख्यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न केल्यास, ती धूळ उलट टाकणाऱ्याच्या डोळ्यांतच उडण्याचा संभव अधिक असतो हें तूं विसरूं नकोस. म्हणे बहिणभाऊ ! मी पुरा

ओळखून आहे कीं, आपली पापं लपविण्यासाठीं, त्यावर समर्पणाचा, पावित्र्याचा शिक्का मोर्तब करण्यासाठी हे काहिण भाकडाचं मतं फारच उपयोगी पडतं. कुणाची बिषाद आहे त्या विरुद्ध बोलण्याची...'

'कुमार !'

कविता संतापल्याचें क्रान्तिकुमारानें ताडलें; पण त्याला त्याचें फारसे वाटल्या सारखें दिसलें नाहीं. उलट तिरस्काराचा एक दृष्टिक्षेप करून तो अधिकार वाणीनें म्हणाला, 'तें कांहींही असो, हा फोटो यापुढं इथं राहातां कामा नये.'

कवितेनें त्याच्या डोळ्यांकडे पाहिलें. त्यांतून ज्वाला बाहेर पडताहेतसें तिला वाटलें आणि त्याच्या कपाळावर पडलेली आठी, त्याच्या मनांत जीवनविषयीं वसत असलेली तेढच तिच्या निदर्शनास आणून देत होती.

तिचें मन भयकर कष्टी बनलें. क्रान्तिकुमाराचा एककली व हट्टी स्वभाव तिच्या पुऱ्या माहितीचा असल्यानें, त्याच्याशीं अधिक हुज्जत घालण्यांत कांहीं अर्थ नसल्याचें ती पूर्णपणें जाणत असतांही ती म्हणाली 'पण...'

'नसतां वाद घालूं नकोस तूं कविता.'

'अन् म्हणे सुशिक्षित ! सुधारक !' कवितेचें पिळवटून गेलेलें हृदय बोललें, 'बायकोला इतकंही स्वातंत्र्य देऊं इच्छीत नाहींत...'

'भलत्या गोष्टींत मी मुळींच स्वातंत्र्य देणार नाहीं.'

'भलती गोष्ट आहे कां ही ?'

'नाहींतर काय ! आज तूं याचा फोटो डोळ्यांपुढं मागत ठेऊं लागलीस, उद्यां यालाच घेऊन...'

'कुमार !' आतां मात्र कविता विलक्षण संतापली. सर्वांग थरथर कांपणारी ती क्रुध्द नजरेनें क्रान्तिकुमाराकडे पहात, चवताळलेल्या

वाघिणीप्रमाणें ओरडली, ' तुम्ही कुणाला अन् काय बोलतां आहांत याची शुध्द आहे का तुम्हांला ? माझा फार अंत पाहू नका; केवळ तुमची इच्छा म्हणून मी जीवनांची सारी पत्रं फाडून टाकली, पुढंही पण त्यांना पत्र न लिहिण्याचं कबूल केल. आतां तुम्ही .'

' त्याचं नांव अजिबात टाकलं पाहिजे तुला कविता. त्याचा फोटो तूं इथं लावता कामा नये, फार काय तो कधींही यापुढ पाहतां कामा नये, इतकंच नव्हे तर तू त्याची भेट देखील घेता कामा नये.'

' हा निव्वळ जुलूम होतोय् माझ्यावर, ' कविता रडकुंडीस येऊन म्हणाली.

' माझ्याकरितां तुला हा जुलूम सहन करावाच लागेल. '

' पण तो कां ? '

' कां ? ' क्रान्तिकुमार भेसूर हास्य करीत म्हणाला, ' कान उघडं ठेऊन, लोक तुमच्याविषयीं काय बोलतात, तुमच्या शीलावर किती घाणेरडे शिंतोडे उडवितात हें ऐक, म्हणजे त्याचं कारण आपोआप कळेल तुला.'

' पण तुम्हांलाही तसंच वाटतं का ? '

' कां वाटू नये ? मी फिरफिरून सांगत असताही, तू त्याचं नांव टाकण्यास तयार होत नाहींस. तेव्हां...'

' पुरे ! ' म्हणून कविता उद्गारतांच क्रान्तिकुमार गप्प झाला. कवितेनें आंवढा गिळला, गद्गदित झालेला कंठ साफ केला आणि शून्य नजरेनें समोरच्या भिंतीवर टांगलेल्या महात्माजींच्या तसबिरीकडे पहात ती म्हणाली, ' केवळ तुमची इच्छा म्हणून, माझ्या वैवाहिक जीवनाचा चुराडा होऊं नये म्हणून, मी माझ्या जीवनबरोबरच्या पवित्र मैत्रीवर पाणी सोडण्यास तयार आहे. हा पहा मी त्यांचा फोटो काढून टाकला. '

मोठ्या आवेशानें कविता टेबलापुढच्या भिंतीकडे वळली, आणि झटकन् तेथें टांगलेला जीवनचा फोटो तिनं काढला आणि टेबलावर ठेऊन दिला.

तोंच समोरच्या कोचावर धूम्रपान करीत बसलेला क्रान्तिकुमार म्हणाला, 'त्या बरोबरचं त्या गांधीची तसबीर काढून टाक ह्मणजे झालं...'

चमकून क्रान्तिकुमाराकडे पहात कविता म्हणाली, 'जीवन एक तुमच्या सौख्याच्या आड येतात, असं तुमच्या संशयी मनाला वाटल्यानं त्याचा फोटो इथं असणं तुम्हांला आवडलं नाहीं; पण महात्माजींनीं काय केलं आहे तुमचं वाईट ! '

'म्हणे काय केलं आहे वाईट ! ' हातांतील जळकें थोटूक फेकून देत व डावी भिवई वर चढवीत क्रान्तिकुमार म्हणाला, 'अग त्यानं आमचं काय वाकडं केलं नाहीं म्हणून विचार. भोळ्याभावड्या हिंदवासियांना स्वातंत्र्याच्या मार्गापासून दूर, अगदी दूर नेऊन सोडणाऱ्या या थामकूला, आम्हीं कट्टर क्रान्तिकारक लोक काय किंमत देतो, हे तुला ठाऊक नाहीं वाटतं ? म्हणे सत्य नि अहिंसेन हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल असं त्याला त्याचा आतला आवाज सांगतो. सारं थोतांड आहे हें. हा एक बुवा, अन् त्याच्या नादी लागणाऱ्या तुम्हीं...'

'कुमार ! ' कविता चवताळून मध्येंच म्हणाली, 'फारच बोलूं लागलात तुम्हीं हं ! '

'खरंच, बोलण्यापेक्षां करण्याची ही वेळ असल्याचं मी क्षणभर विसरलोच होतो कीं,' क्रान्तिकुमार उपहासानें हांसत ह्मणाला,' या गांधीच्या तसबिरीचं इथून उच्चाटण करण्याचं कार्य मला करायचं असतांना, मी त्याच्यावर बोलत काय राहिलो ? '

आणि बोलल्याप्रमाणे करण्याच्या इच्छेने तो समोरच्या भिंतीकडे जाऊं लागतांच, चटकन् पुढें होऊन कविता ओरडली, ' कुमार ! '

क्रांतिकुमार जागच्या जागीं थांबला.

कविता त्याच्या समोर गेली आणि त्याच्या दृष्टीशीं आपली दृष्टि भिडवीत म्हणाली, ' या बाबतींत मी तुमचा इका मुळींच चालूं देणार नाहीं. ज्या गोष्टी आपल्या वैवाहिक सौख्याच्या आड येतील अस मला वाटलं, त्या मी टाकून दिल्या. जीवनांची मैत्री सोडण्यास जी मी तयार झाले तीही याच इच्छेनं, पण याचा फायदा घेऊन जर कां तुम्ही मला भलत्या गोष्टी करण्यास सांगाल तर मी त्याला मुळींच तयार होणार नाहीं. तुमचा जसा महात्माजींच्या अहिंसा व सत्यावर विश्वास नाहीं, तसाच माझा पण तुमच्या हिंसात्मक क्रान्तीवर विश्वास नाहीं, '

' म्हणे विश्वास नाहीं ! ' क्रान्तिकुमार उपहासानें हांसून म्हणाला, ' हिंदुस्थानाबाहेर चाललेल्या घडामोडी जाणशील तर ना नसणार विश्वास ! जा. विचार हिटलर मुसोलिनीना कीं कशाच्या जोरावर राज्य मिळतात ते.'

' खरंच माझी दृष्टि हिंदुस्थानापुरती आहे, अन् तुम्हां लोकांना यूरोपकडं दृष्टि लावून बसून, हिंदुस्थानाविषयीं बोलायची सवंय झाल्यानं, हे असले घोटाळे माजतात. म्हणूनच मी म्हणतें कीं, आजच्या परिस्थितींत ब्रिटीश साम्राज्यशाहीचा जूं झुगारून देण्यास हिंसामय क्रान्तिचा मार्ग स्विकारल्यानं आपला कांहींही फायदा व्हायचा नाहीं. निःशस्त्र असलेले आपण या पाश्चात युध्द सामुग्रीपुढं मुळींच टिकाव न धरतां, नाहक प्राणास मुकूं' '

' हं ! नुसता भ्रम आहे तुझा हा ' जीवन तुच्छता पूर्वक हांसून म्हणाला; ' जगाचा इतिहास वाचला आहेस कां नीट ! रशियाकडे पहा. रशियन क्रांति घडवून आणनारे लोक अहिंसावादी नव्हते. त्यांनाही

झारशाहीशी टक्कर द्यावयाची होती; पण निधड्या छातीचे ते वीर मुळींच डगमगले नाहींत. ते जिवावर उदार झाले नि नेटानें पुढं सरसावले. म्हणूनच त्यांना क्रांति घडवून आणता आली. तसंच आपणांसही...'

' हं ! ' कविता उपहासानें हांसून मध्येंच म्हणाली, ' अशानं त्यावेळच्या रशियातील परिस्थितीचं अज्ञान दर्शविता तुम्ही. त्या वेळचा रशिया नि आजचा हिंदुस्थान; परिस्थितींत किती अंतर ! रशियन लोक शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज होते शिवाय त्यांना ज्या झारशाहीशी टक्कर द्यावयाची होती ती आंतून पोखरली गेली होती, जर्जर झाली होती. या संधीचा क्रांतिकारकांनीं फायदा घेतला...'

' तसाच आपणास नाहीं कां घेता येणार ? '

' मुळींच नाहीं. गेले कित्येक दिवस निःशस्त्र स्थितींत आपण पारतंत्र्यांत खितपत पडलो आहोत. शिवाय आपणास तोंड द्यावयाचं आहे तें आधुनिक युद्धसामुग्रीनीं सुसज्ज अशा ब्रिटिश साम्राज्यशाहीला! त्यांचे विरुध्द हातात शस्त्र धरलं तर आपण नाहक प्राणास तर मुकूच; पण आपला स्वातंत्र्याचा मार्ग अधिकच कण्टकमय बनवूं. अन् ही गोष्ट जाणूनच गांधीजींनीं अहिंसात्मक लढा आरंभिला. त्यानं लोकांचे बळी न देतां, एवढ्या चंड ब्रिटिश सत्तेशीं दोन हात करतां आलं, फार काय त्यांना जेरीस आणतां आलं. त्याहूनही मोठा फायदा दुसऱ्या दृष्टीनीं झाला आहे. आपला देश शेतकीप्रधान, आपला बहुजनसमाज खेड्यापाड्यांत राहणारा, बहुतेक सारे निरक्षर, पण गांधीजींनीं त्यांच्यांत जागृति उत्पन्न केली, नवचैतन्य निर्माण केलं, त्यांच्यापर्यंत राष्ट्रीय चळवळ नेऊन भिडविली, त्यांना त्यांत भाग घ्यावयास लावला; त्यांच्याकडून स्वातंत्र्याचा जयघोष करविला. सांगा, हे लहानसहान कार्य आहे कां ? तुमच्या हिंसेचा जर कां महात्माजींनी अवलंब केला असतां तर त्यांना हे करतां आलं असतं कां?'

' कबुल. पण याहून अधिक त्यांना कांहीं करता येणं शक्य आहे कां ? लोक जागृति म्हणणें कांहीं स्वातंत्र्य प्राप्ति नव्हे. त्याला हिंसात्मक लढाच आरंभायला पाहिजे. त्यासाठीं कित्येक लोकाना प्राणार्पण करावं लागेल. रक्तपातावाचून स्वातंत्र्य देवता केव्हांही संतुष्ट होत नाहीं. राशिया, आयर्लंड, इटली अगर जगांतील इतर कोणत्याही देशाच्या इतिहासाची पानं चाळल्यास तुला हेंच आढळून येईल कीं, अहिंसेनं कधींही स्वातंत्र्य प्राप्ति होणं शक्य नाहीं. त्याला हिंसात्मक मार्गाचाच अवलंब करायला हवा. म्हणून मी म्हणतों कीं गांधींनीं आतां राजकारणांतून आपलं अंग काढून घ्यावं आणि हिंसेवर विश्वास असणाऱ्या लोकांकडे सर्व सूत्रें सोपवावींत...

तोंच बाहेर दारावरील घंटा वाजल्यानें क्रांतिकुमारानें आपलें भाषण तेथवरच थांबविलें.

कविता दरवाज्याजवळ गेली आणि म्हणाली ' कोण आहे तें? '

' मी जीवन ' बाहेरून आवाज आला.

' जीवन ' म्हणतांच कवितेचें सर्वांग हर्षानें पुलकित झालें, तिच्या विषण्ण चेहऱ्यावर आनंदाची छटा उमटली.

' जीवन ! ' झटकन् उठून उभा राहिलेला क्रान्तिकुमार उद्गारला. त्याचा श्वास जोरानें वाहूं लागला, डोळे क्रुध्द तसेच भेसूर बनले आणि तो एकदम दाराकडे वळला तेव्हां कविता त्याला अडवून म्हणाली, ' काय करणार आहांत तुम्ही ? '

' सरळ निघून जाण्यास सांगणार आहे मी त्याला. '

' तुम्ही नका जाऊं. मीच सांगते त्यांना, ' कविता काकुलतीनें म्हणाली, ' खरच येणार नाहींत ते फिरून इकडे, मलाही भेटणार नाहींत...'

एकदां तारवटलेल्या नेत्रांनीं कवितेकडे पाहून पण कांहींही न बोलतां क्रांतिकुमार मागें फिरला; आणि कोचावर वसून सिगारेटचे फवारे सोडूं लागला.

आपल्या डोळ्यांत अश्रू उभे राहणार असें कवितेला वाटलें; पण मोठ्या कष्टानें तिनें ते आवरले. चेहरा जितका आनंदी ठेवतां येईल तितका ठेवण्याचा प्रयत्न करीत तिनें दार उघडलें.

तिला पाहताच दारांत उभा असलेला जीवन उद्गारला, 'कविता!' क्रांतिकुमारानें धूम्रपान करण्याचें बंद करून, आपली मूठ घट्ट आवळली.

कवितेची छाती सारखी धडधडूं लागली; पण आपल्या प्रक्षुब्ध मनःस्थितीची कल्पना जीवनला येऊं नये म्हणून ती घाईघाईनेंच म्हणाली, 'जीवन, मी सध्या भयंकर कामांत आहे. खरंच फार काम आहे मला. जाल का तुम्ही आतां?'

जीवन चपापला, आश्चर्याचा धक्काच बसला. त्याला तिचा तो प्रश्न त्याला अनपेक्षित तर वाटलाच, पण तिचें वर्तन गर्हणीय वाटलें त्याला. इतक्या दिवसांनी आपण भेटलो असतां, सुट्टीहून परततांच मुद्दाम तिला भेटण्यासाठीं तिच्या बिऱ्हाडीं आलो असतां तिनें आपण कामांत असल्याचें निमित्तपुढें करून आपणास निघून जाण्यास सांगावें, सरळ आपल्या तोंडावर तसें सांगावें...वृत्ति बधीर झाल्याप्रमाणें तो तिच्याकडे पहात राहिला.

कवितेला त्याच्याकडे बघवेना. तिला भडभडून आलें. तो तेथें अधिक वेळ थांबल्यास आपला आपल्या मनावरचा ताबा उडेल, आणि आपण अश्रू ढाळूं लागूं, असें कल्पून तिनें फिरून विचारलें, 'जतां ना?'

कांहींही न बोलतां जीवन एकदम जिन्याकडे वळला.

आतामात्र कवितेच्या नेत्रांतून अश्रू वाहू लागले.

जीवन जिना उतरुन खाली येतो न येतो तोंच त्याला तेथें जिल्लू भेटली. त्याला पाहताच तिने हासून म्हटले ' कोण जीवन! केव्हां आलांत तुम्ही ? खरच कळलं देखील नाहीं कीं मला. या, याना आंत...'

जीवन कांहीं बोलला नाहीं, कीं मान वळावून त्यानें तिच्याकडे पाहिलें नाहीं. वेडपटाप्रमाणें तो तसाच पुढें पाहून रस्ता चालू लागला आणि वृत्ति बधिर झाल्याप्रमाणें जिल्लू त्याच्याकडे पहात राहिली.

कवितेचे डोळे तारवटल्यासारखे झाले.

ती आतां रडत नव्हती कीं थरथर कांपत नव्हती.

तिचे डोळे निश्चयी तसेंच करारी दिसत होते.

जीवन डोळ्यांच्या टापू बाहेर जाताच, तिनें दार जोराने पुढें लोटलें आणि झपाझप पावलें टाकीत, कोचावर पडल्या पडल्या संथपणे धूम्रपान करणाऱ्या क्रांतिकुमाराजवळ येऊन ती म्हणाली, ' झालं ना आता तुमच्या मनासारखं ? '

' अजून थोडं व्हायचं आहे, ' सिगारेटचे फवारे सोडीत क्रांतिकुमार म्हणाला, ' अद्यापि त्याच्या फोटोची विल्हेवाट लावायची आहे कीं.'

कवितेचे डोळें भयंकर तीक्ष्ण बनले. ती बेफाम बनली. कांहींही न बोलता ती झटकन् टेबलाकडे वळली आणि टेबलावर पडलेला जीवनचा फोटो उचलून तिनें गड्यास हांक मारली.

गडी येऊन तिच्यापुढें उभा राहिला.

' वसतिगृहाला जा नी नेऊन दे हा फोटो जीवनना, ' कवितेनें फर्मांण सोडलें.

' बरं. ' म्हणून तिनें पुढें केलेला फोटो घेऊन गडी चालूं लागताच, तिनें त्याला परत बोलावून म्हटले, ' मी पत्र देते तेही नेऊन दे त्यांना. '

'पत्र !' क्रांतिकुमार नीट उठून बसत म्हणाला.

'हो पत्र,' कविता कोपऱ्यांतल्या टेबलापुढें खुर्ची ओढत म्हणाली, 'शेवटचं पत्र लिहितें आहे मी जीवनना...'

क्रांतिकुमार कांहीं बोलला नाहीं. विचित्र नजरेनें त्यानें एकदां कवितेकडे पाहिलें आणि कोचावर पडल्या पडल्या धूम्रपान करीत असतां, त्यांतून निघणाऱ्या वर्तुळांच्या धूरांत त्यानें आपली दृष्टि विलीन केली.

कविता लिहूं लागली.

प्रिय जीवन,

खूप संतापला असाल तुम्ही मझ्यावर. तुम्हांला मघाचं माझं वर्तन अव्यवहार्य, उद्धटपणाचं, इतकंच नव्हे तर अपमानकारक देखील वाटलं असेल.

सरळ तुम्हांला निघून जाण्यास सांगतांना या गोष्टीवर माझी दृष्टि होती. मी बेशरमपणानं वागत असल्याचं माझं मन मला सांगत होतं; तरीही मी तसं वागलें, इच्छा नसतांना वागलें; मला तसं वागणं भाग पडलं.

जीवन, तुम्हां—आम्हांला वाटतं इतकं जग चागलं नाहीं. सज्जन तर नाहींच नाहीं. चांगल्यापेक्षा वाईट गोष्टीच तेवढ्या त्यांच्या नजरेस चटकन् भरतात. फार काय, कांहीं कांहीं वेळा चांगल्या गोष्टी देखील वाईट दिसूं लागतात. आपल्या सारख्या पवित्र मैत्रीनं जखडल्या गेलेल्या स्त्री—पुरुषांना देखील या विचित्र जगाची झळ पोंहोचते. दूषित दृष्टीनं आपल्याकडे पाहणाऱ्या या जगाला आपलं पवित्र आचरण पापी दिसूं लागतं.

अन् अशा जगांत आपणांस रहायचं असल्यानं,त्या जगाला रुचतील अशाच गोष्टी आपणांस करायला नको का!

तुम्हीं विचाराल, ' आतांच कुठलं हे तत्वज्ञान तुला सुचलं ? आज पर्यंत जाणून बुजून जगाकडे कानाडोळा करणारी तू, जग आपल्याविषयी भलतं सलतं बोलत असल्याचं ठाऊक असतांही, तुं तिकडं दुर्लक्ष केलंस इतकंच नव्हे तर मी एकदां ही गोष्ट तुझ्या निदर्शनास आणून दिली असतांही, तू उपहासानं हासून म्हणाली होतीस, ' उठलं सुठलं आपण जर कां जगाची फाजिल पर्वा करूं लागलो तर आपणास दूर कुठं तरी हिमालयावर जाऊन रहाव लागेल. अन् आता तूच असं लिहू लागलीस. '

जीवन, माझ्या आयुष्यात घडून आलेल्या एका महत्वपूर्ण प्रसंगा-मुळंच माझ्या विचारांत ही क्रान्ति घडून आली, नाहीं मला ती घडवून आणणं भाग पडलं. त्या प्रसंगाची कल्पना आलीच असेल तुम्हाला; तो म्हणजे लग्न !

लग्न झालेल्या स्त्रीला स्वतःचं मन नसतं. आम्ही स्त्रिया म्हणजे पुरुषांना हातचें बाहुले वाटता. ते नाचवतील तसं आम्हीं नाचलं पाहिजे. पत्नी म्हणजे पतीच्या हातची मोडकी सतार. तो वाजवील तसा तिनं सूर काढला पाहिजे.

अन् माझ्या पतीची इच्छा म्हणूनच मला तुमची मैत्री सोडावी लागत आहे. तस करतांना माझ हृदय तिळतिळ तुटत, तरी मला या गोष्टी करायला हव्यांतच.

जीवन, आपण जरी यापुढं कधीं भेटलों नाहीं तरी, तुमचा विसर म्हणून मला कधी पडायचा नाही. छे ! शक्यच नाहीं तें मुळीं. तुम्हीं बाह्यचक्षूपुढून दूर झालांत तरी माझ्या मनःचक्षूपुढें सदोदीत उभे रहाल. कुणाची प्राज्ञा आहे तिथून तुम्हांला दूर करायची !

तुम्हांला जशी मला भेटण्याची बंदी आहे, तसंच मला तुम्हाला पत्र लिहिण्याचीहि आहे. तुम्हीही पण लिहूं नये.

क्षमा करा, तुमच्या थोर अंतःकरणाचा उपयोग करून,तुमच्या या हतभागी भगिनीला क्षमा करा. माझ्या सौभाग्यासाठीं, माझ्या संसारिक सुखासाठीं मी करीत असलेल्या घोर अन्यायावर पांघरून घाला.

अधिक काय लिहूं ? खूप लिहावसं वाटतं. शेवटचं पत्र आहे हे. पानावर पानं खर्ची घालावीत असं वाटतं. पण नकोच ते! अंहं ! शक्यच नाहीं ते ! हृदयांत दुःखाग्नी पेटला उसतां, डोक्यांत विचारांचे वादळ थैमान घालीत असता अन् डोळ्यांत अश्रू एकवटून आले असतां, माझे हात चालणेंच मुळीं शक्य नाहीं.

ही पहा ! टिपं गळूं लागली.

तु. कविता.

ता. क. तुमचा फोटो देखील परत करावा लागावा ना ? दुर्दैव माझं दुसरं काय ? पण दुःखात सुख एवढंच कीं तुम्ही दिलेली महात्माजींची तसबीर सदोदित माझ्या लिहिण्याच्या टेबलावरच्या भिंतीवर लटकत राहिल, नि तिकडं पहात असतां तुमची मूर्ति माझ्या मनःचक्षुपुढें चटकन् उभी राहील

तु. कविता.

# १५

जीवन आपली रोजनिशी लिहूं लागला—

जोड, तोड, मिलन नि विरह यांनींच मानवी आयुष्य बनलेलं असतं, नि प्रत्येक मनुष्यानं आपली मन:स्थिति या जीवित स्वरूपाला योग्य दिसेल, अशीच बनवायची असते. तेव्हां कवितेच्या सुखासाठीं मी स्वत:च्या सुखावर पाणी सोडायला नको का? तिला तिच्या पतीची आज्ञा पाळली पाहिजे, त्यांतच तिचं सुख साठविलेलं आहे. अन् तिच्या पतीची इच्छा तिनं यापुढं माझ्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेऊं नये अशी असतां त्या बाबतीत मी तिला मदत करायचं कीं त्यामुळं माझ्या हृदयाला भयंकर यातना होतील म्हणून दु:ख करीत बसायचं!

आपली प्रिय माणसं कांहीं कारणानं डोळ्यासमोरून नाहींशीं झाली तरी, ती हृदयांत कायमचं वास्तव्य करून असतात; ती मन:चक्षुसमोर सदैव दिसतात व अशा रीतीनं त्यांचा हृदयाशीं अगदीं जवळचा संबंध असतो.

खरंच! काळोखान भरलेल्या जगांत हे प्रेमाचे नंदादीप नसते तर, मानवी आयुष्य असह्य नि भयाण झालं असतं. ह्या सतत मंद पण स्थिर प्रकाशानं तेवत राहणाऱ्या प्रेमाच्या नंदादीपामुळंच मानवी आयुष्य सह्य नि भोग्य ठरत असतं. असं असतां कवितेला मला यापुढं भेटतां येणार नाहीं म्हणून मी दु:ख करायचं? उलट ती सुखी कशी होईल हीच मी इच्छा धरायला नको कां?

महात्माजींचा उपदेश मला सदोदित ध्यानीं बाळगला पाहिजे. झोपेंत देखील विसर पडता कामा नये त्याचा. कितीही मोठ्या परीक्षा पास झाल्या तरी त्यागाचा धडा सदोदित गिरवत राहिल पाहिजे, वेळप्रसंगीं स्वतःच्या जीविताची पण आहुति देण्यास तयार झालं पाहिजे...

एवढं लिहून होते न होतें तोंच दारावर कुणीतरी ठोठावल्यानें जीवननें लिहिण्याचें थांबवून विचारलें, ' कोण आहे तें ? '

' कळेल ते आपोआप, आधीं दार उघड,' बाहेरून आवाज आला.

तो आवाज सोराबचा असल्याचें जीवननें ताडलें आणि म्हणूनच तो चटकन् उठला, आणि त्यानें दार उघडतांच सोराब आंत प्रवेश करीत म्हणाला, ' केवढ्यादां दार ठोठावलं मी ! करीत होतास तरी काय ? झोपा तर काढत नव्हतांस ! '

' अरे कुंभकर्णा, या सूर्यास्ताच्यावेळीं कुणी झोपतं होय ? रोजनिशी लिहीत होतो मी. '

' अगदींच नादिष्ट आहेस बुवा तू जीवन. यावेळीं बाहेर मोकळ्या हवेंत फिरायला जायचं सोडून देऊन, कां कुणी स्वतःस खोलींत कोंडून घेत असतं ? '

जीवन कांहीं बोलला नाहीं.

' बरं ! आता तरी चलतोस कीं नाहीं ? ' सोराब म्हणाला, ' पहा किती उशीर झालाय्... '

' फिरायला जायाला कसली आली आहे काळ वेळ ? '

' अरे नेहमीप्रमाणं आज गेटवेवर जायाचं नाहीं. '

' मग कुणीकडे ? '

' नवीन उद्घाटन होणाऱ्या त्या सायन्स इन्स्टिटयूटकडे. '

' तिकडे रे कां ? '

' अरे त्या इन्स्टिट्यूटचं गव्हर्नरांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे ना ! त्यामुळं पुष्कळ लोक जमले असतील तिथं, तिकडेच जाऊं. '

जीवनला कांहीं सोराबचा विचार इतकासा न आवडल्यानें कांहींही न बोलतां तो स्तब्ध राहिला. तेव्हां सोराब म्हणाला, ' कां रे ! गव्हर्नराच्या हस्तें उद्घाटन म्हणतांच तोंड वाकडं केलंस ? तुम्हां कांग्रेसच्या लोकांना ...'

' चुकतो आहेस तूं सोराब. आम्ही कॉंग्रेसचे लोक कांहीं इंग्रज द्वेष्टे नाहीं. त्या बिचाऱ्यांनी आमचं काय वाईट केलं आहे ? आमचा लढा आहे तो ब्रिटिश सत्तेशीं...'

' आधीं चल पाहूं. नाहींतर त्यावर सुरूं व्हायचं तुझं व्याख्यान. '

झटकन् कपडे करून जीवन सोराबसह खोलीबाहेर पडला आणि थोड्या वेळांतच ते इन्स्टिटयूटच्या आवारांत येऊन ठेपले. प्रचंड जनसमुदाय लोटला होता तेथें. त्यांतून मार्ग काढीत पुढें जाण्यापेक्षां मागेंच राहिलेलें बरें वाटलें जीवनला. पण सोराब पुढें घुसलाच.

त्यांत गव्हर्नरांचे भाषण देखील जवळजवळ संपत आलें होतें. भाषण संपतांच ते व्यासपीठावरून खालीं आले आणि जीवन उभा राहिलेल्या बाजूनेंच जाऊं लागले.

तोंच एका मागून एक असे पिस्तुलाचे चार बार झाले आणि गव्हर्नर धाडकन् खालीं पडले. गव्हर्नरावर कुणीतरी गोळ्या झाडल्या होत्या खास. लोकांत भयंकर खळबळ उडाली. पोलीसांची धांवपळ सुरू झाली.

तोंच जीवन उभा असलेल्या जागींच हातांत पिस्तुल घेऊन सर्वांग घामाकुळ झालेला क्रांतिकुमार आला.

जीवनला सर्व प्रकारची कल्पना येऊन चुकल्यानें, धांवतच त्याच्या जवळ जाऊन तो उद्गारला, ' कोण क्रांतिकुमार ! '

क्रांतिकुमारच्या अंगावरून घाम ठिपकत होता, त्याच्या शिरा भीतीनें ताटल्या होत्या आणि त्याचे सर्वांग थरथर कापत होतें. त्यामुळें त्याच्या मुखांतून शब्दच मुळीं बाहेर पडूं शकले नाहींत.

जीवनचा चेहरा निश्चयी तसाच करारी बनला.

समोरून पोलीस येंत असल्याचें पाहून त्यानें घाईघाईनेंच क्रांति-कुमाराच्या हातांतून पिस्तूल काढून घेतलें आणि मुद्दामच पळण्याचें सोंग केलें.

'जागच्या जागीं थांब, नाहींतर हकनाक प्राणास मुकशील.' पोलीस ओरडले.

'कुणाला मरणाची भीति घालतां आहांत तुम्ही ?' जीवन ठासून म्हणाला, 'मला ? गव्हर्नरावर बेधडकपणें गोळीबार करून, त्याचा मुडदा पाडलेल्या या वीराला ?'

'पाहूंच आतां या वीराचं वीरत्व कुठंपर्येंत टिकून राहतं ते.' जीवनच्या चोहोंबाजूनें वेढलेले पोलीस त्याच्या हातांतून पिस्तूल काढून घेत म्हणाले आणि त्याच्या दंडाला धरून ते त्याला ओढत नेऊं लागले.

'अशी माझ्या अंगाशीं लगट करूं नका तुम्ही.' जीवन अंगाला एक हिसका देत बेफिकीरपणें म्हणाला, 'मी कांहीं कुठं पळून जाणार नाहीं. त्यासाठीं कांहीं मी गोळ्या झाडल्या नव्हत्या.'

'आहे ते आम्हांला ठाऊक.'

— — —

# १६

बाहेर वर्तमानपत्रें विकणारीं पोरें जोरजोरानें ओरडत होतीं, ' एका कॉलेज विद्यार्थ्याचा गव्हर्नरावर गोळीबार ! ' ' खादीवस्त्र परिधान करणाऱ्या विद्यार्थ्याचा गव्हर्नरावर गोळीबार !' ' एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मुलाचा गव्हर्नरावर गोळीबार ! ... '

तुरुगाच्या कोठडींत बसलेल्या जीवनच्या कानावर त्या कर्णकटु आरोळ्या पडत होत्या; पण त्याला त्याची दाद ना फिकीर! उजव्या बाजूच्या भिंतीवर मस्तक टेकून, तो सुन्नमनानें विचार करीत होता.

त्यानें आपले डोळे मिटले होते; पण त्याच्या अन्त:चक्षुपुढून कितीतरी व्यक्ती चलत् चित्रपटाप्रमाणें एका मागून एक येऊन जात होत्या. त्याचे आई, बाबा, कल्पना, सोराब, जिल्लू, उपमा, कांतिकुमार आणि कविता

त्याचें अवलोकन करण्यांत तो गढून गेला असतां सर्वांग खाकीचा गणवेष परिधान केलेला अधिकारी तेथें प्रवेश करून ओरडला, ' चला. '

' कुठं ? ' आपल्या तंद्रीतून जागा झालेल्या जीवननें विचारलें.

' हं ! हं! हं ! ' तो अधिकारी तिमजली हास्य करीत म्हणाला. ' कुठं नेत असतात कच्च्या कैद्यांना ? '

' अहो, पण मला ठाऊक नाहीं तर कळूं द्याल कीं नाहीं ? '

' कळेल तें आपोआप. '

त्या आडदांड अधिकाऱ्याशीं हुज्जत घालण्यांत कांहीं अर्थ नसल्याचें जाणून जीवन उठला आणि खड्या पोलीस पहाऱ्यांत जेव्हां का त्याला

कोर्टातील पिंजऱ्यांत आणून उभे करण्यांत आले, तेव्हां तेथें लोटलेल्या अलोट जनसमुदायांत कुजबूज सुरू झाली; पण ती इतकी मोठ्यांदा की, तावडतोब शांत होण्यास न्यायमूर्तींना सूचना द्यावी लागली.

क्षणभरात प्रक्षुब्ध शांतता पसरली तेथें.

आणि न्यायमूर्तींच्या निश्चल चेहऱ्यावर पण गंभीरतेची छटा पसरली.

' गुन्हा कबूल आहे कां तुम्हांला ? ' न्यायमूर्तींनीं विचारले.

' हो ! ' जीवनचा निश्चय अढळ होता.

' तुम्हीं जाणून बुजून गव्हर्नरावर गोळीबार केलांत ! '

' हो ! '

फिरून न्यायघरांत कुजबूज सुरू झाली आणि न्यायमूर्तींनीं फांशीची शिक्षा फरमावताच तर तेथें भयंकर गोंधळ माजला.

जो तो जीवनच्या चेहऱ्याकडे पहात होता.

o * o

बाहेर वर्तमानपत्रें विकणारी पोरें जो जोरानें ओरडत होतीं, ' गव्हर्नराचा खून केलेल्या विद्यार्थ्याला फांशीची शिक्षा ! आज संध्याकाळीं फांशीची शिक्षा ! '

जीवनच्या विषण्ण चेहऱ्यावर हास्य चमकले. किती भेसूर होते ते !

त्याच्या शेजारी येऊन उभ्या राहिलेल्या अधिकाऱ्याला देखील ते भयानक वाटले. तो मोठ्यादां खाकरून म्हणाला, ' शेवटची कांहीं इच्छा आहे कां तुमची ? '

जीवननें नकारार्थी मान हालविली.

त्या अधिकाऱ्याला त्याचें आश्चर्य वाटल्यानें चमत्कारिक नजरेनें जीवनकडे पहात तो म्हणाला, ' पहा ! कुणाला भेटायचं असलं तर. '

' भेटायचं ' म्हणतांच जीवन चपापला. त्याच्या हृदयांत कालवा कालव सुरू झाली. त्याचे कणखर काळीज देखील क्षणभर हादरलें.

पण लगेच त्यानें आत्मसंयमन केलें. त्याचे विचारी मन त्याला म्हणालें, ' सोडच हा मोह ! कुणाला कशाला भेटायचं ? केलेला स्वार्थ-त्याग बोलून दाखविण्यासाठीं ? त्यागाची वाच्यता कां करायची असते ? त्यामुळं त्याची किंमत नाहीं कां कमी होणार ? '

नको नकोच ते ! तो मन घट्ट करून त्या अधिकाऱ्याला म्हणाला, ' मला कुणाला भेटायचं नाहीं . '

तोंच वर्तमानपत्रें विकणारा पोऱ्या बाहेर ओरडला, ' संध्याकाळीं महात्मागांधींचं अझाद मैदानावर भाषण...'

' मला कुणाला भेटायच नाहीं; पण माझी दुसरीच एक इच्छा आहे, ' जविन त्या अधिकाऱ्यास म्हणाला.

' कोणती ती ? '

' आज संध्याकाळीं महात्मागांधींचं भाषण आहे ना ? '

' बरं मग ? '

' ते ऐकायचं आहे मला. '

तो आधिकारी वेडपटासारखा जीवनकडे पहात राहिला. तेव्हां स्मित हास्य करीत जीवन म्हणाला, ' खरंच ! ऐकायचं आहे मला. '

' तुम्ही अट्टल क्रांतिकारक आणि...'

' म्हणूनच ऐकायचं आहे मला महात्माजींचं भाषण. '

अधिकारी एकाएकी स्तब्ध झाल्याचें पाहून जीवन म्हणाला ' पहा विचार करून. माझी ही शेवटची इच्छा आहे. '

' बरं ऐकवूं तुम्हांला गांधींचं भाषण, ' म्हणून तो अधिकारी खोली बाहेर पडला.

खड्या पोलीस पाहऱ्यांत जेव्हां कां जीवन तुरुंगाबाहेर आला तेव्हां त्याला कल्पना नव्हती कीं इतके लोक तेथें गोळा झाले असतील म्हणून. त्यानें सहज डावीकडे पाहिले, तों... तो आश्चर्यानें मागेंच सरला. तेथें आबा आणि कल्पना उभी होती. त्यांच्या मुद्रेवर मूर्तिमंत उदासीनता दृग्गोचर होत होती. त्याचे डोळे आजारी माणासारखे खोल गेल्या सारखे दिसत होते आणि विशेष म्हणजे त्यांच्या डोळ्यांतून सतत अश्रू-प्रवाह वहात होता.

जीवननें आलेला आंवढा गिळला आणि आपली दृष्टि चटकन् त्यांच्या वरून काढून घेऊन त्यानें ती उजवीकडे वळविली; तो कविता व तिच्या शेजारी उभा असलेला क्रान्तिकुमार त्याच्याकडे अश्रूपूर्ण नजरेनें पहात असल्याचें त्याला दिसलें.

त्याच्या हृदयांत कालवा कालव सुरू झाली, त्याचा श्वास जोरानें वाहूं लागला आणि त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे रहतीलसे त्याला वाटले.

त्यानें आपली नजर समोर रोखली आणि झपाझप पावलें टाकीत तो रस्ता चालू लागला.

तो अझाद मैदानावर येतांच त्याच्या दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या शिपायांनी म्हटले, ' ऐका, गांधींचच भाषण चालू आहे. '

जीवन एकाग्रतेनें ऐकूं लागला.

' हिंदुस्थानांत खरी क्रांति घडवून आणायची झाल्यास ती अहिंसेच्या मार्गानंच घडेल. एखाद दुसऱ्या इंग्रजाचा खून केल्यानं कां सबंध ब्रिटिशांचा नायनाट होणार आहे ? त्यामुळं होईल काय तर आपण नाहक प्राणास मुकूं. आपण निःशस्त्र असल्यानं, सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या ब्रिटिशांना आपण तोंड देऊ शकणार नाहीं. या प्रबळ ब्रिटिश सत्तेला तोंड देण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे अहिंसात्मक लढा. त्यानं अट्टल खुनी मनुष्याचं देखील मन द्रवेल; त्याला उपरती होईल....'

' चला मला घेऊन. ' जीवन बरोबरच्या शिपायांना म्हणाला.

आमचें यापुढील प्रकाशन

?

लेखकः—

पं० जवाहरलाल नेहरु

पुढील महिन्यांत बाहेर पडेल.

रत्नाकर प्रकाशन संस्था, सांगली.